



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, मंगळवार २४ फेब्रुवारी २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०





# 50 टक्के आरक्षण ओलांडलेल्या जि.प.-पं.स.च्या निवडणूक लांबणीवर

## सुप्रीम कोर्टाचा मोठा निर्णय



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** राज्यातील ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलांडलेल्या स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका घेण्यास सुप्रीम कोर्टानं मनाई केली आहे. राज्यात आता २२ जिल्हा परिषदा आणि त्यांअतर्गत येणा-या पंचायत समित्यांच्या निवडणुका प्रलंबित राहणार आहेत. महाराष्ट्राच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील ओबीसी आरक्षणावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रलंबित निवडणूक घेण्यास परवानगी देण्याची मागणी राज्य सरकारकडून करण्यात आली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयानं उर्वरित जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका घेण्यास मनाई केली आहे.

**उर्वरित जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक लांबणीवर**


राहुल रमेश वाघ विरुद्ध केंद्र सरकार, महाराष्ट्र सरकार या मूळ याचिकेवर सुनावणी झाली. बांठिया समितीच्या अगोदर जी स्थिती होती त्यानुसार निवडणूक घेण्याचे आदेश सुप्रीम कोर्टानं दिले होते. राज्य निवडणूक आयोगानं आरक्षण निश्चिती करताना ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली गेली होती. काही ठिकाणी निवडणुका देखील पार पडल्या. २२ जिल्हा परिषद आणि या जिल्ह्यांमधील पंचायत समितीत आरक्षणाची ५० टक्के मर्यादा ओलांडली गेली होती. त्यामुळं या ठिकाणच्या निवडणुका घेण्यास स्थगिती देण्यात आली होती. राज्य निवडणूक आयोगानं १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुका पार पडलेल्या आहेत. उर्वरित २२ जिल्हा परिषदांच्या आणि उरलेल्या पंचायत समित्यांच्या निवडणुका अनिश्चित काळासाठी प्रलंबित राहण्याची शक्यता आहे. राज्यातील ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलांडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर सर्वोच्च न्यायालयानं मनाई कायम ठेवली आहे. राज्य सरकारच्यावतीनं तुषार मेहता यांनी अंतिम आदेशाच्या अधीन राहून निवडणूक घेण्यास (पान २ वर)

# नागपूर, भंडारा, गोंदियात वादळासह धो धो पाउस!

## विदर्भात पुढचे तीन दिवस येलो अलर्ट

**नागपूर/प्रतिनिधी :**गेल्या काही दिवसापासून उकाड्याचा त्रास वाढला असतानाच रविवारी मध्यरात्रीनंतर अचानक वादळी पावसाने जोरदार हजेरी लावली. त्यामुळे उन्हाची काहीली कमी होउन वातावरणात काहीसा गारवा वाढल्याचे चित्र होते. विदर्भात विशेषत: नागपूर, गोंदिया व भंडारा जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह पावसाची नोंद झाली आणि वादळाचा तडाखाही बसला. विदर्भाच्या बहुतेक जिल्ह्यात पावसाळी वातावरण तयार झाले आहे.

रविवारी दिवसभर उन्हाचा पारा चांगलाच वाढला होता. नागपूरचे कमाल तापमान ३४ अंश व रात्रीचे तापमान १७ अंशापर्यंत गेले होते. इतर जिल्ह्यातही तापमान ३४ ते ३६ अंशापर्यंत चढले आहे. रात्रीही उकाडा जाणवत होता. मध्य रात्रीनंतर मात्र अचानक वातावरण पूर्णपणे बदलले. सोसाट्याचा वारा वेगाने वाहत असताना विजांचाही कडकडाट होत राहिला. पहाटे ४ वाजताच्या दरम्यान ढगांच्या गडगडाटासह पावसाने जोरदार धडक दिली. जोराच्या सरींसह बरसणारा पाउस सकाळी ६ वाजतादरम्यान थांबला. नागपुरात १०.९ मि.मी., भंडारा येथे १० मिमी व गोंदियात २.४ मि.मी. पाउस



नोंदविला गेला. वादळामुळे काही ठिकाणी झाडांची पडझड झाल्याच्या घटना घडल्या. जिवितहानीची मात्र कुठेही नोंद झाली नाही. सकाळपासून नागपूर शहरात ढग शांत होते, मात्र जिल्ह्यात हिंगणा, बुटीबोरी, भिवापूर भागात हलक्या सरी बरसल्या. दुसरीकडे वर्धा व यवतमाळ जिल्ह्यातही काही ठिकाणी पावसाने हजेरी लावली.

**तीन दिवस येलो अलर्ट**-यंदा संपूर्ण हिवाळ्यात एकदाही पावसाची नोंद झाली नाही व वातावरण पूर्णपणे कोरडे झाले आहे. अशात २४ तासात बंगालच्या उपसागरात सध्या कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले आहे, ज्यामध्ये आर्द्रता निर्माण होत वा-यासह मध्य भारताच्या दिशेने वाहत आहे. दुसरीकडे मध्य महाराष्ट्रात द्रोणिका तयार झाली असून ती विदर्भ होत पूर्व दिशेने वाहत आहे. दोन्हीच्या संयोगाने पावसासाठी अनुकूल वातावरण तयार झाले आहे. त्यामुळे पूर्व विदर्भातील नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोलीसह दक्षिणेत वर्धा, यवतमाळ भागात २४ तासात वादळी पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. यासह पुढचे तीन दिवस ढगाळ वातावरण कायम राहून काही ठिकाणी किरकोळ पाउस होण्याचीही शक्यता आहे. वेधशाळेने तीन दिवसाचा येलो अलर्ट दिला आहे. जिर्ण, छप्पर असलेल्या घरातील नागरिकांनी सावध रहावे. दरम्यान पावसासह वादळाचीही शक्यता आहे. या काळात वा-याचा वेग ३० ते ४० किमी प्रति तास असू शकतो. त्यामुळे जिर्ण इमारती, छप्पर असलेल्या घरातील नागरिकांनी सावधगिरी बाळगावी, असा इशारा हवामान विभागाने दिला आहे.

**पहाटेच्या पावसाने गारवा-** दरम्यान गेल्या काही दिवसात तापमान वाढत असल्याने उकाड्याने त्रस्त झालेल्या नागरिकांना पावसामुळे थोडा दिलासा मिळाला. पहाटेच्या पावसाने वातावरणात गारवा भरला. त्यामुळे सोमवारी नागपुरात दिवसाचे कमाल तापमान १.६ अंशाने घसरून ३२.४ अंशावर आले. रात्रीच्या तापमानात मात्र वाढ नोंदविण्यात आली. किमान तापमान १.२ अंशाने वाढून १८.४ अंशावर गेले, जे सरासरीपेक्षा २.१ अंशाने अधिक आहे. अकोला व अमरावतीचे दिवसाचे तापमान मात्र ३७ अंशाच्या वर नोंदविण्यात आले.

# झाडा येथील जवान नक्षल्यांच्या हल्ल्यात गंभीर

## झारखंडमध्ये घडली घटना

धामणगाव रेल्वे/प्रतिनिधी- झारखंड राज्यातील साईबासाजवळील सारडा जंगलात नक्षल्यांसोबत गोळीबार सुरू असताना कोब्रा कमांडो दिनेश राउत गंभीर जखमी झाले. प्रकृती चिंताजनक असल्यामुळे त्यांना दिल्ली येथे हलविण्यात आले असल्याची प्राथमिक माहिती आहे. दिनेश राउत हे अमरावती जिल्ह्यातील धामणगाव रेल्वे तालुक्यातील झाडा या गावातील रहिवासी असून सीआरपीएफमध्ये कार्यरत आहेत. कोब्रा कमांडो दिनेश राउत हे आपल्या देशसेवेत कार्यरत असताना झारखंड राज्यातील साईबासाजवळील सारडा जंगलात नक्षल्यांसोबत झालेल्या गोळीबारात गंभीररीत्या जखमी झाल्याची माहिती आहे. नक्षलवाद्यांसोबत झालेल्या चकमकीत दिनेश राउत यांना अनेक गोळ्या लागल्या असून त्यांना तातडीने रांची येथील रुग्णालयात हलवण्यात आले; मात्र प्रकृती चिंताजनक असल्याकारणाने पुढील उपचारासाठी त्यांना दिल्ली येथील एम्स रुग्णालयात पाठवण्यात आले. उपचारा दरम्यान दिनेश राउत यांच्या शरीरात जहर पसरत चालले असल्याने त्यांचा डावा पाय कापण्यात आल्याचीही प्राथमिक माहिती आहे.




# संतापजनक! वाशरूमच्या दरवाजावर शिवरायांचा फोटो

## हरियाणातील रिसार्टमधील धक्कादायक प्रकार

**सिकरी/वृत्तसंस्था :** हरियाणातील सिकरी येथील एका रिसार्टमध्ये छत्रपती शिवाजी महाराज आणि राणी पद्मिनी यांच्या प्रतिमांचा अत्यंत संतापजनक अवमान झाल्याचा प्रकार उजेडात आला आहे. रिसार्टमधील वाशरूमच्या प्रवेशद्वारावर या महापुरुषांचे फोटो लावण्यात आल्याने देशभरातील शिवप्रेमींमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. सोशल मीडियावर व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर झालेल्या प्रक्षोभामुळे अखेर रिसार्ट मालकाने हे फोटो काढून माफी मागण्याचा प्रयत्न केला आहे.

***नेमका प्रकार काय?***

मिळालेल्या माहितीनुसार, हरियाणाच्या सिकरी येथील मथुरा रोडवरील मिलन रिसार्ट'मध्ये हा प्रकार घडला. येथील बँक्वेट हालमध्ये असलेल्या पुरुषांच्या वाशरूमच्या दरवाजावर छत्रपती शिवाजी महाराज यांचा फोटो, तर महिलांच्या वाशरूमच्या दरवाजावर राणी पद्मिनी यांचा फोटो लावण्यात आला होता. रिसार्टमध्ये आलेल्या एका सजग व्यक्तीने हा प्रकार कॅमे-यात कैद केला आणि त्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केला. हा व्हिडिओ वा-यासारखा पसरल्यानंतर नेटिझन्सनी संताप व्यक्त करत, 'महापुरुषांचा असा अपमान सहन केला जाणार नाही,' असा इशारा रिसार्ट प्रशासनाला दिला.




# अजितदादांचा पायलट सुसाईड बाम्बर होता

## अमोल मिटकरींच्या नव्या आरोपांनी राज्यात खळबळ

**मुंबई/प्रतिनिधी :**अजित पवारांच्या विमान अपघातावरचं संशयाचं आणि प्रश्नांचं काहूर कायम आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ उडवणा-या अजित पवारांच्या विमान अपघातावर अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी नवे प्रश्न उपस्थित केले गेले. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार मिटकरींनी पायलट सुसाईड बाम्बर होता का? अशी शंका उपस्थित केलीय. तर शरद पवारांच्या पक्षाचे आमदार रोहित पवार आणि जितेंद्र आव्हाड यांनीही याच मुद्यावरून प्रश्नांची सरबत्ती केली. अजित पवारांचं विमान अपघातात निधन झालं. पाच दिवसांनी दादांच्या निधनाला एक महिना पूर्ण होईल. मात्र अजूनही दादांच्या निधनाच्या धक्क्यातून महाराष्ट्रातील नागरिक सावरलेले नाहीत. अजित पवारांच्या पक्षातील आमदार अमोल मिटकरीही अजितदादांच्या निधनामुळे प्रचंड भावुक झालेत. दादांच्या विमानाला झालेल्या अपघातावर अमोल मिटकरी सातत्यानं संशय व्यक्त करताहेत. अकोला जिल्ह्यातील बाळापुर तालुक्यात शिवजयंतीच्या (पान २ वर)



# रोहित पवार सभागृहात ढसाढसा रडले

**मुंबई/प्रतिनिधी :** दिवंगत नेते अजित पवार यांच्या शोकप्रस्तावावेळी त्यांचे पुतणे आणि आमदार रोहित पवार हे भावूक झाल्याचं दिसून आलं.



अजित पवारांच्या आठवणी सांगताना त्यांच्या डोळ्यातून अश्रू आले. आपल्या शर्टचं वरचं बटण उघडं असायचं, त्यावर ते बटण लावत जा असं अजित पवार म्हणायचे. पण चाळीस-पन्नास वर्षानंतर कधी दादांची वरती भेट होईल त्यावेळी आपण त्यांच्यासमोर हे बटण लावू. तोपर्यंत हे बटण तसंच खुलं असेल, त्यामुळे दादांची रोज आठवण येईल असं रोहित पवार म्हणाले. तसेच अजितदादांच्या अपघाताला जो कुणी दोषी असेल त्याला तुरुंगात पाठवल्याशिवाय सोडणार नाही असंही रोहित पवार म्हणाले. आजपासून महाराष्ट्र राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाची सुरुवात झाली आहे. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी अजित पवार यांच्या निधनाबद्दल दोन्ही सभागृहात शोकप्रस्ताव मांडण्यात आला. त्यावेळी रोहित पवारांनी त्यांच्या आठवणींना उजाळा दिला. अजितदादा पवार नावाचा जादूगार सबंध महाराष्ट्राला हसवत हसवत गेला. दादांच्या जाण्याने राज्याच्या राजकारणातील मिश्कीलपणा (पान २ वर)

# अखेर व्हॉट्सॲप झुकले

## ग्राहकांचा डेटा शेअर करणार नाही

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था ::** जागतिक तंत्रज्ञान कंपन्या मेटा आणि व्हाट्स ॲपने सोमवारी सर्वोच्च न्यायालयाला सांगितले की, त्या काम्पिटिशन कमिशन ऑफ इंडिया(सीसीआय)च्या गोपनीयता आणि जाहिरातींशी संबंधित डेटा शेअर करण्याच्या मार्गदर्शक तत्त्वांचे आणि एनसीएलएटीच्या निर्देशांचे पालन करतील.मुख्य न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जायमाल्या बागची आणि विपुल एम पंचोली यांचे खंडपीठ गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये नॅशनल कंपनी लॉ अपीलेट ट्रिब्यूनलच्या निर्देशांविरुद्ध या तंत्रज्ञान कंपन्यांच्या अपीलवर सुनावणी करत होते. सीजेआयच्या कठोरतेनंतर व्हाट्सॲप आणि मेटाने सीसीआयचे आदेश स्वीकारले. ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी आश्वासन दिले की, १६ मार्च २०२६ पर्यंत गोपनीयता धोरणाचे (प्रायव्हसी पॉलिसी) सर्व नियम लागू केले जातील. न्यायालयाने कंपनीची स्थगितीची याचिका फेटाळून लावली आहे. आता वापरकर्त्याला जाहिरात कंपन्यांना डेटा शेअर करण्याचा पर्याय द्यावा लागेल. (पान २ वर)



# शक्तिपीठ महामार्गाविरोधात शेतकरी आक्रमक

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य सरकारच्या महत्वाकांक्षी शक्तीपीठ महामार्गाच्या विरोधात कोल्हापूर, सांगली, परभणी आणि धाराशिवमध्ये या महामार्गाला



तीव्र विरोध होत आहे. शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्याच्या मागणीसाठी या जिल्ह्यांमध्ये आंदोलन करण्यात आलं. शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्याच्या मागणीसाठी सांगली जिल्हाधिकारी कार्यालयावर महामार्गबाधित शेतक-यांचा धडक मोर्चा काढण्यात आला. माजी खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा काढण्यात आला. या मोर्चामध्ये शक्तीपीठ बाधित शेतकरी त्यांच्यासह कुटुंबासह बैलगाडी घेउन सहभागी झाले होते..

शक्तिपीठ महामार्ग रद्द करावा अशी मागणी यावेळी करण्यात आली. नागपूर, वर्धा, यवतमाळ, हिंगोली, नांदेड, बीड, लातूर, परभणी, सोलापूर, धाराशिव, कोल्हापूर, सिंधुदुर्ग ते गोवा असा हा शक्तिपीठ महामार्ग असणार आहे... परभणी जिल्ह्यातून जाणा-या शक्तिपीठ महामार्गाच्या विरोधात,शिंगणापूर फाटा येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आलं. परभणी लोकसभेचे खासदार संजय जाधव यांच्या नेतृत्वात या आंदोलन करण्यात आलं. शक्तीपीठ महामार्ग रद्द झाल्याशिवाय, (पान २ वर)

# जाते जाते तुमने, आवाज तो दी होगी म्हणत दाटले अश्रू

## अजितदादांच्या शोकसभेत सर्वपक्षीय नेते-कार्यकर्ते भावूक

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईतील वरळी डोम येथे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांची शोकसभा अत्यंत शोकाकुल वातावरणात पार पडली. २८ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या विमान अपघातात त्यांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेससह विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी उपस्थित राहून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

या शोकसभेला राज्याचे राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार माजी सरन्यायाधीश भुषण गवई, सुनिल तटकरे, प्रफुल पटेल, मंत्री छगन भुजबळ, माजी मुख्यमंत्री सुशिलकुमार शिंदे, अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार व जय पवार तसेच पवार कुटुंबीय आणि सर्वपक्षीय नेते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले, आपल्यापैकी कोणीही अशी वेळ येईल, याची कल्पना केली नव्हती. दुर्दैवाने आज आपण अजितदादांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी एकत्र आलो आहोत. महाराष्ट्राच्या जडणघडणीत त्यांचा मोठा वाटा आहे. त्यांनी जनतेचा नेता अशी प्रतिमा निर्माण केली होती. राज्याच्या कानाकोप-याची त्यांना अचूक माहिती असायची. प्रत्येक तालुक्यापर्यंतच्या घडामोडींवर त्यांची पकड होती. ते अत्यंत सक्षम आणि कुशल प्रशासक होते. (पान २ वर)



# अजितदादा मला सांगायचे पैसे कमी पडू देणार नाही... भूषण गवई यांनी सांगितली खास आठवण

**मुंबई :** न्यायालयीन इमारती किंबहुना त्यासंबंधी पायाभूत सुविधा उभारताना अजित पवार यांनी कधीच हात आखडता घेतला नाही. न्यायालयासंबंधींच्या



कामांना पैसे देताना त्यांनी कधीच मागे पुढे पाहिले नाही. फक्तकामाचा दर्जा व्यवस्थित ठेवा, काम करताना दर्जाबाबत कुठेही तडजोड करू नका, असे ते सांगायचे. अशा खास आठवणी देशाचे माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांनी जागवल्या. राज्याचे दिवंगत नेते, माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना आदरांजली वाहण्यासाठी मुंबईतील वरळी डोममध्ये सर्वपक्षीय नेते हजर होते. तसेच उद्योग, आरोग्य, कला, क्रीडा क्षेत्रातील नामवंत, न्यायपालिकेतील उच्चपदस्थ उपस्थित होते. याच शोकसभेत बोलताना माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांनी अजित पवार यांच्या स्मृतींना उजाळा दिला. माजी सरन्यायाधीश भूषण गवई म्हणाले, २८ जानेवारीची सकाळ राज्यासाठी नाही तर देशासाठी दुर्दैवी ठरली. अगदी सकाळी बातम्या आल्या, अजित पवार यांच्या विमानाला अपघात झाला. काही वेळात बातम्या आल्या की अजितदादा आपल्याला सोडून गेले. अजितदादांचे जाणे हे राज्याचेच नव्हे तर देशाचे नुकसान आहे. माझे वडील दादासाहेब गवई आणि ज्येष्ठ नेते शरद पवार हे अतिशय जवळचे मित्र. मी २००३ साली न्यायमुर्ती झालो. नंतर २०१४ (पान २ वर)


# व्यासपीठावर गेले अन् हात जोडले

## शोकसभेत नाना पाटेकर भावुक, व्यक्त केली खंत

**मुंबई :** राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं विमान अपघातात निधन झालं. २८ जानेवारी हा संपूर्ण राज्यासाठी काळा दिवस ठरला. अजित पवार आज आपल्यात नाहीत, हे खरंतर मन मानायला तयार नाही, अशी भावना अनेकांनी व्यक्त केली. नेते मंडळींसह दिग्गजांनीही अजित पवार यांच्या निधनाबद्दल दु:ख व्यक्त केलं. त्यांच्या निधनानंतर उपमुख्यमंत्रिपदाची जबाबदारी सुनेत्रा पवार यांनी सांभाळली. आज अजित दादांच्या निधनानंतर शोकसभेचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम मुंबईतील वरळी डोम येथे पार पडत आहे.



या शोकसभेला देशातील आणि राज्यातील दिग्गज नेते उपस्थित आहेत. उद्योगपती आणि कलाकारांनीही हजेरी लावली आहे. या कार्यक्रमात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील महत्त्वाचे नेते उपस्थित आहेत. या शोकसभेत उद्योगपती गौतम अडानी आणि मुकेश अंबानी देखील उपस्थित आहेत. यावेळी उपस्थितांनी अजित दादांच्या आठवणींना खास उजाळा दिला. तसेच अजित पवार यांना श्रद्धांजली वाहिली. हिंदी आणि मराठी सिनेसृष्टीतील दिग्गज कलाकार नाना पाटेकरही शोकसभेत उपस्थित आहेत. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना नाना पाटेकर भावुक झाले असल्याचं पाहायला मिळालं. शोकसभेत नाना पाटेकर यांनी अजित (पान २ वर)



जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

पान १ व १० वरून

# 50 टक्के आरक्षण ओलांडलेल्या

परवानगी देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली होती. मात्र, सुप्रीम कोर्टानं अशी परवानगी देता येणार नसल्याचं म्हटलं. राज्यातील राहिलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अनिश्चित काळासाठी प्रलंबित राहण्याची शक्यता आहे. प्रलंबित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम आदेशाच्या अधीन ठेवून निवडणुका घेतल्या जाउ शकतात, अशी भूमिका राज्य सरकारच्या वतीने तुषार मेहता यांनी मांडली होती. मात्र, सुप्रीम कोर्टानं निवडणुका घेण्यास परवानगी दिलेली नाही. बांठिया आयोगाने दिलेल्या ओबीसी आरक्षणाच्या वैधतेवर सर्वोच्च न्यायालय कधीपासून सुनावणी सुरू करणार याकडे लक्ष लागलं आहे. ओबीसींच्या महाराष्ट्रातील राजकीय आरक्षणावर लवकरच अंतिम सुनावणीला सुरु वात होणार असल्याचं सुप्रीम कोर्टानं सांगितलं आहे. अंतिम सुनावणी लवकर घेउ अशी भूमिका सर्वोच्च न्यायालयानं घेतली आहे. अंतिम सुनावणी पूर्वतयारी पूर्ण करण्याचे सर्व वकिलांना निर्देश सुप्रीम कोर्टानं दिला आहे.

# अखेर व्हॉट्सअॅप झुकले

मेटा-व्ह ?ट्सअ ?पला प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल कंपन्यांना सीसीआयसमोर एक अनुपालन प्रतिज्ञापत्र देखील दाखल करावे लागेल. दंडाशी संबंधित मुद्द्यांवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू राहील, परंतु तात्काळ प्रभावाने व्ह ?ट्सअ ?पने आपल्या गोपनीयता धोरणात बदल करून वापरकर्त्यांना संमतीचा पर्याय द्यावा लागेल. ४ नोव्हेंबर २०२५ रोजी, एनसीएलएटीने सीसीआयचा डेटा शेअरिंगशी संबंधित आदेश रद्द केला होता. या आदेशात इन्स्टंट-मेसेजिंग अ ?पला पाच वर्षांसाठी जाहिरातीच्या उद्देशाने मेटा प्लॅटफ ?र्म्ससोबत डेटा शेअर करण्यापासून प्रतिबंधित केले होते. परंतु सोशल-मीडिया प्लॅटफ ?र्मवर २१३ कोटी रु पयांचा दंड कायम ठेवला होता. नंतर, ट्रिब्युनलने स्पष्ट केले की, गोपनीयता आणि संमती सुरक्षा उपायांवर व ?ट्सएप प्रकरणात त्याचा आदेश गैर-व ?ट्सएप उद्देशांसाठी वापरकर्ता-डेटा संकलन आणि शेअरिंगला देखील लागू होतो.

# शक्तिपीठ महामार्गाविरोधात

शांत बसणार नाही असा पवित्रा शेतक-यांनी घेतला आहे. तर धाराशिवमध्ये शक्तीपीठ महामार्गाविरोधात शेतकरी एकवटला आहे. शक्तीपीठ महामार्ग रद्द करा ही अशी मागणी करत संतप्त शेतक-यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात घुसून घोषणाबाजी केली. अधिवेशनातही शक्तिपीठ महामार्गप्रकरणी अधीवेशनात आवाज उठवण्याचा निर्धार विरोधकांनी केला आहे. शक्तीपीठ महामार्ग हा सर्व शेतक-यांना विश्वासात घेउनच तयार केला जाईल अशी सरकारची भूमिका आहे. शक्तीपीठ महामार्गाच्या विरोधात कोल्हापूर,सांगली,परभणी आणि धाराशिवमध्ये या महामार्गाला तीव्र विरोध होत आहे. या सर्व पार्श्वभूमीवर हा महामार्ग तयार पूर्ण करताना सरकारची मोठी कसोटी लागणार आहे.

# अजितदादांचा पायलट सुसाईड

कार्यक्रमात बोलताना अमोल मिटकरींनी पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित केलं. अजितदादांचा पायलट सुसाईड बॉम्बर होता का? त्याचा मास्टरमाईंड कोण असे सवाल त्यांनी विचारले. अमोल मिटकरींनी अजित पवारांचं अपघाती निधन आणि माजी पंतप्रधान राजीव गांधींची हत्या यात साधर्म्य असल्याचा मुद्दा मांडला. लिबरेशन टायगर्स ऑफ तमिल इलमनं २१ मे १९९९ रोजी तामिळनाडूतील श्रीपेरंबदूरमध्ये आत्मघाती हल्ला करून राजीव गांधींची हत्या केली होती. याच मुद्द्याच्या अनुषंगानं डीजीसीएच्या अहवालानुसार विमानात सहा जण होते, मग पाचच मृतदेह कसे सापडले? असा मुद्दा अमोल मिटकरींनी उपस्थित केला.

# रोहित पवार सभागृहात

गेला असं रोहित पवार म्हणाले. यावेळी रोहित पवारांनी अजित पवारांच्या राजकीय कारकिर्दीला उजाळा देत त्यांच्याबद्दल अनेक घटना सांगितल्या.

रोहित पवार म्हणाले की, 'एकदा अजितदादा मला म्हणाले होते की, रोहित तुझ्या झिप-या वाढल्यात, त्या कमी कर. दादा गेले त्या दिवशी त्यांना आदरांजली म्हणून मी केस कापले. अजितदादा नेहमी मला म्हणायचे की, तुझं शारिरीक वजन वाढलंय. शारिरीक वजन कमी कर आणि राजकीय वजन वाढव. मी त्यावर फक्त हो म्हणायचो. मी अजितदादांना शब्द देतो. माझी हेअरस्टाईल अशीच ठेवेन. शारिरीक वजन कमी करेन, राजकीय वजन वाढवेन.' अजितदादा मला म्हणायचे, वरचं बटण लावत जा. पण एक मात्र मी सांगतो, चाळीस-पन्नास वर्षानंतर मी ज्यावेळी अजितदादांना भेटायला जाईन, तोपर्यंत मी माझं बटण असंच उघडं ठेवणार. कारण हे वरचं बटण तुमची मला रोज आठवण देत राहील असं रोहित पवार म्हणाले.

कुणालाही सोडणार नाही-रोहित पवार पुढे म्हणाले की, 'एक सांगतो, चाळीस-पन्नास वर्षानंतर ज्यावेळी कधी तुमची भेट होईल, तेव्हा हा माझा लढा सुरू आहे त्यामुळे त्यांच्यासमोर मी ताठ मानेने उभा राहीन. त्यावेळी काका माझ्या पाठीवर हात ठेवून म्हणतील, लढलास बरं का! या गोष्टी ऐकण्यासाठी मी हा लढा सुरू ठेवलाय.

# जाते जाते तुमने, आवाज तो

**काळाच्या मनातील संकेत ओळखता आला नाही-** एकनाथ शिंदे

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भावना व्यक्त करत सांगितले की, अजित पवार यांनी १९९१ पासून अनेक महत्त्वाची पदे भूषविली. ते स्पष्टवक्ते होते आणि आपली मते परखडपणे मांडत असत. राज्याच्या विकासाचा ध्यास त्यांनी कायम ठेवला होता. शिंदे पुढे म्हणाले की, आम्ही तिघे (देवेंद्र फडणवीस, अजितदादा) एकमेकांच्या मनातील गोष्टी सहज ओळखत होतो. आमचे बॉन्डिंग अतिशय घट्ट आणि समन्वयपूर्ण होते. मात्र दुर्दैवाने, काळाच्या मनातील संकेत आम्हाला ओळखता आले नाहीत.

**महाराष्ट्रासाठी मोठा आघात-** नितीन गडकरी

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आपल्या भावना व्यक्तकरत सांगितले की, आम्ही विधीमंडळात असताना आमच्यात घट्ट मैत्री निर्माण झाली होती. ते दिल्लीला आले की नेहमी माझ्याकडे भेट द्यायचे. गडकरी म्हणाले की, ते छोट्या-छोट्या बाबींपासून ते मोठ्या विकासकामांपर्यंत प्रत्येक गोष्टीकडे बारकाईने लक्ष देत असत. जनतेच्या हिताची कोणतीही बाब असेल, तर ते ती स्पष्टपणे आणि ठामपणे मांडायचे. त्यांचे अकाली जाणे हे महाराष्ट्रासाठी मोठा आघात असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

**प्रफुल पटेल यांची भावना-**प्रफुल पटेल म्हणाले, दादांच्या शोकसभेला अशा प्रकारे एकत्र यावे लागेल, असे कधी वाटले नव्हते. त्यांच्या निधनानंतर महाराष्ट्रासह देशभरातील लाखो लोकांनी अश्रू ढाळले. यावरून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची उंची लक्षात येते. आज आपण इतक्या मोठ्या संख्येने येथे जमलो आहोत, हीच त्यांना खरी श्रद्धांजली आहे.

**जयंत पाटील यांचे शोकशब्द-**जयंत पाटील यांनी आपल्या भाषणात एका हिंदी गीताच्या ओळी म्हणत दादांची आठवण जागवली, चिठ्ठी ना कोई संदेश, जाने वो कौन सा देश, जहाँ तुम चले गए.. ते पुढे म्हणाले, सकाळी सहा वाजल्यापासून रात्री दहा वाजेपर्यंत काम करणारा नेता क्वचितच पाहायला मिळतो. विकासकामे पाहायची असतील, तर बारामतीला जाउन पाहावे. त्यांनी केवळ मतदारसंघ नव्हे, तर संपूर्ण राज्याची बांधणी केली. शेवटी त्यांनी, इक आह भरी होगी जाते जाते तुमने, आवाज़ तो दी होगी या ओळी उच्चारत भावनांना वाट मोकळी करून दिली.

# अजितदादा मला सांगायचे पैसे

ला ज्येष्ठ न्यायमुर्ती झालो त्यावेळी फडणवीस मुख्यमंत्री झाले. न्यायिक पायाभूत सुविधा चांगल्या उभ्या राहाव्यात, यासाठी देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या साथीने आम्ही प्रयत्न केले. न्यायालयासंबंधींच्या पायाभूत सुविधा उभ्या करण्याकरिता कार्यपालिकेची आवश्यकता असते. २०१४ पासून आतापर्यंत फडणवीस-ठाकरे-शिंदे- अजितदादा सगळ्यांनीच उत्तम योगदान दिले, त्यांच्यामुळेच राज्यात न्यायालयांच्या इमारती उभ्या राहिल्या. अजितदादांनी फंड देण्याकरिता कधीच आढेवेढे घेतले नाही - पुढे बोलताना गवई म्हणाले, अजितदादांनी फंड देण्याकरिता कधीच आढेवेढे घेतले नाही. माझ्या वडिलांच्या स्मारकाचे लोकार्पण झाले, त्यावेळी दादा आले होते. न्यायव्यवस्थेसंबंधी कोणत्याही इमारतींच्या कुठल्याही कामांना निधी कमी पडणार नाही, असे ते सांगत. इमारती चांगल्या प्रतीच्या झाल्या पाहिजे, दर्जा उत्तम राहिला पाहिजे, यासाठी त्यांचा आग्रह असायचा. त्यांच्या गुणांबद्दल सगळेच बोलतायेत. अजितदादांचे काम महाराष्ट्र कधीच विसरणार नाही. पवार कुटुंबाला या संकटातून सावरण्याची शक्ती ई□र देवो, अशी प्रार्थना भूषण गवई यांनी केली.

# व्यासपीठावर गेले अन् हात

पवार यांना श्रद्धांजली वाहिली आणि म्हणाले, 'नमस्कार..माझा आणि दादांचा ५० वर्षांचा संबंध. दादा कार्यकर्ते होते. मी कधी बारामतीला गेलो, तर माझी सगळी उठबस दादा पाहत होते. अजित दादा तेव्हा १८-१९ वयोगटातील असतील, मी २५ आणि शरद पवार ३५ वयोगटातील असतील. ५० वर्षांचा खूप मोठा सहवास आहे. खूप जास्त आठवणी आहेत', असं नाना पाटेकर म्हणाले. 'आज या ठिकाणी इतकी मंडळी जमली आहेत, शोकसभेच्या ठिकाणी जर दादांचा आज ७५वा वाढदिवस साजरा करायला जमलो असतो, तर जास्त बरं वाटलं असतं', असं म्हणत नाना पाटेकर यांनी अजित पवार यांच्या तसबीरासमोर हात जोडले, तसेच व्यासपीठावरु न भावुक होउन खाली उतरले. यावेळी उपस्थित मंडळीही भावुक झाल्याची पाहायला मिळाली.

# युवाशक्ती हीच भारताच्या

योग्य मार्ग निवडण्यास मदत करतील. आपल्या कार्यक्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी ज्ञान आणि कौशल्य सतत अद्ययावत ठेवा. आयुष्यभर शिकण्याची वृत्ती जोपासा. शिस्त, सांघिक कार्य आणि सहानुभूती या गुणांमुळे तुम्ही समाजात वेगळी ओळख निर्माण करू शकाल. बदलाचा स्वीकार करा. ते पुढे म्हणाले, प्रगती ही बदलाशी जोडलेली असते. जुन्या विचारसरणीला आव्हान देऊन नवनवीन कल्पनांचा स्वीकार करणे ही काळाची गरज आहे. 'केवळ प्रयत्न करून थांबू नका, तर परिणामांवर आणि सकारात्मक परिणामांवर लक्ष केंद्रित करा,' असा मोलाचा सल्लाही त्यांनी दिला. नेहरु कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नेर परसोपंत येथील निकीता किशोर पुनसे या विद्यार्थीनीने ०६ सुवर्ण व १ रोख पारितोषिक, आर.ए. कला, एम.के. वाणिज्य व एस.आर. राठी विज्ञान महाविद्यालय, वाशिम येथील पल्लवी बालकृष्ण राठोड या विद्यार्थीनीने ०५ सुवर्ण व रौप्य १ रोख, श्री संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय, शेगांव येथील तेजस्विनी विठ्ठल भगत आणि विद्याभारती महाविद्यालय, अमरावती येथील साई=ारी सत्यजित इंदुरकर या विद्यार्थीनीने प्रत्येकी ४ सुवर्ण पारितोषिके प्राप्त केली आहेत. दीक्षांत समारंभात या विद्यार्थीनींना मान्यवरांच्या हस्ते पदके व रोख पारितोषिके देवून गौरवान्वित करण्यात आले. दीक्षांत समारंभात ८० टक्के पदके मुलींना, तर २० टक्के पदके मुलांना मिळाली.

**डॉ. कमलताई गवई यांना डिलीट-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या ४२ व्या दीक्षांत समारंभामध्ये डॉ. कमल रामक्रिष्ण गवई यांना मानवविज्ञान विद्याशाखेंतर्गत राज्यशास्त्र विषयात वाङ्मय पंडित (डी.लिट) या सर्वोच्च पदवीने मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी त्यांच्या सन्मानार्थ गौरवोद्घोषाचे वाचन करण्यात आले. या दीक्षांत समारंभात विद्याशाखानिहाय ४६६ संशोधकांना आचार्य पदवी देवून सन्मानित करण्यात आले. पदके प्राप्त करणा-यांमध्ये निकीत टिकैत या दिव्यांग विद्यार्थ्याचा सुध्दा समावेश आहे. या प्रसंगी अधिष्ठात्यांनी पदवीकांक्षी व आचार्य पदवीकांक्षींना सादर केले. कुलगुरूंनी विद्यार्थ्यांना अनुग्रह दिला.

**'आजचे युग कृत्रिम बुध्दिमत्तेचे : कुलगुरू-** 'आजचे युग हे 'एआय' अर्थात कृत्रिम बुध्दिमत्तेचे आहे. विद्यार्थ्यांनी या बदलांना घाबरून न जाता नवीन कौशल्ये आत्मसात करावीत. एआय हे रोजगाराची नवीन दालने उघडणारे तंत्रमित्र ठरेल,' असे मत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. मिलींद बारहाते यांनी अध्यक्षीय भाषण करतांना व्यक्त केले. विद्यापीठाच्या ४२ व्या दीक्षांत समारंभात अध्यक्षीय भाषण करताना ते बोलत होते.विद्यापीठाशी सध्या ४५१ महाविद्यालये संलग्न असून सुमारे दोन लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यावर्षी ४२,३१७ विद्यार्थ्यांना पदवी व पदविका प्रदान करण्यात आल्या. बदलत्या काळानुसार विद्यापीठाने पदवी स्तरावरील सर्व विद्याशाखांच्या अभ्यासक्रमात 'एआय'चा अनिवार्य घटक म्हणून समावेश करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. विद्यापीठाने संशोधनात मोठी झेप घेतली असून, यावर्षी प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी दक्षिण आफ्रिकेचे पेटंट मिळवण्यासह एकूण १२ पेटंट्सवर मोहोर उमटवली आहे. विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी सुरू केली असून अभ्यासक्रम अद्ययावत करण्यावर सतत भर दिला जात आहे. 'इंद्रधनुष्य' सारख्या इतरही आंतरविद्यापीठ स्पर्धांमध्ये आणि खेलो इंडिया, सॉफ्ट बॉल स्पर्धा सारख्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या ऐतिहासिक यशाचे कुलगुरूंनी कौतुक केले. संत गाडगे बाबांच्या दशसूत्रीचे पालन करत विद्यापीठ गरजू विद्यार्थ्यांसाठी 'कमवा व शिका' योजना आणि विविध शिष्यवृत्ती राबवत असल्याचे त्यांनी नमूद केले. कुलगुरूंनी आपल्या भाषणाचा शेवट संत तुकाराम महाराज आणि कवी केशवसुत यांच्या ओळींनी करत विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. राष्ट्रगीत, महाराष्ट्रगीत, विद्यापीठ गीत व सरस्वती स्तवनाने दीक्षांत समारंभाची सुरुवात झाली. पाहुण्यांचा कुलगुरूंच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अतिथींचा परिचय करुन दातृनामावलीचे वाचन केले. संचालन डॉ. सुलभा पाटील व डॉ. प्रणव कोलते यांनी केले. पसायदानाने व राष्ट्रगीताने दीक्षांत समारंभाची सांगता झाली. कार्यक्रमाला सर्वोच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश भूषण गवई, महात्मा गांधी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, माजी प्र-कुलगुरू डॉ. व्ही.एस. जामोदे, डॉ. प्रसाद वाडेगावकर, माजी कुलसचिव डॉ. वंदन मोहोड, प्रा. सी.डी. देशमुख, डॉ. बी.आर. वाघमारे, डॉ. तुषार देशमुख तसेच डॉ.मिलींद बारहाते, प्रा. स्वाती महेंद्र ढोरे व ओजस्विनी अविनाश असनारे तसेच एन.सी.सी.चे अधिकारी, शासकीय अधिकारी, विविध संस्थांचे पदाधिकारी, विद्यापीठाच्या विविध प्राधिकारिणींचे सर्व सदस्य, शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, शिक्षक, कर्मचारी, पाचही जिल्ह्यातील गुणवत्ताधारक विद्यार्थी, आचार्य पदवीधारक, महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी व पालक याशिवाय शहरातील गणमान्य नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

# वाहनाच्या धडकेत कोल्ह्याचा

असतो. यापूर्वीही या मार्गावर वन्यजीव रस्ते अपघातात बळी गेल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे वाहनचालकांनी विशेषतः रात्रीच्या वेळी अधिक सावधगिरी बाळगावी, वेग मर्यादेत वाहन चालवावे आणि वन्यजीव दिसल्यास तत्काळ वेग कमी करावा, असे आवाहन वन विभागाने केले आहे. वन्यजीवांचे संरक्षण ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असून अशा अपघातांना आळा घालण्यासाठी नागरिकांचे सहकार्य अत्यावश्यक असल्याचे मत पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केले आहे.

# राहुल नगरात अश्रूधूराचा

शांतता राखण्याचे आवाहन केले आहे. घटनेनंतर काही काळ परिसरात तणावाचे वातावरण होते मात्र आता परिस्थिती सध्या नियंत्रणात असून पुढील तपास सुरू आहे.

# डॉ.शुभांगी जोशी यांना इंग्र्जी

मार्गदर्शनाखाली हा प्रबंध यशस्वीरीत्या पूर्ण झाला.

त्यांच्या या यशामुळे शैक्षणिक क्षेत्रात तसेच कुटुंबीय, मित्रपरिवार आणि शुभेच्छुकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. विविध मान्यवरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्यांच्या जिद्दीचे आणि मेहनतीचे कौतुक केले जात आहे. डॉ. शुभांगी जोशी यांचे हे यश विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणारे असून संशोधन क्षेत्रात पुढे जाणाऱ्या तरुणांसाठी दिशा दर्शक आहे.

# राणीघाट अपघातातील जखमी

दहीकर (रा. कंजोली), विकेश दहीकर (सालाई, सर्व ता. धारणी) यांना जिल्हा सामान्य रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. यातील रिता राठोड यांचा आज सकाळी उपचारादरम्यान मृत्यू झाला. रविवारी रात्री घटनास्थळी शुकरही बिसराम धांडे (वय ४५ रा.कंजोली), सीताराम पटेल सेलूकर (वय ५८ रा.कंजोली),बाबुलाल बुढा दहिकर (वय ५६रा कंजोली), किसन तानू धांडे (वय ५८,रा कंजोली) या मृत्यू झाला होता. जिल्हाधिकारी येरेकर यांनी सुरवातीला अपघात कक्षातील जखमी भुनी दहीकर यांना भेट दिली. यावेळी त्यांनी नातेवाईकांकडून अपघाताची माहिती घेतली. अपघात कशाप्रकारे घडला, वाहनात किती नागरिक होते, अपघाताचे कारण आदींची माहित घेण्यात आली. त्यानंतर अपघातातील अर्चना दारसिंगे या गर्भवती महिलेची भेट घेतली. अपघातामुळे माता व बाळ दोन्ही सुरक्षित ठेवण्यासाठी उपचार करावेत. त्यांची तब्येत पूर्ण बरी झाल्यानंतरच रूग्णालयातून सुट्टी द्यावी, अशा सुचना केल्या. शल्यचिकित्सा कक्षात दोन जणांवर शस्त्रक्रीया करण्यात येत आहे. याठिकाणीही येरेकर यांनी भेट देऊन जखमींच्या नातेवाईकांकडून माहिती घेतली.

**पघाताला वाहनचालक जबाबदार-** राणीघाटातील अपघाताला वाहनचालक कारणीभूत आहेत. वाहनचालकाने वाहन सुस्थितीत नसताना माल आणि प्रवासी जादा प्रमाणात भरले. तसेच धावत्या वाहनामध्येच बिघाड झाल्याने पाच जणांचा मृत्यू झाला आहे. यातील जमखींना विशेष उपचार देऊन काळजी घ्यावी. अपघातातील जखमींवर मोफत उपचार करण्याचे निर्देश देण्यात आले आहे. त्यामुळे जखमींनी पूर्ण उपचार घेऊन घरी जावे. जखमींवर योग्य उपचार करावेत. आवश्यकता भासल्यास खासगी डॉक्टरांची सेवा घेण्यात यावी. जखमी आणि त्यांच्या नातेवाईकांनीही उपचारासाठी सहकार्य करावे, असे जिल्हाधिकारी येरेकर यांनी सांगितले.

**चालकाविरुद्ध गुन्हा दाखल-** अपघातातील बोलेरो पिकअप हे वाहन गोलाई येथील नामदेव सिताराम कातकडे यांच्या नावावर आहे. या वाहनाचा चालक दिपक सज्जुलाल सावलकर (वय ३०, रा. कंजोली) याच्याविरुद्ध धारणी पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोलिस निरीक्षक अवतारसिंग चव्हाण करीत आहेत. मेळघाटमध्ये झालेल्या अपघातातील वाहनचालकांवर सक्त कारवाई करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी येरेकर यांनी जिल्हा पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांना दिल्या आहेत.

# कामगारांचा आयुक्तालयावर

कामगारांना ६० वर्षानंतर सहा हजार रुपये पेन्शन देण्यात यावी. निधीच्या योग्य वापरासाठी देखरेख समिती गठित करण्यात यावी. मातृत्व योजना लाभ सुरू करावा. भूमिहीन बांधकाम कामगारांना उपजीविकेसाठी जमीन आणि निवारासाठी घरे देण्यात यावी. किमान ३६ हजार रुपये प्रति महिना करण्यात यावा. व्यवसायिक सुरक्षा आणि आरोग्य उपायाची खात्री करण्यासाठी स्वतंत्र कायदा करण्यात यावा. मंडळातील रिक्त पदांची भरती शासनमार्फत करण्यात यावी. बांधकाम कामगारांना ऑनलाइन घरासाठी अर्ज करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात यावी. शहराप्रमाणे ग्रामीण भागातील कामगारांनाही कामगार पुस्तिका देण्यात यावी. आदि मागण्यांसाठी निर्दशने करण्यात आली. यावेळी अध्यक्ष विजय बचाटे, संजय मंडवधरे, भीमा पाटील, विजय कांबळे, ज्ञानेश्वर मेश्राम, जयेंद्र भोगे, प्रज्ञा बनसोड, वैशाली निस्वादे, संदीप उके, सुरेश शंभरकर, प्रतिभा मेश्राम, माला वानखडे, संतोष राऊत, रेखा हिंगवे सह बांधकाम कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विलास नगरात घरफोडी,

तक्रारीनुसार, ते २१ फेब्रुवारी रोजी नातेवाईकाच्या लग्नासाठी बाहेर गेले होते. रात्री कपडे बदलण्यासाठी घरी परतल्यावर कार्यालयीन खोलीचा दरवाजा संशयास्पदरीत्या उघडा दिसला. घरात तपासणी केली असता बेडरूममधील लोखंडी कपाट तोडण्यात आल्याचे आढळले. चोरट्यांनी सुमारे ६० ग्रॅम वजनाच्या चार सोन्याच्या बांगड्या (६ लाख रुपये), १५ ग्रॅमचा सोन्याचा गोफ (१.५० लाख रुपये), तीन जोड झुमके (९० हजार रुपये), १२ ग्रॅमचे मंगळसूत्र (१.२० लाख रुपये), चार नथ-बेसर (६० हजार रुपये), २ ग्रॅमचे कानातील टॉप्स (२० हजार रुपये) तसेच सुमारे अर्धा किलो चांदीचे दागिने व नाणी (१ लाख रुपये) असा एकूण १२.४० लाख रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. माहिती मिळताच गाडगेनगर पोलीस ठाणे चे पथक घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून पुरावे गोळा करण्यात आले असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू आहे.

# दर्यापूरातील अस्वच्छेतसह भटक्या

आहे.येथील घाण तात्काळ स्वच्छ करुन त्या ठिकाणी तात्पुरते का होईना शौचालय बांधून आठवडी बाजार, गांधी नगर, शिवाजी नगर येथील भटक्या कुत्र्यांचा त्वरित बंदोबस्त करण्यात अशी मागणी भाजपा युवामोर्चा शहराध्यक्ष भूषण विल्हेकर यांनी नगरपरिषद प्रशासनाकडे केली आहे. त्वरित कारवाई न झाल्यास आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला. निवेदन देतेवेळी भाजपा गटनेते दिनेश पारडे,भूषण विल्हेकर, सागर ठाकूर, मंगेश निकम, सागर तायडे ,नंदकिशोर कपिले, निलेश विल्हेकर, अंकुश पाटणे व असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# मालमत्ता व पाणीपट्टी बिलावर

नील माहेश्वरी यांच्या पुढाकारामुळे आता नगर परिषद क्षेत्रातील प्रत्येक देयकावर 'रक्तदान हेच जीवनदान' हा संदेश ठळकपणे दिसणार आहे.

# वस्ती सुधार योजनेतील कामांना

आले आहेत. बदललेल्या ११२ कामांचे प्रस्ताव ग्रामपंचायत ठराव, प्रमाणपत्रे आणि अंदाजपत्रकासह तातडीने प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करावेत, असे आवाहन जिल्हा समाज कल्याण अधिकारी डी. एम. पुंड यांनी केले आहे.

# मेळघाटातील मजुरांच्या प्रश्नावर

निवेदनात म्हटले आहे , तसेच वर्क कोडची मर्यादा शिथिल करा,सध्या नवीन कामांसाठी 'वर्क कोड' ओपन करण्यावर प्रशासनाने जाचक मर्यादा घातल्या आहेत. यामुळे मजुरांच्या हाताला काम मिळणे कठीण झाले आहे. ही मर्यादा त्वरित शिथिल करून नवीन वर्क कोड खुले करावेत.

**चुरणी तालुका निर्मिती व नायब तहसीलदार नियुक्ती-**

चुरणीला स्वतंत्र तालुक्याचा दर्जा मिळावा ही जुनी मागणी आहे. तोपर्यंत तात्पुरती सोय म्हणून चुरणी आणि काटकुंभ येथे आठवड्याच्या बाजारच्या दिवशी 'नायब तहसीलदार' यांची नियुक्ती करावी, जेणेकरून नागरिकांची कामे स्थानिक पातळीवर होतील.

**वनविभागाची दडपशाही थांबवा-** वनविभाग आणि व्याघ्र प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांकडून वनपट्टेधारक आदिवासी शेतकऱ्यांना नाहक त्रास दिला जात आहे, तो तातडीने थांबवण्यात यावा, अश्या विविध मागण्या यावेळी केल्या. यावेळी जिल्हाध्यक्ष राहुल येवले, कार्याध्यक्ष अनिकेत ढेंगळे, प्रदेश महासचिव रीतेश पांडव, नितेश वानखेडे, उत्कर्ष देशमुख, धारणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रोहित पटेल, मेळघाट विधानसभा अध्यक्ष पियूष मालवीय यांच्यासह संदीप मुंडे, ललिता बेठेकर, रामलाल काळे , विकी राठोड, रामदास कासदेकर , कमलेश राठोड, अमित बेलकर, तुषार गायन, शाहाब भाई, जय झारखंडे, शैलेश कासदेकर, पूनाजी मोरे, धनराज आठोले, चितराम सेलुकर, राजेंद्र कासदेकर , दशरथ येवले, अक्षय घुमावरे व मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

'प्रशासनाने मजुरांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नये. जर होळीपूर्वी मजुरी मिळाली नाही आणि कामांचे मार्ग मोकळे झाले नाहीत, तर युवक काँग्रेस स्टाईलने तीव्र आंदोलन छेडले जाईल.' **-राहुल येवले,** जिल्हाध्यक्ष, युवक काँग्रेस, अमरावती.

# वीजबिल थकवल्याने शेकडो

मिळाली आहे.जुळ्या शहरात हजारो ग्राहकांकडे स्मार्ट मीटर बसवून पूर्ण झाले असून पुढील काळात टप्याटप्याने सर्व ग्राहकांकडे स्मार्ट मीटर बसविले जाणार आहेत. दरम्यान अचलपूर - परतवाडा जुळ्या शहरातील असंख्य ग्राहकांचा वीजपुरवठा महावितरणने वीजबिल न भरल्याने खंडीत केला होता.या पुढील काळात वीजबिल भरण्याची तारिख ओलांडल्यानंतर कोणत्याही क्षणी वीजपुरवठा खंडीत होण्याचा धोका असल्याने वेळेत बिल भरण्याशिवाय पर्यायच उरणार नाही. स्थानिक पातळीवरील कार्यालयाकडे वीजपुरवठा पूर्ववत जोडण्याचा कसलाच अधिकार नसल्याने बिल भरल्यानंतरच वीजपुरवठा पूर्ववत होणार अशी रचना आता तयार झाली आहे.महावितरणच्या स्थानिक कार्यालयाकडे यादी आल्यानंतरच मुंबईतून अशा पध्दतीने वीजपुरवठा खंडीत झाल्याचे अधिका-यांना समजले. महावितरणच्या इतिहासात स्मार्ट मीटर बसल्यांनतर प्रथमच अशा प्रकारे थेट मुंबईतून वीजपुरवठा खंडीत केला गेला.

## जाहीर नोटीस

विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात

**आर.एम.जे.सी.क्र.११७/२०२६** **ने.ता.२०.०३.२०२६**

अर्जदार - **१. श्री.पुंडलिक महादेवराव पडोळे, वय ५६ वर्षे, धंदा - शेती रा.खानापूर, ता.मोर्शी, जि.अमरावती**
**२. केशवराव महादेवराव पडोळे मयतांचे वारस**
**२अ) श्रीमती कमलाबाई केशवराव पडोळे, वय ८३ वर्षे, धंदा -घरकाम**
**२ब) श्री.गजानन केशवराव पडोळे, वय ५० वर्षे, धंदा - शेती**
**२क) श्री.योगेश केशवराव पडोळे, वय ४७ वर्षे, धंदा - शेती**
**२ड) सौ.संगीता संजय व्हाडे, वय ५३ वर्षे, धंदा - घरकाम**
**सर्व रा.खानापूर, ता.मोर्शी, जि.अमरावती**

-- विरुध्द --

गैरअर्जदार- निरंक

**वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत** सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७ **प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे वडील तर अर्जदार नं.२(अ) चे सासरे तर अर्जदार नं.२(ब,क,ड) यांचे आजोबा** नामे महादेव तानाबा पडोळे **हे दि.**०८.०६.१९९३ **रोजी** खानापूर, **ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदार नं.१ ची आई तर अर्जदार नं.२(अ) चे सासू तर अर्जदार नं.२(ब,क,ड) यांची आजी** नामे सोनाबाई महादेवराव पडोळे **ही दि.**१६.०५.२०१९ **रोजी** खानापूर, **ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.**

**दिनांक २३.०२.२०२६**

शिक्का

**आदेशानुसार,**
सहाय्यक अधीक्षक
**दिवाणी न्यायालय, मोर्शी**

## जाहीर नोटीस

विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात

**आर.एम.जे.सी.क्र.११६/२०२६** **ने.ता.२५.०३.२०२६**

अर्जदार - **१. श्रीमती कमलाबाई केशवराव पडोळे, वय ८३ वर्षे, धंदा - घरकाम**
**२. श्री.गजानन केशवराव पडोळे, वय ५० वर्षे, धंदा - शेती**
**३. श्री.योगेश केशवराव पडोळे, वय ४७ वर्षे, धंदा - शेती**
**४. सौ.संगीता संजय व्हाडे, वय ५३ वर्षे, धंदा - घरकाम**
**सर्व रा.खानापूर, ता.मोर्शी, जि.अमरावती**

-- विरुध्द --

गैरअर्जदार- निरंक

**वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत** सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७ **प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ ते ४ यांचे वडील** नामे केशवराव महादेवराव पडोळे **हे दि.**११.१०.२०२१ **रोजी** खानापूर, **ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.**

**दिनांक १३.०२.२०२६**

शिक्का

**आदेशानुसार,**
सहाय्यक अधीक्षक
**दिवाणी न्यायालय, मोर्शी**

## जाहीर नोटीस

विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात

**आर.एम.जे.सी.क्र.११५/२०२६** **ने.ता.२०.०३.२०२६**

अर्जदार - **१. श्री.रमेश बाजीराव मुळे वय ६५ वर्षे, धंदा - शेती रा.हिवरखेड, ता.मोर्शी, जि.अमरावती**

-- विरुध्द --

गैरअर्जदार- निरंक

**वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत** सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७ **प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदाराचे वडील** नामे बाजीराव सूर्यभान मुळे **हे दि.**१६.१०.१९९८ **रोजी** हिवरखेड, **ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदाराची आई** देवकाबाई बाजीराव मुळे **ही दिनांक** २५.०९.१९९४ **रोजी** हिवरखेड, **ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेली आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.**

**दिनांक १३.०२.२०२६**

शिक्का

**आदेशानुसार,**
सहाय्यक अधीक्षक
**दिवाणी न्यायालय, मोर्शी**

**प्रो.क्र.२५४/२०२५**

## वारसाचे प्रमाणपत्राबद्दल जाहीरनामा/सायटेशन नोटीस

मा.विजय जी.परवरे, दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भातकुली, जि.अमरावती यांच्या न्यायालयात

**आर.एम.जे.सी.क्रमांक ६८/२०२६** **ने.ता.३०.०३.२०२६**

अर्जदार :
1. **Babanrao Kashinath Khorgade, Age 79 Yrs. Occu.: Labour R/o. Sawarkheda, Tq. Bhatkuli, Dist. Amravati**
2. **Sumanbai Devidasrao Tipare, Age 72 Yrs. Occu.: Household R/o. Sawarkheda Haturna Tq. Bhatkuli, Dist. Amravati**
3. **Shalutai Dadarao Gawande, Age 68 Yrs. Occu.: Household R/o Chandrawati Nagar, Sai Nagar, Amravati, Tq. & Dist. Amravati**
4. **Ekanath Kashinath Khorgade, Age 69 Yrs. Occu.: Labour R/o. Sawarkheda Haturna Tq. Bhatkuli, Dist. Amravati**
5. **Shakuntala Vishwas Buraghate, Age 67 Yrs. Occu.: Household R/o Near India Gandhi Putala, Jevad Nagar, Amravati, Tq. & Dist. Amravati**
6. **Latabai Sureshsingh Thakur, Age 54 Yrs. Occu.: Household R/o Near Saroj Colony, Sutgirni Road, Jay Nagar, Amravati Tq. & Dist. Amravati**
7. **Lata Narayan Kadu, Age 53 Yrs. Occu.: Household R/o Devara, Tq. & Dist. Amravati**
8. **Jagannath Kashinath Khorgale, Age 51 Yrs. Occu.: Labour R/o Dastur Nagar, Amravati, Tq. & Dist. Amravati**

-- विरुध्द --

गैरअर्जदारः- ग़्त्य

**ज्यापेक्षा** Kashinath Tukaram Khorgade **हे दि.**०५.०७.१९९८ **रोजी मयत झाले आणि** ज्द्रुण्ण्ठ्ठ्ठ्रू ख्ह्ह्मण्त्ह्ह्ण ख्णद्धद्धह्ह्ह्ह **हे दि.**३०.०८.२०१८ **रोजी मयत झाले.अर्जदार** Babanrao Kashinath Khorgade, **Age-79 yrs, Occu- Labour, R/o. Sawarkheda, Tq. Bhatkuli, Dist. Amravat॰ व इतर यांनी** बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम २ प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता **या न्यायालयामध्ये दि.**११.०२.२०२६ **रोजी अर्ज केला आहे. या अर्जाप्रमाणे वरील अर्जदार हे मयत** Kashinath Tukaram Khorgade DeeefCe Vachhalabai Kashinath Khorgade **यांचे वारस आहेत.ते सदरहू अर्जदार फक्त मयत** Kashinath Tukaram Khorgade DeeefCe Vachhalabai Kashinath Khorgade **यांचे वारस नाहीत असे कोणास सांगावयाचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत दाखल करावी. तसेच या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखल न केल्यास सदरहु न्यायालय अर्जदारांना वारसा प्रमाणपत्र बाबत पुरावा घेऊन त्यांना सदरहू अर्जदारांना मयताचे वारस म्हणून घोषित करण्यात येईल आणि त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.**

**आज दिनांक १८.०२.२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.**

शिक्का

**आदेशान्वये,**
**सहायक अधीक्षक,**
**दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर,भातकुली**
**दि.१८/०२/२०२६**

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ मंगळवार, २४ फेब्रुवारी २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

## आमदार साजिद पठाण यांना बिष्णोई गँगकडून धमकी ; वाय दर्जाची सुरक्षा देण्याची मागणी

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

**अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे आमदार साजिद पठाण यांना बिष्णोई लॉरेन्स गँगकडून धमकी मिळाल्याची माहिती समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर आमदार पठाण यांना तात्काळ वाय दर्जाची सुरक्षा तसेच एक स्कॉर्टिंग गाडी उपलब्ध करून देण्याची मागणी वाशिम येथील महाविकास आघाडीच्या नगरसेवकांनी पोलीस अधीक्षकांना दिलेल्या निवेदनात केली आहे.**

### महाविकास आघाडीचे नगरसेवकांचे जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन



१७ फेब्रुवारी रोजी अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेस आमदार साजिद पठाण यांना लॉरेन्स बिश्नोई गँग कडून १० कोटीच्या खंडणीची मागणी करण्यात आली . १० कोटी द्या नाहीतर तुझा गेम करू अशी धमकी देखील देण्यात आली आहे.ही घटना गंभीर असून कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने चिंताजनक आहे.त्यामुळे आज वाशीम येथील महाविकास आघाडीच्या नगरसेवकांनी जिल्हा पोलीस अधीक्षक, वाशिम यांना निवेदन देऊन आमदार साजिद पठाण यांच्या सुरक्षेबाबत तातडीने योग्य उपाययोजना करण्याची मागणी केली.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, आमदार साजिद पठाण यांना मिळालेली धमकी ही गंभीर स्वरूपाची असून त्यांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे राज्य शासनाने तातडीने दखल घेऊन आमदार पठाण यांना वाय दर्जाची सुरक्षा देऊन स्कॉर्टिंग वाहन उपलब्ध करून द्यावे.यावेळी महाविकास आघाडीचे नगरसेवक शेख रशीद(नूर भाई), नगरसेवक साबीर बेग मिर्जा यांच्यासह मजहर अहेमद,अजीमोद्दीन,नईम शाह, अलताफ शाह,शेख आफताब,सय्यद अलीम, मुजाहिद अली, शेख, वाजीद, दाऊद हुसेन,अरबाज खान,शेख अजीज ,शेख मतीन, शेख आसिफ ,जिया मिर्जा,नसीब मिर्जा, आणि कार्यकर्ते मोठ्या संख्यने उपस्थित होते.



## महाराष्ट्रातील सर्व समाज घटकातील विद्यार्थ्यांसाठी पदवीपर्यंतचे शिक्षण मोफत करा

### रिपाइंचे तेजराव वानखेडे यांचे आठवलेंना साकडे

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

महाराष्ट्रातील सर्व समाज घटकातील विद्यार्थ्यांसाठी पदवीपर्यंतचे शिक्षण मोफत करण्यात यावे अशी मागणी रिपाइं आठवले गटाचे जिल्हाध्यक्ष तेजराव वानखेडे यांनी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांना साकडे घातले.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवलेचे जिल्हाध्यक्ष वानखेडे यांनी शुक्रवारी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांची मुंबई येथे भेट घेऊन त्यांना केरळ राज्याप्रमाणे महाराष्ट्रात सरकारी आणि अनुदानित महाविद्यालयांमध्ये पदवीपर्यंत व पदवित्तरचे शिक्षण सर्व समाजातील घटकांना पूर्णपणे मोफत करण्याकरिता येणाऱ्या २०२६-२७ या आर्थिक अर्थसंकल्पात तरतूद करून निर्णय घेण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांना सूचना देण्यात यावी अशी मागणी केली.

केरळ सरकारने विधानसभेत अर्थसंकल्प सादर करताना पदवीपर्यंत शिक्षणाचे द्वार सर्व समाज घटकांना मोफत केले आहेत.त्याचप्रमाणे महाराष्ट्र सरकारने सुद्धा सर्व समाज घटकातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी ट्युशन फीच्या चिंतेतून मुक्तता मिळण्याकरिता पदवीपर्यंत शिक्षण मोफत करावे.केवळ मोफत शिक्षणच नव्हे तर शिक्षणाचा दर्जा सुद्धा सुधारण्यासाठी सरकारने भरीव तरतुदी कराव्या,राज्यातील विद्यापीठांच्या विकास कामासाठी आणि सोयी सुविधासाठी कोट्यावधीचा निधी जाहीर



करावा,उच्च शिक्षणात संशोधनाला (रिसर्च) चालना देण्यासाठी सरकारने पीएचडी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी व बाहेर देशामध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त शिष्यवृत्ती जाहीर करावी,ज्या विद्यार्थ्यांना इतर कोणत्याही प्रकारची शिष्यवृत्ती मिळत नाही त्यांना सुद्धा याचा लाभ देण्यात यावा तसेच आर्थिक परिस्थितीमुळे अनेक विद्यार्थी बारावीनंतरचे शिक्षण सोडतात म्हणून महाराष्ट्र सरकारने पदवीपर्यंत शिक्षण मोफत करण्याचा निर्णय घेऊन हजारो पदवीधर विद्यार्थ्यांचे स्वप्न पूर्ण करावे.त्याचप्रमाणे सरकारने शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे,जैवशास्त्र,माहिती व तंत्रज्ञान,कृषी संशोधन व फलोत्पादन,कृषी औद्योगिक या क्षेत्रात महाराष्ट्रातील विद्यार्थी मागे राहू नयेत त्यांना देखील आंतरराष्ट्रीय दर्जाचे ज्ञान मिळावे याचा विचार करून शैक्षणिक कार्य हाती घ्यावे व राज्याला शिक्षण क्षेत्रातील प्रगतशील राज्य म्हणून घोषित करावे इत्यादी मागण्या वानखेडे यांनी नामदर आठवले यांच्याकडे केली आहे.

## बेलोरा येथील दांपत्याचा समृद्धी महामार्गावर अपघातात मृत्यू

**■ प्रतिनिधी | मानोरा ■**

तालुक्यातील बेलोरा गावचे निवासी आणि रोजगारासाठी मुंबईला गेलेले दादाराव प्रल्हाद शिंदे व त्यांची पत्नी सोनू दादाराव शिंदे हे समृद्धी महामार्गावर खाजगी वाहनाने प्रवास करीत असताना अज्ञात वाहनाच्या धडकेत जागीच ठार झाल्याची दुर्दैवी घटना घडल्याने या दांपत्याचे मुले उघड्यावर पडली आहेत.

शिंदे दांपत्य मोलमजुरीवर आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवीत होते मुंबईमध्ये रोजगारासाठी हे दांपत्य स्थलांतरित झाले होते. स्व मालकीच्या एम.एच.१९ एई १५० या चार चाकी खाजगी वाहनाने ते आपल्या बेलोरा ह्या गावी परतत असताना शिर्डी कोपरगाव दरम्यान समृद्धी महामार्गावर आज सकाळी झालेल्या भीषण अपघातात शिंदे दांपत्याची रणज्योत मालवली.

महामार्गावर पंचर झालेल्या ट्रकला शिंदे दांपत्य प्रवास करीत असलेल्या खाजगी कारणे मागून धडक दिल्याने हा अपघात घडला.

अपघातात मृत्युमुखी पडलेल्या शिंदे दांपत्याला एक मुलगा व एक मुलगी असल्यामुळे मोलमजुरी करीत असलेल्या ह्या मुला मुलींवर संकटाचे डोंगर कोसळल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे.

## मंगरूळपीर तालुक्यात बालविवाह रोखला

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

वाशिम जिल्ह्यातील मंगरूळपीर तालुक्यातील ग्राम शिवणी येथे होऊ घातलेला सोळा वर्षीय बालिकेचा बालविवाह प्रशासनाच्या तात्काळ व समन्वयित कारवाईमुळे वेळेत रोखण्यात आला. सदर प्रकरणाबाबत चाईल्ड लाईन १०९८ या टोल-फ्री क्रमांकावर गोपनीय माहिती प्राप्त झाली होती. माहिती मिळताच संबंधित बालिकेच्या वयाची तातडीने खातरजमा करण्यात आली.

यानंतर जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी उत्तम शिंदे, परिविक्षा अधिकारी गणेश ठाकरे व जिल्हा बाल संरक्षण अधिकारी भगवान ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली संयुक्त पथकाची स्थापना करण्यात आली. क्षेत्रीय कार्यकर्ता एकनाथ राठोड व जिल्हा प्रकल्प सहाय्यक (AVA,

### प्रशासनाची तात्काळ कारवाई




नीती आयोग) नीलिमा भोंगाडे यांनी घटनास्थळी भेट देऊन बालिका व तिच्या पालकांचे समुपदेशन केले.

समुपदेशनादरम्यान बालविवाह प्रतिबंधक अधिनियम, २००६ अंतर्गत होणाऱ्या कायदेशीर कारवाईची माहिती, अल्पवयीन विवाहामुळे होणारे आरोग्यविषयक धोके तसेच मुलीच्या शिक्षण व भवितव्यावर होणारे दुष्परिणाम याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. त्यानंतर मुलीचे वय पूर्ण १८ वर्षे होईपर्यंत विवाह करणार नाही, असे पालकांकडून लेखी हमीपत्र घेण्यात आले. त्यामुळे होऊ घातलेला बालविवाह यशस्वीरित्या रोखण्यात आला.

महिला व बाल विकास विभाग व चाईल्ड लाईन १०९८ यांच्या सतर्कतेमुळे एका बालिकेचे बालपण व भविष्य सुरक्षित झाले आहे. जिल्ह्यात बालविवाह प्रतिबंधक अधिनियम, २००६ ची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी बालविवाह होत असल्यास तात्काळ चाईल्ड हेल्पलाईन १०९८ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी उत्तम शिंदे यांनी केले आहे.

## 'स्कूल ऑफ ऑक्सफर्ड' चे स्नेह संमेलन उत्साहात



**■ प्रतिनिधी | मानोरा ■**

येथील 'इंडियाज फाउंडेशन स्कूल ऑफ ऑक्सफर्ड' मानोरा यांचे दोन दिवशीय वार्षिक स्नेहसंमेलन थाटात पार पडले .कार्यक्रमाचे उदघाटक म्हणून मानोरा नगरपंचायत चे अध्यक्ष हेमेंद्र ठाकरे तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शिक्षक आमदार अमरावती विभागीय संघ श्री ?ड किरणराव सरनाईक हे उपस्थीत होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून मानोरा पोलीस स्टेशनचे ठाणेदार नयना पोहेकर, केंद्रप्रमुख शिवाजीनगर सुधीर काळे, इंडिया फाउंडेशन स्कूल ऑफ ऑक्सफर्ड मानोरा चे अध्यक्ष सचिन चव्हाण तसेच इतर मान्यवरांची उपस्थिती होती.

सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते माता सरस्वती व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूजन व माल्यार्पण करण्यात आले.नगराध्यक्ष हेमेंद्र ठाकरे, आमदार किरणराव सरनाईक यांनी यावेळी विचार व्यक्त केले व शाळा, संस्थेच्या यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्यात.

## पिक विम्याची रक्कम रखडली; पातूरचे शेतकरी आक्रमक

### शेतकरी राजा ग्रुपचे जिल्हा कृषी अधिकाऱ्यांना निवेदन; १६ मार्चला ठिय्या आंदोलनाचा इशारा



**■ प्रतिनिधी | खेट्री ■**

तालुक्यात २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे सोयाबीन, कापूस, उडीद, मुग, ज्वारी व तूर या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. मात्र अद्यापही शेतकऱ्यांना पिक विम्याची रक्कम मिळालेली नसल्याने शेतकरी आक्रमक झाले आहेत. या पार्श्वभूमीवर शेतकरी राजा ग्रुपच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी २३ फेब्रुवारी रोजी जिल्हा कृषी अधिकाऱ्यांना निवेदन सादर करून तात्काळ विमा रक्कम वितरित करण्याची मागणी केली.

राज्य सरकारने अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी १७ हजार रुपयांची मदत जाहीर केली होती. तसेच पिक कापणी प्रयोगांनुसार उत्पादन सरासरीपेक्षा कमी आढळल्याने शेतकऱ्यांना विमा मिळणे अपेक्षित होते. मात्र अद्याप कोणतीही मदत न मिळाल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. खरीप हंगामातील नुकसानीमुळे अनेक शेतकऱ्यांवर कर्जाचा बोजा वाढला असून पुढील हंगामाची तयारीही अडचणीत आली आहे. विमा रक्कम तात्काळ न दिल्यास १६ मार्च रोजी अकोला येथील जिल्हा कृषी कार्यालयासमोर शेकडो शेतकरी ठिय्या आंदोलन करतील, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

यावेळी शेतकरी राजा ग्रुपचे रवि सोनोने, गणेश ताले, ज्ञानेश्वर गाडगे, राहुल ताले, सोपान माडोकार, दशरथ सरदार, अतुल अमानकर, संजय शर्मा आदी शेतकरी उपस्थित होते.

> 'पातूर तालुक्यात अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतकरी आत्महत्येच्या उंबरठ्यावर असून त्यांना तात्काळ आर्थिक मदत देणे गरजेचे आहे. अन्यथा १६ मार्च रोजी जिल्हा कृषी कार्यालयात ठिय्या आंदोलन करण्यात येईल.'
>
> **- राहुल सुभाष ताले,**
> शेतकरी राजा ग्रुप


### कार्यालय नगर परिषद खामगांव जिल्हा बुलडाणा

**निविदा सुचना**

सार्व. बांध. वि. क्र. -१८१७ दिनांक २३/०२/२०२६

खामगाव नगर परिषद अंतर्गत खालील कामे करून घेण्या करीता कंत्राटदारा कडून निविदा प्रपत्रात ऑनलाईन प्रणालीव्दारे निविदा मागवित आहे. नगर परिषद खामगाव मालकीच्या जनुना तलाव येथे जलाशयावर मर्यादित क्षेत्रात पर्यटकांना बोटिंग व जलक्रीडा सुविधा पुरविणे
2026_DMA_1280482_1

निविदा भरण्याचा अंतिम दिनांक ०४/०३/२०२६ राहील शर्ती व इतर तपशील, http:www/mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे

**मुख्याधिकारी**
नगर परिषद खामगाव


## गुरुकुल विद्यालय कोळी कारंजा येथे शिवजयंती उत्साहात साजरी



**■ प्रतिनिधी | कारंजा ■**

गुरुकुल विद्यालय कोळी कारंजा येथे आज दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भव्यदिव्य शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक व पारंपरिक कलाप्रकारांनी उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्राच्या पारंपरिक लेझीम नृत्याने झाली. यावेळी विद्यार्थ्यांनी मानवी मनोरे उभारत आपल्या शिस्तबद्ध सादरीकरणातून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. शिवाजी महाराजांच्या बालपणाची आठवण करून देणारा शिवाजी महाराजांचा पाळणा हा नृत्यप्रकार विशेष आकर्षण ठरला. तसेच शिवकालीन लाठी–काठीचे भव्य प्रदर्शन सादर करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्यालयाचे प्राचार्य अमोल राऊत यांनी भूषविले. तर प्रमुख अतिथी व प्रमुख वक्ते म्हणून योगेशजी निघोट उपस्थित होते. त्यांनी आपल्या प्रभावी भाषणातून शिवाजी महाराजांचे जीवन, पराक्रम व आदर्श विद्यार्थ्यांसमोर मांडले.

## मराठी भाषेची बाराखडी बदलवणारा कवी म्हणजे लोकनाथ यशवंत - डॉ उत्तम अंभोरे

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

अनेक मार्गांनी चिंतन करणारा माणूस म्हणजे लोकनाथ यशवंत.अनेक पारंपरिक लोकांनी कवितेच्या मांडणी आणि शैलीच्या संदर्भाने फसवणूक केली.विविध प्रकारे लबाडी केली पण लोकनाथ यशवंत यांच्या कवितेने समकाळाच्या कवितेला प्रतिष्ठा मिळवून दिली.लोकनाथ यशवंत हा कवी माणसं वाचणारा,माणसं जाणून घेणारा कवी आहे असे प्रतिपादन वाशीम येथे लोकनाथ यशवंत यांच्या जाहिर सत्कारा दरम्यान संभाजीनगर येथील ज्येष्ठ विचारवंत, समीक्षक आणि कवी, डॉ.उत्तम अंभोरे यांनी केले.

विसावे विद्रोही मराठी साहित्य संमेलन नांदेडच्या अध्यक्षपदी कवी लोकनाथ यशवंत यांची निवड झाल्याबद्दल वाशीम येथील आंबेडकरवादी साहित्यिक सन्मित्र समितीच्या वतीने वाशीमकर साहित्य प्रेमींनी लोकनाथ यशवंत यांच्या सत्काराचे आयोजन स्थानिक सर्किट हाऊस येथे करण्यात आले होते.



यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. उत्तम अंभोरे ज्येष्ठ विचारवंत, समीक्षक, संभाजीनगर, होते तर प्रमुख उपस्थिती, ज्येष्ठ कवी, संजय वरकड, गोपाळराव आटोटे गुरुजी,तेजराव वानखेडे,कवी,भाऊ भोजणे,जग्गु राऊत आदिंची होती. लोकनाथ यशवंत यांच्या कवितेची वरवर सहज वाटणारी भाषा ही आतून सखोल आणि गंभीर वळणाने जाणारी आहे.कमी शब्दात व्यापक अर्थ आशयांकित त्यांची कविता आहे. शोषण आणि दुःखाच्या मुळांचा शोध घेणारी त्यांची कविता आहे,असे भाष्य करुन लोकनाथ यशवंत यांच्या अनेक कवितेची बलस्थानं कशी आहेत याची सविस्तर चिकित्सा करत लोकनाथच्या अनेक कवितांचे वाचन डॉ. उत्तम अंभोरे यांनी केले.यावेळी प्रमुख उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.सत्कारा दरम्यान सत्काराला उत्तर देताना कवी लोकनाथ यशवंत यांनी आपल्या अनुभवाचे अनेक किस्से सादर केले.कवितेने आपल्याला काय दिले हे सांगताना ते म्हणाले, कवितेने मला भाकर दिली,घर दिले,पद दिले, प्रतिष्ठा दिली.जगण्याची ऊर्जा दिली.

## विद्यार्थ्यांच्या भल्यासाठी पालकांनी शाळेच्या पाठीशी उभे राहावे : डॉ.अभय पाटील

**■ प्रतिनिधी | रिसोड ■**

' पूर्वीच्या काळी गावातील लोक पूर्णपणे विश्वास ठेवून मुलांना घडवण्याची जबाबदारी शिक्षकांवर सोपवायचे.शिस्त व अभ्यासात कोणतीही तडजोड दोघेही खपवून घेत नसत.म्हणूनच प्रज्ञावान व शिस्तप्रिय पिढ्या घडायच्या.पण हल्ली शालेय शिस्त व शिक्षण व्यवस्थेत पालकांच्या अनाठायी हस्तक्षेप वाढत चालल्याने त्यात मुलांचे नुकसान होऊ शकते... ' असे प्रतिपादन प्रा.डॉ.अभय पाटील यांनी पालक मेळाव्याच्या निमित्ताने केले.

दि. २१ फेब्रुवारी २०२६ रोजी सद्भावना प्रतिष्ठानणने आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय रंगभरण स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा तसेच विद्यार्थी-पालक मेळावा रंगला होता.यावेळी विविध मान्यवरांनी आपली मार्गदर्शनपर मते मांडली. सामाजिक उत्तरदायीत्वाच्या भावनेने स्थापन झालेल्या

### पालक मेळाव्यात केले संबोधित...



कळमगव्हाण ता.रिसोड,जि.वाशिम येथील सद्भावना प्रतिष्ठाणने यावर्षी पहिल्यांदाच शालेय विद्यार्थ्यांसाठी जिल्हास्तरीय रंगभरण स्पर्धा घेतल्या होत्या.त्याचा भव्य बक्षीस वितरण सोहळा व त्याच्याच जोडीला विद्यार्थी- पालक मेळावा असा संयुक्त कार्यक्रम उत्साहाच्या व आनंदाच्या वातावरणात संपन्न झाला. यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ.अभय पाटील,इंग्रजी विभागप्रमुख मे.ए.सो. महाविद्यालय मेहकर, प्रा.डॉ.गणेश सावजी,मराठी भाषा विभाग प्रमुख तथा मोडीलिपी तज्ज्ञ,तसेच सद्भावना प्रतिष्ठाण चे अध्यक्ष श्रीनिवास गाडे , उपाध्यक्ष विष्णू जुनघरे ,सचिव परशराम मोरे,कळमगव्हाण च्या सरपंच सुनीता ताई खंदारे,उपसरपंच सविता जाधव,शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा पल्लवी मोरे ,ग्रंथपाल प्रवीण जोशी, जेष्ठ नागरिक आत्माराम मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

विद्यार्थी आणि पालकांच्या उपस्थितीत रंगलेल्या या सोहळ्याचा प्रारंभ राष्ट्रगीत व महापुरुषांच्या प्रतिमापूजनाने झाला.त्यानंतर पालक व सर्व विद्यार्थी यांसाठी मार्गदर्शन सत्र पार पडले.यावेळी प्रा.गणेश सावजी यांनीही उपस्थित विद्यार्थी व पालकांना अभ्यास, शिस्त,करियर बाबत मार्गदर्शन केले.

सामाजिक भावनेतून आम्हाला भविष्यातही मुलांसाठी व गरजू घटकांसाठी विविध कार्यक्रम व उपक्रम घ्यायचे आहेत.अशी भावना सद् ?भावना प्रतिष्ठाणचे अध्यक्ष श्रीनिवास गाडे यांनी बोलतेवेळी व्यक्त केली. यानंतर जिल्हास्तरीय बक्षीस पात्र सर्व विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक कोळगाव खुर्द चे शिक्षक सुशील मालवी यांनी केले.तर मुख्याध्यापक विनोद शेजुळ यांनी कार्यक्रमाबद्दल आभार प्रदर्शन केले.सूत्रसंचालन अशोक इंगळे यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गजानन सोमटकर , नारायण बोरकर , गणेश मोरे, शिव जुनघरे यांनी व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

जनमाध्यम
paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ८९ ■ मंगळवार २४ फेब्रुवारी २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु

# वादळ-गारपीटीने शिवार उध्वस्त; हातातोंडाशी आलेला घास हिरावला

## हिंगणघाट-समुद्रपूर तालुक्यात वादळी पाऊस; उभ्या पिकांचे मोठे नुकसान




**वर्धा जनमाध्यम :** आभाळ दाटून आले आणि क्षणात निसर्गाने रौद्ररूप धारण केले. सोमवारी दुपारी वादळी वाऱ्यासह कोसळलेल्या पावसाने आणि काही ठिकाणी झालेल्या गारपीटीने जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले. हवामान विभागाने दिलेला इशारा खरा ठरला, मात्र त्याचा सर्वाधिक फटका बसला तो शिवारात उभ्या असलेल्या रब्बी पिकांना. गेल्या काही दिवसांपासून ढगाळ वातावरण होते. गहू कापणीच्या उंबरठ्यावर, हरभरा साठवणीसाठी तयार, तर कपाशीची अखेरची वेचणी सुरू होती. अशा वेळी अचानक आलेल्या अवकाळीने सर्व गणितच बिघडवले. हिंगणघाट आणि समुद्रपूर तालुक्यात अनेक गावांमध्ये वादळी वाऱ्यासह पाऊस झाला, तर काही भागात बोराएवढ्या गारांनी शिवार पांढरे झाले.

वादळी वाऱ्यांच्या झोताने गव्हाची पिके जमिनीवर आडवी पडली. कापणी करून ठेवलेले हरभरा व तूर भिजल्याने त्यांची गुणवत्ता घसरली आहे. शेवटच्या टप्प्यात असलेली कपाशी ओलाव्याने खराब होण्याची भीती व्यक्त होत आहे. शेतकरी हातात आलेले पीक डोळ्यांसमोर खराब होताना पाहत होते.

**गाडेगाव परिसराला सर्वाधिक फटका-** हिंगणघाट तालुक्यातील कानगाव, गाडेगाव, अलमडोह, अल्लीपूर, रोहणखेडा, नांदगाव, टाकळी दरणे व चाणकी शिवारात दुपारी जोरदार वादळी पाऊस झाला. गहू, हरभरा, रब्बी ज्वारी, तूर व कपाशीचे मोठे नुकसान झाले आहे. काही ठिकाणी वाऱ्याच्या वेगामुळे डेरेदार वृक्ष उन्मळून पडल्याची माहितीही मिळाली.

**मांडगावमध्ये गारपीट**

समुद्रपूर तालुक्यातील मांडगाव परिसरात दुपारी तीनच्या सुमारास अचानक गारपीट झाली. गारांच्या माऱ्याने पिकांचे नुकसान वाढले. शेतकऱ्यांनी तातडीने पंचनामे करून आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी प्रशासनाकडे केली आहे.

अगोदरच उत्पादन खर्च वाढ, बाजारभावातील अनिश्चितता आणि कर्जाचा ताण यामुळे शेतकरी अडचणीत आहेत. त्यात या अवकाळी संकटाने जखमेवर मीठ चोळले आहे. हातात आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला, अशी व्यथा शेतकरी व्यक्त करत आहेत.

आता प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्तांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. अन्यथा, शिवारात उगवलेल्या या हताशेच्या सावल्या आणखी गडद होतील, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

# रस्त्यावरचा 'बाजारबट्टा' की प्रशासनाची शरणागती !

### मंगळवारच्या बाजाराने सेलूची वाहतूक ठप्प; आज कारवाईची निर्णायक वेळ



**सेलू जनमाध्यम-** सेलू शहरातील मंगळवारचा आठवडी बाजार आता जनतेसाठी सोयीचा नसून डोकेदुखी ठरू लागला आहे. बोर नदीच्या पुलापासून ते जुन्या रस्त्यावरील जिमपर्यंत मुख्य रस्त्यावरच दुकाने थाटली जात असल्याने वाहतुकीचा पूर्ण बोजवारा उडाला आहे. बाजार भरतो तो उत्साहाने पण संपतो तो अपघात, कोंडी आणि वादांच्या सावटाखाली

मुख्य रस्त्यावरच भाजीपाला, कपडे, फळे, खेळणी यांची दुकाने उभारली जातात. परिणामी वाहनांना जाण्यासाठी जागाच राहत नाही. चारचाकी वाहनांना वळसा घ्यावा लागतो, तर दुचाकीस्वारांना अक्षरशः जीव मुठीत धरून मार्ग काढावा लागतो. गेल्या काही आठवड्यांत किरकोळ अपघातांची संख्या वाढल्याची माहिती समोर येत आहे. सायंकाळच्या गर्दीत परिस्थिती आणखी गंभीर बनते.

नगरपंचायतीकडे बाजारासाठी स्वतंत्र जागा उपलब्ध आहे. मात्र काही विक्रेत्यांनी ती जागा नाकारून मुख्य रस्त्यावरच बसण्याचा हट्ट धरला आहे. आम्ही रस्त्यावरच बसणार अशी उघड भूमिका घेत प्रशासनालाच आव्हान दिले जात आहे. हा हट्ट नेमका कोणाच्या पाठबळावर टिकून आहे, याबाबत शहरात कुजबुज सुरू आहे.

मुख्याधिकारी अनुप अग्रवाल यांनी विक्रेत्यांना नियोजित जागेत स्थलांतर करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र आदेशांची अंमलबजावणी होईल का, हा मोठा प्रश्न आहे. कारण यापूर्वीही कारवाईच्या घोषणा झाल्या; पण प्रत्यक्षात कोणतीही ठोस पावले उचलली गेली नाहीत, अशी टीका नागरिक करीत आहेत.

दरम्यान, या बाजारातून नगरपंचायतीला दरवर्षी लाखो रुपयांचा महसूल मिळतो. तरीही मूलभूत सुविधा, पार्किंग व्यवस्था, सुरक्षा उपाय किंवा नियोजन यांचा अभाव प्रकर्षाने जाणवतो. महसूल गोळा करण्यात प्रशासन तत्पर; पण नियोजनात मात्र शून्य, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करीत आहेत. सायंकाळच्या गर्दीत अंधाराचा फायदा घेत दुचाकी चोरीच्या घटनाही वाढल्याची चर्चा आहे. महिलांच्या सुरक्षिततेचाही मुद्दा गंभीर बनला आहे. बाजार भरतो; पण शिस्त मात्र कोलमडते, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. आजचा मंगळवार प्रशासनासाठी खऱ्या अर्थाने अग्निपरीक्षा ठरणार आहे. रस्त्यावरचे अतिक्रमण हटवून शिस्त प्रस्थापित केली जाईल की पुन्हा एकदा दबावापुढे झुकून कारवाई टळेल सेलूकरांच्या मनात एकच प्रश्न घुमतो आहे, रस्ता मोकळा होणार की प्रशासनच माघार घेणार?

# 'रामभरोसे' पशुवैद्यकीय दवाखाना : अंतोऱ्यात महिनाभर कुलूप


### माजी सरपंचांचा आंदोलनाचा इशारा

**आष्टी (शहीद) जनमाध्यम :** आष्टी तालुक्यातील अंतोरा (नवीन गाव) येथील माणिकनगर ग्रामपंचायत हद्दीत सुरू झालेला पशुवैद्यकीय दवाखाना गेल्या महिनाभरापासून कुलूपबंद असून शेतकरी व पशुपालकांमध्ये संतापाचे वातावरण पसरले आहे. जनावरे आजारी असतानाही दवाखान्यात डॉक्टर उपलब्ध नसल्यामुळे हा दवाखाना रामभरोसे ठरला आहे.

दि. २३ रोजी दोन शेतकरी आपली आजारी गायी-म्हशी घेऊन दवाखान्यात आले असता त्यांना कुलूप लावलेला दिसून आले. डॉक्टर किंवा कर्मचारी कोणीही हजर नसल्याने शेतकऱ्यांना परत जावे लागले. दवाखाना आहे, पण सेवा नाही; इमारत आहे, पण उपचार नाही, असे म्हणत शेतकरी संतप्त आहेत.

माजी सरपंच देविदास पाथरे यांनी अनेकदा प्रशासनाकडे निवेदने दिली, मात्र त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. पाथरे म्हणाले, शेतकऱ्यांच्या जनावरांचे आरोग्य अत्यंत महत्त्वाचे आहे. तातडीने डॉक्टर नियुक्त करून दवाखाना सुरू ठेवला नाही, तर आंदोलन होईल.

गावकऱ्यांच्या मते, पशुधन ही ग्रामीण अर्थव्यवस्थेची कणा आहे. सरकारच्या योजनांचा प्रचार झाला तरी प्रत्यक्षात दवाखान्याचा बंद असणे शेतकऱ्यांसाठी मोठा फटका आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालून



दवाखाना नियमित सुरू करावा, अशी संतप्त मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.

# दौऱ्याला विराम देत खा. अमर काळे यांची सांत्वन भेट

### सावरखेड येथील ज्येष्ठ कॉंग्रेस कार्यकर्ते विलास वानखेडे यांना श्रद्धांजली ; एक खंबीर सहकारी गमावला



विरूळ (आ) जनमाध्यम : सावरखेड येथील कॉंग्रेसचे ज्येष्ठ कार्यकर्ते व माजी उपसरपंच विलास वानखेडे यांच्या निधनाने गावात शोकमग्न वातावरण निर्माण झाले आहे. निधनाची माहिती मिळताच खा. अमर काळे यांनी नियोजित दौरा स्थगित करून तातडीने वानखेडे कुटुंबीयांची भेट घेतली व सांत्वन केले. पक्षाचा एक खंबीर, निष्ठावंत सहकारी हरपला, अशा शब्दांत खासदार काळे यांनी दुःख व्यक्त केले. वानखेडे यांनी गावपातळीवर कॉंग्रेस संघटन उभे करण्यासाठी आयुष्य झोकून दिले. माजी उपसरपंच म्हणून त्यांनी विकासकामांत पुढाकार घेत जनतेचा विश्वास संपादन केला होता.यावेळी कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष मनोज चांदुरकर यांच्यासह मुकेश कराळे, सचिन वैद्य, रवी देशमुख, योगेश जाधव, सचिन देवताळे, सुरेश चाफले, गजानन निकम, नरेंद्र सावरकर, बबन निकम तसेच असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते. सर्वांनी वानखेडे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.सावरखेड परिसरात त्यांच्या निधनामुळे मोठी पोकळी निर्माण झाली असून, त्यांच्या कार्याची परंपरा समाजाला प्रेरणा देत राहील, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# ५१ लाख विद्यार्थ्यांचे सामूहिक गायन; हिंद-दी-चादर, बोले सो निहाल चा जयघोष

### गुरु तेग बहादूरांच्या ३५० व्या शहिदी समागमानिमित्त ऐतिहासिक उपक्रम

**नवी मुंबई जनमाध्यम :** कोकण विभागातील सुमारे २० हजार शाळांमधील तब्बल ५१ लाख विद्यार्थ्यांनी सोमवारी एकाच वेळी 'हिंद-दी-चादर' हे गीत सादर करत सामूहिक गायनाचा विश्वविक्रम नोंदवला. मानवतेच्या रक्षणासाठी बलिदान देणारे गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहिदी समागमानिमित्त हा उपक्रम राबविण्यात आला. या विक्रमाची नोंद भारतातील सर्वोत्तम रेकॉर्ड्स ने अधिकृतरीत्या घेतली आहे.

नेरुळ येथील गुरु गोविंदसिंग एज्युकेशन अकॅडमी येथे मुख्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सकाळी नेमके ९ वाजता विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध पद्धतीने सामूहिक गायन केले. सुप्रसिद्ध गायक सतिंदर सरताज यांनी गायलेले 'हिंद-दी-चादर' हे गीत एकाच सुरात सादर करत विद्यार्थ्यांनी अभूतपूर्व एकात्मतेचे दर्शन घडवले.



कार्यक्रमाला नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील, उपमहापौर दशरथ भगत, विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

महापौर पाटील यांनी सांगितले की, गुरु तेग बहादूर यांचे बलिदान संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून खारघर, सेक्टर २९ येथे २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी भव्य शहिदी समागमाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

विभागीय आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाचे कौतुक केले.

# मातीकला बोर्डाला ५० कोटींची ग्वाही

## कुंभार समाजाच्या मागण्यांसाठी सरकारदरबारी लढा ; डॉ. पंकज भोयर




### ङ वर्ध्यात राज्यव्यापी मेळावा; प्रतिनिधित्व, आरक्षण, खाणी, मानधनासह आठ ठराव एकमताने मंजूर

**वर्धा जनमाध्यम :**श्री संतशीरोमणी गोरोबा काका मातीकला बोर्डाला येत्या अर्थसंकल्पात किमान ५० कोटींची तरतूद करून तो तात्काळ सुरू करण्यासाठी स्वतः लक्ष घालून पाठपुरावा करणार आहे. कुंभार समाजाच्या प्रलंबित मागण्यांवर शासनदरबारी ठाम भूमिका मांडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात न्याय मिळवून देऊ, असे आश्वासन राज्याचे राज्यमंत्री तथा वर्ध्याचे पालकमंत्री डॉ. भोयर यांनी दिले.

येथील हेरिटेज सभागृहात सकल कुंभार समाज विकास परिषदेच्या वतीने आयोजित राज्यव्यापी कुंभार समाज मेळावा व सत्कार सोहळा पार पडला. राज्यभरातून आलेल्या समाजबांधवांच्या उपस्थितीत समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आठ महत्त्वपूर्ण मागण्यांवर सविस्तर चर्चा होऊन सर्व ठराव एकमताने मंजूर करण्यात आले.

परिषदेत श्री संत गोरोबा काका महाराष्ट्र माती कला बोर्ड तात्काळ कार्यान्वित करणे ही प्रमुख मागणी ठरली. बोर्डासाठी किमान ५० कोटी रुपयांची तरतूद करण्याबरोबरच संत गोरोबा काका यांचे जन्मस्थान तेर (जि. धाराशिव) या तीर्थक्षेत्राचा देहू-आळंदीप्रमाणे विकास आराखडा तयार करण्याची मागणी करण्यात आली. कुंभार समाजाला विधानपरिषदेत प्रतिनिधित्व देण्याचाही ठराव मंजूर झाला.

कुंभार समाजाच्या पारंपरिक व्यवसायातील अडचणींचा आढावा घेत मातीवरील रॉयल्टी पूर्णपणे माफ करावी, समाजासाठी राखीव खाणीवरील अतिक्रमण हटवावे तसेच मध्य प्रदेश शासनाच्या ९ फेब्रुवारी २०२६ च्या परिपत्रकाच्या धर्तीवर महाराष्ट्रात स्वतंत्र कुंभार खाणी उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीत कुंभार समाजाच्या उत्पादन-विक्रीसाठी प्राधान्याने जागा उपलब्ध करून द्यावी, पारंपरिक मातीकलेला राजाश्रय द्यावा आणि वयोवृद्ध कारागिरांना दरमहा पाच हजार रुपये मानधन द्यावे, अशीही मागणी परिषदेतून पुढे आली. भटकंती स्वरूपाचा समाज म्हणून एनटी प्रवर्गात समावेश करून दोन टक्के स्वतंत्र आरक्षण देण्याची मागणीही करण्यात आली. आयटीआयमध्ये कुंभार कला व मूर्तिकला विषय सुरू करून पारंपरिक कलेचे संवर्धन करण्यावर भर देण्यात आला.

मेळाव्यात नवनिर्वाचित नगरसेवक, जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांचा सत्कार करण्यात आला. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या समाजबांधवांना समाज भूषण व समाज गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

उत्स्फूर्त प्रतिसाद, ठोस ठराव आणि सरकारदरबारी पाठपुराव्याची ग्वाही यामुळे वर्ध्यातील हा मेळावा केवळ औपचारिक कार्यक्रम न ठरता, कुंभार समाजाच्या प्रश्नांना राजकीय पातळीवर बळ देणारा टप्पा ठरल्याची प्रतिक्रिया उपस्थितांनी व्यक्त केली.

# अल्पवयीन मुलीवरील अत्याचार; फरार आरोपी मध्यप्रदेशातून जेरबंद

### दहेगाव पोलिसांची धडक कारवाई ; न्यायालयाकडून ३ दिवसांची पोलिस कोठडी

**वर्धा जनमाध्यम :**

पोस्को कायद्यांतर्गत दाखल गुन्ह्यातील फरार आरोपीला दहेगाव पोलिसांनी मध्यप्रदेशातून अटक करत महत्त्वाची कारवाई केली. अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याप्रकरणी पळ काढलेल्या आरोपीला मध्यप्रदेशातील लफरा गावातून ताब्यात घेण्यात आले असून न्यायालयाने त्याला मंगळवार, २४ फेब्रुवारीपर्यंत तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

मानसिंग लखनलाल डोंगरे (वय ३४) असे आरोपीचे नाव आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, १६ वर्षीय पीडिता मध्यप्रदेशातील एका गावची रहिवासी असून ती आई-वडिलांसह दहेगाव (गो.) येथे मजुरीसाठी आली होती. २४ जानेवारी २०२६ रोजी मध्यरात्री पीडिता बाथरूमसाठी बाहेर गेली असता आरोपीने तिच्यावर अत्याचार केल्याचा आरोप आहे. घटनेनंतर पीडितेने मध्यप्रदेशातील महाराजपूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. मात्र, घटनास्थळ दहेगाव (गो.) हद्दीत येत असल्याने गुन्हा दहेगाव पोलिसांकडे वर्ग करण्यात आला.

गुन्हा दाखल होताच आरोपी फरार झाला होता. तपासादरम्यान आरोपी मध्यप्रदेशात लपून बसल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार दहेगाव पोलिसांचे विशेष पथक तत्काळ मध्यप्रदेशात रवाना झाले. स्थानिक पोलिसांच्या समन्वयातून लफरा गावात सापळा रचत आरोपीला अटक करण्यात आली.

शनिवारी उशिरा रात्री आरोपीला वर्धा येथे आणण्यात आले. रविवारी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. या काळात आरोपीची सखोल चौकशी करून गुन्ह्याच्या अनुषंगाने अधिक तपास करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. तपासात दहेगावचे ठाणेदार यशवंत कदम, सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रणिता बाभळे, पोलिस उपनिरीक्षक होमकांत मशाखेत्री, घनश्याम वाघ, प्रफुल पाटील आदींचा सहभाग होता.

दरम्यान, अल्पवयीन मुलीवरील अत्याचाराच्या प्रकरणात पोलिसांनी जलद कारवाई करत आरोपीला जेरबंद केल्याने नागरिकांत समाधान व्यक्त होत आहे. पुढील तपास सुरू आहे.

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार, देवळी यांचे कार्यालय**
**नविन प्रशासकिय इमारत पुलगांव नाक्याजवळ, देवळी**
फोन नं.:- ०७१५८-२९७२७२ ई-मेल-rodeoli001@gmail.com
क्र.अ.का/प्रस्तु-३/कावि- ३४२०२६
दिनांक :- २२/०१/२०२६
**जन्म - मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये ज.मृ.नो.र.प्र.क्र.- /२०२५-२६**

**जाहीरनामा**

ज्याअर्थी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) आणि महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम व फोजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम २० चे पोटकलम (१) अंतर्गत अर्जदार इसाक मुबारक शाहा रा.अंदोरी ता. देवळी जि. वर्धा यांचा मुलगा अस्लम इसाक शाहा यांचा जन्म दिनांक १२/०१/१९९६ रोजी मौजा अंदोरी ता. देवळी येथे झाला असून त्यांचे जन्माची नोंद ग्रामपंचायत अंदोरी ता. देवळी येथे उपलब्ध नसल्याने ग्रामपंचायत यांचे कार्यालयातील अधिकृत नोंदणी पुस्तिकेमध्ये नोंद घेण्याचा आदेश होणेबाबत या कार्यालयास ग्रामपंचायत अंदोरी ता. देवळी यांचेव्दारे प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.

त्याअर्थी सदर व्यक्तीच्या जन्माच्या नोंदीबाबत हितसंबंधीत व्यक्तीचे आक्षेप / हरकती असल्यास ते त्यांनी निश्चित केलेल्या तारखेस स्वतः अथवा विधी व्यवसायीमार्फत किंवा मान्यता प्राप्त अभिकर्त्यांमार्फत हजर राहून १५ दिवसाचे आत सादर करावे. उक्त तारखेनंतर व ठिकाणी अशा रितीने हजर राहण्यास व हरकती निवेदन करण्यास कसूर केल्यास त्यानंतर प्राप्त कोणत्याही हरकती व आक्षेप विचारात घेण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक :- २२/०१/२०२६

**तहसिलदार देवळी**

# राज्यपालांच्या अभिभाषणाने राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाची सुरुवात



**मुंबई/प्रतिनिधी-**महाराष्ट्र राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाची सुरु वात मुंबईत राज्यपालांच्या अभिभाषणाने झाली. राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी दोन्ही सभागृहांना संबोधित करताना सरकारच्या महत्त्वाकांक्षी योजना मांडल्या आणि विकसित महाराष्ट्र घडवण्याचा निर्धार व्यक्त केला.

आपल्या भाषणात राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी महाराष्ट्राच्या विकासाचा रोडमॅप स्पष्ट केला. महाराष्ट्र परदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यात आघाडीवर असल्याचे त्यांनी नमूद केले. विशेषत: विदर्भाच्या औद्योगिक प्रगतीसाठी मोठी पावले उचलण्यात येत असून विदर्भात स्टील कारिडार उभारण्याची घोषणा त्यांनी केली. गडचिरोली जिल्ह्यात स्टील हब विकसित करण्याचे काम सुरू असल्याचे सांगत विकसित महाराष्ट्रासाठी व्यापक योजना आखल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक वाढवण्यावर सरकारचा विशेष भर राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जानेवारी २०२६ मध्ये स्वित्झर्लंडमधील दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेत १८ देशांतील कंपन्यांसोबत जवळपास ३० लाख कोटी रु पयांच्या गुंतवणुकीचे करार करण्यात आले असून या करारांमुळे सुमारे ४० लाख रोजगारनिर्मिती होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली. या पार्श्वभूमीवर २०२६ ते २०३० या कालावधीसाठी नवीन उद्योग आणि सेवा धोरण जाहीर करण्यात आले आहे. सेवा क्षेत्र आणि उद्योगांमध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण करण्यावर भर देण्यात येणार आहे. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाचा विस्तार वाढवणपर्यंत नेण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यामुळे राज्यातील कनेक्टिव्हिटी अधिक सक्षम होईल. ग्रामीण भागातील संपर्क सुविधा सुधारण्यासाठी मुख्यमंत्री बळीराजा शेत रस्ते योजना प्रभावीपणे राबवली जात असल्याचेही त्यांनी सांगितले. नक्षलग्रस्त म्हणून ओळखल्या जाणा-या गडचिरोली जिल्ह्याचे रूपांतर स्टील हबमध्ये करण्याचे काम सुरू असून विदर्भात स्टील कारिडार उभारण्याचा निर्णय विकासाला नवी दिशा देणार असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नावर बोलताना राज्यपालांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली. सीमावाद कायदेशीर मार्गाने सोडवण्यासाठी सरकार कटिबद्ध असून उच्चतम न्यायालयात राज्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी विख्यात अधिवक्त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सीमाभागातील मराठी भाषिक नागरिकांसाठी शिक्षण, आरोग्य आणि विविध कल्याणकारी योजना राबवल्या जात आहेत. याशिवाय, कृषी उत्पादकता वाढवण्यासाठी आणि पीक नियोजन अधिक अचूक करण्यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे धोरण आखण्यात आले आहे. शेतक-यांचे उत्पन्न वाढवणे हे प्राधान्य असून आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कृषी क्षेत्र अधिक सक्षम करण्याचा सरकारचा मानस आहे. पोलिसांच्या निवासाच्या प्रश्नावर विशेष गृहनिर्माण योजना हाती घेतल्याचेही त्यांनी नमूद केले. एकूणच, औद्योगिक गुंतवणूक, पायाभूत सुविधा, सीमावाद आणि कृषी क्षेत्र या सर्व आघाड्यांवर संतुलित व वेगवान विकास साधण्याचा सरकारचा स्पष्ट रोडमॅप या अभिभाषणातून समोर आला.

**राज्यातील १४७ रस्ते सुधार योजनांना मंजुरी-**राज्याच्या विकासासोबत पर्यावरण संवर्धनावर भर देत राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी मोठी घोषणा केली आहे. राज्यात हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र जन अभियान २०२५ पासून सुरू करण्यात आले असून या उपक्रमांतर्गत १० कोटी वृक्षारोपणाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. आतापर्यंत ९ कोटी ८८ लाख झाडे लावण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. याशिवाय, राज्यातील १४७ रस्ते सुधार योजनांना मंजुरी देण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

**समृद्धी महामार्ग वाढवणपर्यंत नेण्याचा निर्णय-**पायाभूत सुविधा मजबूत करण्यावर सरकारचा भर असून समृद्धी महामार्ग वाढवणपर्यंत नेण्याचा निर्णय घेतल्याचे राज्यपालांनी नमूद केले. राज्याचा देशाच्या जीडीपीमध्ये १३ टक्के वाटा असल्याचे त्यांनी सांगितले. आर्थिक प्रगतीसाठी व्यापक डिजिटल परिवर्तन योजना लागू करण्यात आली असून प्रशासन अधिक गतिमान करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पोलिस कर्मचा-यांच्या निवासासाठी विशेष योजना राबवली जात असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

**कृषी उत्पादकता वाढवण्यासाठी एआयचा वापर-**कृषी क्षेत्रातही नवे तंत्रज्ञान वापरण्याचा सरकारचा मानस आहे. कृषी उत्पादकता वाढवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआयचा वापर करण्यात येणार असल्याचे राज्यपालांनी सांगितले.

## अजितदादा महाराष्ट्राला न मिळालेले सर्वोत्तम मुख्यमंत्री-देवेंद्र फडणवीस

**मुबई / प्रतिनिधी-** विधानसभेत अजित पवार यांच्या शोकप्रस्तावावर बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत भावनिक शब्दांत श्रद्धांजली अर्पण केली. दादा आपल्यात नाहीत, ही खंत मनाला चटका लावणारी आहे, असे सांगताना त्यांनी अनेक आठवणींना उजाळा दिला. अजितदादा हे महाराष्ट्राला न मिळालेले सर्वोत्तम मुख्यमंत्री होते, असे स्पष्ट विधान त्यांनी केले. अजित पवारांविषयी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत भावनिक शब्दांत त्यांचे कौतुक केले. फडणवीस म्हणाले की, दादांची राजकीय कारकीर्द मोठी आणि प्रभावी होती. राजकारणात ते अजून मोठी इनिंग खेळतील, अशी अपेक्षा अनेकांना होती. मात्र जीवनाच्या प्रवासात त्यांनी पहिल्यांदाच टायमिंग चुकवले, असे भावनिक विधान त्यांनी केले. दादांचा वक्तशीरपणा सर्वपरिचित होता, त्यामुळे हे अचानक घडलेले वास्तव अधिक वेदनादायी असल्याचे त्यांनी सांगितले. याची सर्वाधिक हळहळ आपल्याला राहील, असेही ते म्हणाले.



दादांच्या काम करण्याच्या पद्धतीबाबत बोलताना फडणवीस यांनी अनेक आठवणी सांगितल्या. मंत्रालयात कुठल्याही अधिका-यांपेक्षा आधी पोहोचणारे ते नेते होते. सकाळी नउ वाजता ते आपल्या दालनात बसलेले असायचे. वेळेचे काटेकोर पालन आणि कामातील शिस्त हे त्यांच्या स्वभावाचे मुख्य गुण होते. एखादा निर्णय त्यांना योग्य वाटला नाही तर ते फाईल थांबवून सविस्तर चर्चा करत. निर्णय घाईत न घेता विचारपूर्वक घेण्याची त्यांची सवय होती, असे त्यांनी स्पष्ट केले. दादांच्या काही वैयक्तिक सवयींचाही फडणवीस यांनी उल्लेख केला. त्यांना दूध पिण्याची आवड होती. दादांच्या साध्या सवयी आणि स्वच्छतेकडे असलेले लक्ष त्यांना विशेष वाटायचे. ते चप्पल वापरत, पण पाय नेहमी स्वच्छ ठेवत, अशी आठवण त्यांनी सांगितली. अजितदादांचे नेतृत्व, कामातील सातत्य आणि प्रशासनातील पकड यामुळे ते वेगळे ठरले, असे फडणवीस यांनी अधोरेखित केले. मुख्यमंत्री होण्याची क्षमता असूनही ती संधी त्यांना मिळाली नाही, ही खंत त्यांनी पुन्हा व्यक्त केली. राज्याच्या राजकारणात त्यांनी निर्माण केलेला ठसा कायम राहील आणि त्यांच्या कार्यामुळे महाराष्ट्र त्यांना नेहमी लक्षात ठेवेल, अशा शब्दांत मुख्यमंत्र्यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

**ही खंत मनाला चटका लावणारी-** यंदा दादांनी आपला १२ वा अर्थसंकल्प सादर केला असता आणि पुढील वर्षी १३ वा अर्थसंकल्प मांडून बॅरिस्टर शेषराव वानखेडे यांच्या विक्रमाशी बरोबरी केली असती, असे त्यांनी नमूद केले. मात्र अचानक त्यांच्या जाण्यामुळे ही परंपरा थांबली, असेही ते म्हणाले. या वेळी अर्थसंकल्प मांडण्याची जबाबदारी स्वत:वर आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**ख-या अर्थाने ते माझे दादाच होते-**फडणवीस यांनी सांगितले की, अजितदादांसोबत त्यांचे नाते केवळ राजकीय नव्हते, तर ते अधिक वैयक्तिक आणि भावनिक होते. दादा माझ्यापेक्षा ११ वर्षांनी मोठे होते. ख-या अर्थाने ते माझे दादाच होते, असे ते म्हणाले. २०१४ नंतर दोघांमध्ये अधिक जवळीक निर्माण झाली आणि एका दशकाहून अधिक काळ परस्परांमध्ये मैत्री व सुसंवाद राहिला. सकाळी ६ वाजता कामाला सुरु वात करण्याची त्यांची सवय होती, याचा उल्लेख करत त्यांनी त्यांच्या कार्यशैलीचे कौतुक केले.

**स्पष्ट निर्णयक्षमता हे वैशिष्ट्य-**अजित पवार हे एका पिढीचा आत्मविश्वास होते, असे सांगताना फडणवीस यांनी त्यांच्या कामकाजातील काटेकोरपणाचा विशेष उल्लेख केला. दादांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून निघणारी नाही, असे ते म्हणाले. शेवटची भेटच अखेरची ठरेल, असे कधी वाटले नव्हते, ही खंत त्यांनी व्यक्त केली.

**मागे-पुढे न पाहणारे नेते-**कठोर निर्णय घ्यायचे असतील तर मागे-पुढे न पाहणारे नेते म्हणजे अजितदादा, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. एखादा निर्णय वादग्रस्त असला तरी तो ठामपणे मंत्रिमंडळासमोर मांडण्याची त्यांची तयारी असायची. वित्त विभागाने लाडकी बहिण योजनेचा भार अर्थसंकल्पावर मोठ्या प्रमाणात पडेल, त्यामुळे पुनर्विचार करावा, असा सल्ला दिला होता. मात्र त्या सूचनांनंतरही दादांनी ठाम भूमिका घेत तो विषय मंत्रिमंडळात आणला, याची आठवण त्यांनी करून दिली.

**राजकारणात आणि प्रशासनात मोठी पोकळी-** सभागृहातील वातावरण यावेळी गंभीर झाले होते. फडणवीस यांच्या शब्दांतून सहकार्याचा, जिव्हाळ्याचा आणि आदराचा सूर स्पष्टपणे जाणवत होता. अजितदादांनी घडवलेली कार्यपद्धती, अर्थसंकल्पीय परंपरा आणि निर्णयक्षम नेतृत्व ही राज्यासाठी मोठी संपत्ती होती, असे त्यांनी नमूद केले. त्यांच्या जाण्याने राज्याच्या राजकारणात आणि प्रशासनात मोठी पोकळी निर्माण झाली असून ती भरून काढणे कठीण आहे.

## इतिहास लिहितांना दादांच्या नावाशिवाय पूर्ण होणार नाही : जयंत पाटील

**मुंबई :** २८ जानेवारीला झालेल्या त्या दुर्दैवी अपघातात नियतीने अजितदादांसारखा धडाडीचा नेता आपल्यातून हिरावून नेला. महाराष्ट्रात ज्या नेत्यांकडे समाज मोठ्या आशेने बघतो, त्यांनाच हिरावून घेण्याची नियतीची ही कोणती पद्धत आहे? विलासराव देशमुख, गोपीनाथ मुंडे, आर. आर. पाटील यांच्यानंतर महाराष्ट्राने अजित दादांना गमावले असे भावनिक विधान जयंत पाटील यांनी केले.अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी शोकप्रस्ताव मांडण्यात आला होता. यावेळी गेल्या ४० वर्षांपासूनचे सहकारी असलेल्या अजित पवार यांच्या आठवणींना जयंत पाटील यांनी उजाळा दिला. स्व. यशवंतराव चव्हाणांच्या मुशीतून शरद पवार साहेबांचे नेतृत्व सुरू झाले आणि त्यांचे संस्कार घेउन अजितदादांनी आयुष्यभर काम केले. दादांची आणि आम्हा सर्वांची कारकीर्द ही एकाचवेळी सुरू झाली. आज दादांना श्रद्धांजली वाहण्याची वेळ आमच्या सगळ्यांवर येत आहे, असे जयंत पाटील म्हणाले.जयंत पाटील म्हणाले, अजितदादांवर बोलण्यासारखे बरेच काही आहे. कदाचित दिवस देखील पुरणार नाही. दादांच्या स्वभावातले बारकावे वर्णन करावे तेवढे कमी आहेत. जवळपास दोन दशके दादा महाराष्ट्राच्या राजकारणाच्या मध्यवर्ती भागात होते. दादा काय करणार आणि दादांची तसेच त्यांच्या पक्षाची भूमिका ही गेली २०-२५ वर्षे महाराष्ट्रात फार महत्त्वाची ठरली. त्यामुळे जेव्हा समाजकारण, सहकार, अर्थकारण यांचा इतिहास लिहिला जाईल, तेव्हा अनेक दिग्गजांची नावे येतील. पण दादांचे नाव लिहिल्याशिवाय तो इतिहास पूर्ण होणार नाही. अजित पवारांच्या स्वभावावर बोलताना जयंत पाटील म्हणाले की, दादांच्या मनात जे असायचे, तेच त्यांच्या ओठावर असायचे. एका सभेमध्ये दादा आर. आर. आबांच्या तंबाखू खाण्याच्या सवयीवर जाहीरपणे बोलले होते. आबांना कदाचित त्याचे वाईट वाटले असेल, म्हणून मी स्वत: आबांच्या घरी जाउन त्यांची माफी मागितली होती. पण तेव्हाही मी आबांना सांगितले होते की, दादा जे बोलले ते काही चुकीचे नाही.



## दादा तुमचा निर्णय चुकला, माघारी या !

**मुंबई :** दादा म्हणजे स्पष्टवक्तेपणा, वक्तशीरपणा पाळणारा नेता होता. दादा तुमचा हा निर्णय चुकलेला आहे, माघारी या. आज सभागृहात पाहताना ते डोळ्यासमोर दिसत आहेत, अशा शब्दात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्याचे दिवंगत माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आठवणींना उजाळा दिला. राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सोमवारी सुरु वात झाली. यावेळी विधिमंडळाच्या सदस्य असलेल्या दिवंगत नेत्यांना आदरांजली वाहण्यासाठी शोक प्रस्ताव मांडण्यात आला. यावेळी एकनाथ शिंदे बोलत होते.एकनाथ शिंदे म्हणाले की, अधिवेशनाचा आज पहिला दिवस. गेली २२-२३ वर्ष काम करत असताना आजचा दिवस सर्वांसाठी प्रचंड दु:खाचा दिवस आहे. आपल्या एका सहका-याबाबत बोलण्याची वेळ येणे हे दु:खद आहे. त्यातही अजित पवारांसारखा नेता असेल तर ते अति दु:खद आहे. अजित पवारांच्या जाण्याने पोकळी कधीच भरू शकत नाही. अजित पवारांना श्रद्धांजली अर्पण करतो. आज त्यांची पावलोपावली उणीव भासत आहे. काल पत्रकार परिषदेला ते नव्हते. शिव जयंतीला देखील ते नव्हते, आज सभागृहात देखील ते नाही. हे दु:खद आहे.



ज्या दिवशी अजित पवार गेले, त्यादिवशी प्रत्येकाच्या डोळ्यात अश्रू होते. लाख गेले तरी चालतील. पण, लाखांचा पोशिंदा जगला पाहिजे. नियती समोर ते जिंकू शकले नाही. लाखो अनुयायांना ते पोरके करून गेले. या घटनेने पवार कुटुंबावर काळाने घाला घातला. मी देखील हे दु:ख अनुभवले आहे. माझी दोन मुले अपघातात गेली. माझे गुरु आनंद दिघे यांना देखील अपघातात मी गमावले आहे. दादा आपल्यासोबत नाही हे मान्य होते नाही. शब्द आणि वेळेला महत्व देणारा नेता आपण गमावला आहे. देवेंद्रजी आणि मी मित्र गमावला आहे, अशा भावना एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केल्या.

कामात तडजोड न करणारा नेता

एकनाथ शिंदे पुढे म्हणाले की, प्रचंड अभ्यासू, प्रशासनावर पकड असणारा हा नेता होता. त्यांनी हातात फाईल घेतली की काय कमी आहे हे लगेच ते सांगायचे. बैठकीत साधा कागदाचा तुकडा पडला तरी ते त्यांना चालत नव्हते. ते कधीच नकारात्मक बोलत नव्हते. कोरोना काळात ते मंत्रालयात जाउन काम करत होते. त्यांच्यासोबत काम करताना काही घटना आठवतात. सरकार स्थापनेच्या चर्चा सुरू असताना आम्ही पत्रकार परिषद घेत होतो. त्यावेळी त्यांनी माझ्या हातातून माईक घेतला आणि म्हणाले एकनाथरावांचे माहिती नाही पण मी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेणार आहे. लाडकी बहीण योजना राबवायची आहे. आमच्या तिघांचे एकमत झाले. राज्याचा आर्थिक गाडा व्यवस्थित सांभाळला. त्यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा आपल्याला फायदा होत होता. अधिवेशन काळात ते पूर्णवेळ थांबायचे. विरोधी पक्षाच्या प्रश्नांना उत्तर द्यायचे. कामात कधीच तडजोड करत नव्हते, असे देखील त्यांनी म्हटले.

## माझे शेणाचे हात पेणाला लावणारा माणूस म्हणजे अजितदादा; मिटकरी

**मुंबई :**सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी आज विधानपरिषदेतील अजित पवारांच्या शोक प्रस्तावावर आपली भावना व्यक्त केली. यावेळी त्यांनी आपल्या आमदार होण्याचा प्रवास उलगडून सांगत अजित पवारांच्या आठवणींना उजाळा दिला.अमोल मिटकरी म्हणाले, अजित पवारांच्या रु पाने महाराष्ट्र एका धडाकेबाज नेतृत्वाला मुकला. मी एक फार सामान्य कार्यकर्ता आहे. अजितदादांनी माझे शेणाने भरलेले हात पेणाला लावले. आमच्या घरात कोणताही राजकीय वारसा नव्हता. माझ्या वडिलांना, आजोबांना किंवा खानदानात कुणालाही ग्रामपंचायत सदस्यत्व काय असते हे माहिती नव्हते. पण २०१९ मध्ये बारामतीच्या शारदा प्रांगणात छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीच्या निमित्ताने एका व्याख्यानाचा योग आला. मला चांगले आठवते. तो रविवारचा दिवस होता. त्या दिवशी दादा उद्घाटन करून जाणार होते. त्यांनी कार्यक्रमाचा विषय वाचला. वक्त्याचे नाव वाचले. मला म्हणाले, तुम्ही कुठे असता. मी म्हणालो, अकोल्यात असतो. तुम्ही काय करता असे विचारले. त्यावर मी म्हणालो, मी महाराष्ट्रभर छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज, शाहू महाराज, फुले, आंबेडकरांचा विचार मांडणारा वक्ता आहे. मराठा सेवा संघ व संभाजी ब्रिगेडमध्ये काम करणारा कार्यकर्ता आहे.



## दुसरी सकाळ अंतकरणाला चटका देणारी

### ◆ अजितदादांबाबत बोलताना उद्धव ठाकरे भावूक ◆



**मुंबई / प्रतिनिधी-**अजितदादांच्या बद्दल म्हणायचे झाले तर दोन सकाळ अशा होत्या, त्यातली एक सकाळ ही त्यांच्या कृतीने महाराष्ट्राला धक्का देणारी होती आणि दुसरी सकाळ ही महाराष्ट्राला व अंतकरणाला चटका देणारी होती, असे भावूक भाष्य विधान परिषदेत अजित पवारांच्या शोक प्रस्तावावर बोलताना शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केले आहे.विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला आजपासून (२३ फेब्रु वारी) सुरु वात झाली आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशन २५ मार्चपर्यंत चालणार आहे. दरम्यान, अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांच्या दु:खद निधनाबाबत विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात शोक प्रस्ताव मांडण्यात आला.उद्धव ठाकरे म्हणाले की, विधिमंडळाचे या वर्षीच पहिलं अधिवेशन आणि या अधिवेशनाची सुरु वात आपण सर्वजण एक दिगमूड अवस्थेमध्ये आहोत. आजपर्यंत नेहमी सभागृहात दिसणारे आणि आपल्याला सर्वांनाच आपले वाटणारे अजितदादा या सभागृहात किंवा या विधिमंडळात आज दिसत नाही, ही खंत आपल्या सगळ्यांच्या मनात आहे.माणसे येतात, माणसे जातात, परंतु माणसे असताना त्यांचे महत्त्व आपल्याला कधी कळत नाही आणि ती नसतात त्यावेळेला त्यांचे महत्त्व काढून काही उपयोग होत नसतो. अनेक जण असे असतात जे कधी जवळ असताना कळत नाहीत, पण काही जण असे असतात की, जे जवळ आल्यानंतर आपल्याला व्यवस्थित कळतात. या विधिमंडळामध्ये अनेकांच्या राजकीय कारकिर्दीची सुरु वात अजितदादांच्या बरोबरीने झाली असेल. काळ एकच आहे. विशेषत: माझ्या कारकर्दीची सुरु वात सुद्धा अजितदादांच्या पक्षाच्या आणि त्यांच्या विचारधारणेच्या विरोधातली होती. आम्ही कधी एकत्र येउ असं ध्यानी मनी सुद्धा वाटले नव्हते. अनपेक्षितपणाने एकत्र आलो आणि एकत्र आल्यानंतर साहजिकच आहे की, मनामध्ये नाही म्हटले तरी अडी होती. आधीची सकाळी मी आपल्याला सांगितली आणि त्याच्यानंतर ही व्यक्ती माझ्यासोबत होती. एक तर मला प्रशासनाचा अनुभव नव्हता. अचानक या सभागृहात किंवा या विधिमंडळात आलो, मुख्यमंत्री म्हणून आलो, कामकाज कसे चालवायचे हे माहित नव्हतं. तसेच सहकारी सगळे विरोधातले होते.अशावेळी अजितदादांसारखा एक सहकारी ज्यांनी एक धक्का दिला होता आणि आपल्यासोबत उपमुख्यमंत्री म्हणून बसणार हे थोडसे त्यावेळेला नाही म्हटले तरी अनपेक्षित होते. पण जसे जसे कामकाज सुरू झाले, तेव्हा मला त्यांच्याबद्दल कळले. ती भावना आजही माझ्या मनात कायम आहे आणि ती नेहमी कायम राहील, असे ठाकरे यांनी स्पष्ट केले.उद्धव ठाकरे म्हणाले की, अजितदादांसारखा एक भरोसेमंद उत्तम दिलदार, केवळ सहकारीच नव्हे तर मित्र मी गमावला आहे. शासकीय किंवा प्रशासकीय कामकाजामध्ये एक खंबीर पाठिंबा आणि मला ते आधार होते. कोणतीही एखादी गोष्ट कळली नाही तर अजितदादांबरोबर मी बोलायचो. विषयाचा सखोल अभ्यास करणारा सहकारी किंवा लोकप्रतिनिधी अभावानेच आढळतात. आज सुद्धा त्यांच वैशिष्ट्य म्हणजे ते सहा वेळा उपमुख्यमंत्री होते. पण विशेष म्हणजे एका मोठ्या वृक्षाच्या सावलीतून बाहेर पडून स्वत:ची ओळख निर्माण करणे हे काही जणांना फार अवघड असते.

## अजित दादा दिलदार नेते :तटकरे

**मुंबई :** राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन आज सुरु झाले आहे. २८ जानेवारी रोजी अजित पवार यांचे बारामती येथे विमान अपघातात निधन झाले. त्यांच्या निधनानंतर राज्याचे पहिले अर्थसंकल्पीय अधिवेशन आजपासून सुरु झाले आहे. आज सभागृहात शोक प्रस्ताव सादर करण्यात आला, तर विधिमंडळ परिसरात राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी अजित पवार यांच्या ३५ वर्षांच्या राजकीय कारकिर्दीला उजाळा दिला. नेता किती मोठा दिलदार असू शकतो हे अजितदादांकडे पाहून कळते, असे म्हणत त्यांनी भावना व्यक्त केल्या. राजकीय प्रश्नांवर येत्या २६ तारखेला चर्चा करु असेही ते म्हणाले. खासदार सुनील तटकरे म्हणाले, अजितदादा यांच्या विधिमंडळा प्रवासाला १९९१ पासून सुरु वात झाली. विधिमंडळाचे कोणतेही अधिवेशन असेल तेव्हा अजितदादा सकाळपासून ते संध्याकाळपर्यंत सभागृहाच्या कामकाजात व्यस्त राहात होते. ३५ वर्षांच्या त्यांचा राजकीय कारकिर्दीत त्यांनी अधिवेशन काळात सभागृहात सक्रीय सहभाग नोंदवला. आज अजितदादांशिवाय या प्रांगणात आम्हाला यावे लागत आहे, हे आमच्या सर्वांसाठी क्लेशकारक आहे. अजितदादां हा झंजावात सभागृहाने पाहिला आहे. सर्व समाजासाठी त्यांनी घेतलेले निर्णय, सभागृहाने पाहिले. हे निर्णय घेत असताना त्यांनी आमदार, राज्यमंत्री, विरोधी पक्षनेता, अर्थमंत्री, उपमुख्यमंत्री म्हणून सभागृहात केलेली भाषणे, या सगळ्यांवर एक चांगला ग्रंथ होउ शकतो. अर्थसंकल्पीय अधिवेशनात त्यांनी केलेली भाषणे यांचा ग्रंथ होउ शकतो, असे खासदार तटकरे म्हणाले.खासदार सुनील तटकरे म्हणाले, दादांची सभागृहातील वाटचाल मी त्यांचा सहकारी म्हणून पाहिली. माझे सभागृहात भाषण असेल तेव्हा दादा उपस्थित राहात होते. इतर आमदारांनाही सभागृहात उपस्थित राहण्यास सांगत होते. नेता किती मोठा आणि दिलदार असू शकतो हे दादांकडे पाहून कळते. माझ्या भाषणासाठी दादा सभागृहात आले होते. एक नेता आपल्या सहकार्यावर किती प्रेम करतो त्याचं ते उदाहरण होते. आपला सहकारी व्यक्त करत असलेल्या भावना, मतांसोबत ठामपणे उभे राहण्याचे काम अजितदादा करत होते.



## अजितदादांच्या अपघाताचा थातूरमातूर तपास; रोहित पवार आक्रमक

**मुंबई / प्रतिनिधी-** अजित पवार २८ जानेवारी रोजी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या प्रचारासाठी बारामतीकडे जात असताना त्यांचे विमान धावपट्टीवर उतरताना कोसळले होते. त्यानंतर झालेल्या स्फोटात अजित पवार यांच्यासह विमानातील पाच जणांचा मृत्यू झाला. या प्रकरणावरून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी अलीकडेच घातपाताचा संशय व्यक्त केला होता. विमान अपघाताविषयी थातूरमातूर तपास केल्यास मराठी माणूस दाखवून देउ, असा इशारा रोहित पवार यांनी केंद्र सरकारला दिला आहे. गेल्या महिन्याभरात काय तपास केला ते सांगा. सीबीआयकडे आधीच तपासासाठी खूप प्रकरणे आहेत, असे देखील त्यांनी म्हटले आहे.

पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी विमानात गरजेपेक्षा जास्त इंधन असल्याचा मुद्दा उपस्थित केला. तसेच वैमानिक सुमित कपूर यांनी विमान मुद्दाम जमिनीवर आदळले असावे, अशी शक्यताही त्यांनी व्यक्त केली होती. आता अजित पवार यांच्या अपघात प्रकरणावरून रोहित पवार आक्रमक झाल्याचे पाहायला मिळत आहे. रोहित पवार म्हणाले की, अमोल मिटकरी, रु पाली ठोंबरे असतील, लहान-सहान कार्यकर्ते असतील, सगळे सातत्याने बोलत आहेत.पायलट संदर्भात बोलत असताना आम्ही पण डिटेल बोललो आहोत. माझी पण इच्छा आहे की, पारदर्शक तपास व्हावा. सीबीआय तपास दिला गेला. गेल्या महिन्याभरात त्यांनी काय तपास केला, सीसीटीव्ही कॅमेरे ताब्यात घेतले का? क्रिमिनल इन्व्हेस्टिगेशन करायला पाहिजे ते केले का? सखोल चौकशी करणं महत्त्वाचे आहे. दोन थातूरमातूर रिपोर्ट दिले गेले. सत्तेतील लोकांचे आणि व्हीएसआरचे कसे संबंध होते? मंत्र्यांचे संबंध व्हीएसआरसोबत कसे होते याचे पुरावे आमच्याकडे आहेत. सीबीआय तपास होत असेल तर चांगली गोष्ट आहे. पण आतापर्यंत ७ हजार ७५ केसेसचे निकाल दिले गेले नाहीत.

आम्हाला राजकारण करायचे नाही

मुख्यमंत्र्यांना देण्यासाठी पत्र तयार केले आहे. मुख्यमंत्र्यांची वेळ घेत आम्ही पत्र आणि पुरावे देउ. अमित शाह यांना आम्ही रिपोर्ट पाठवले आहेत. डीजीसीएला पण रिपोर्ट पाठवले आहेत. आधीही आम्ही सीएमला रिपोर्ट देणार होतो आणि आता देखील आम्ही तेच सांगतोय, आम्ही रिपोर्ट देउ. ७० टक्के माहिती आम्ही मागे ठेवली आहे. आम्हाला राजकारण करायचे नाही, योग्य पद्धतीने तपास व्हावा, अशी मागणी देखील रोहित पवार यांनी केली आहे.



## अजित पवारांच्या विमान अपघाताप्रकरणी आव्हाडांकडून संशय

**मुंबई /प्रतिनिधी-** महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत जितेंद्र आव्हाड यांनी गंभीर शंका व्यक्त केली आहे. ब्लॅक बॉक्स जळण्यावरून आणि विमानाला असलेल्या परवानगीवरून त्यांनी उपस्थित केलेले प्रश्न आता चर्चेचा विषय ठरत आहेत. जितेंद्र आव्हाडांनी ब्लॅक बॉक्स जळून गेला ही माझी सर्वात मोठी शंका आहे. त्या विमानाला भारतात उडण्याची परवानगी नव्हती. त्या विमानाने ५००० तासापेक्षा जास्त उडू नये, असे असतानाही ते विमान ८ हजारपेक्षा जास्त उडून झाले होते, असा धक्कादायक खुलासा जितेंद्र आव्हाडांनी केला. महाराष्ट्राचे दिवगंत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाले. बारामती विमानतळाच्या धावपट्टीजवळ लिअरजेट ४५ या विमानाला झालेल्या भीषण अपघातात अजित पवारांसह अन्य चार सहका-यांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. या विमान अपघात की घातपात अशी शंका अनेकांकडून व्यक्तकरण्यात आली आहे. सध्या याची चौकशी केली जात आहे. त्यातच आता अजित पवारांचे सहकारी आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी अजित पवारांच्या विमान अपघातावर मोठी शंका व्यक्त केली आहे.मला या अपघाताबद्दल सर्वात आश्चर्य वाटतंय ते म्हणजे ब्लॅक बॉक्स जळून गेला. ब्लॅक बॉक्स ज्या ठिकाणी असतो, तो विमानाचा भाग जशाच्या तसा होता. ब्लॅक बॉक्स ज्या गोष्टीपासून बनवले गेले, ते मटेरिअल आहे टायटेनिअम. म्हणजे ११ हजार सेल्सिअसच्या आगीतही त्या ब्लॅक बॉक्सला काहीही होउ शकत नाही. त्यावेळी सरळ सांगितले जाते की ब्लॅक बॉक्स जळून गेला. माझ्यासारख्या माणसाला तर याबद्दल नक्कीच शंका येईल.

## ईडीग्रस्त पटेल, तटकरे, भुजबळ, मुंडेंनी तत्काळ भाजपात प्रवेश करावा

**मुंबई /प्रतिनिधी-** लग्न एकाशी आणि संसार एकाशी असं करण्यापेक्षा अजित दादांच्या पक्षात राहून भाजपचा संसार करण्यापेक्षा प्रफुल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ आणि धनंजय मुंडे यांनी थेट भाजपमध्ये जावं. कारण भाजपमध्ये गेल्यामुळे थेट तुम्हाला संसारही चांगला करता येईल आणि उघडपणे तुम्हाला त्यांच्या भूमिका मांडता येतील, अशा शब्दात सचिव राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश प्रवक्ता तथा संघटक विकास लवांडे यांनी खोचक टोला लगावला आहे. त्यांनी व्हिडिओ सोशल मीडियातून पोस्ट करताना जोरदार हल्लाबोल केला आहे. लवांडे यांनी म्हटले आहे की, राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादांच्या पक्षाचे जे प्रमुख नेते स्वत:ला म्हणतात, ते प्रफुल्ल भाई पटेल, खासदार सुनील तटकरे, ज्येष्ठ नेते छगन भुजबळ, धनंजय मुंडे या चारही नेत्यांनी अजित दादांच्या पक्षात राहून भाजपचं काम करण्यापेक्षा, ईडीग्रस्त असल्यामुळे चौकशीच्या वेगवेगळ्या फे-यांमध्ये आपण अडकला असल्यामुळे भारतीय जनता पार्टीची आपण मनधरणी करत आहात.



**गुजरात वाशिंग मशिन मधून तुमची क्लिअरिटी मिळेल-**विकास लवांडे यांनी पुढे म्हटलं आहे की, तुम्ही ज्या चौकशीच्या फे-यांमध्ये, कारवाईच्या फे-यांमध्ये अडकला आहात, त्याची सुटका भाजपच्या गुजरात वाशिंग मशिन मधून तुमची क्लिअरिटी मिळेल, तुम्हाला क्लीन चिट मिळेल आणि तुम्ही स्वस्थपणे उर्वरित आयुष्य काढू शकता, आनंदाने जीवन जगू शकता. तुम्हाला कुठलंही टेन्शन राहणार नाहीत. त्यामुळे तुम्ही तात्काळ भाजपमध्ये जावं. काहीही नुकसान होणार नाही महाराष्ट्राचं. आपण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांची फसवणूक करू नये, दिशाभूल करू नये, असा टोला लगावला.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## ट्रम्प यांची कानउघाडणी

विशेष अध्यक्षीय अधिकाराअंतर्गत विविध देशांच्या वस्तूंवर आयात शुल्क म्हणजेच टॅरिफ आकारण्याचा अधिकार अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना नाही, असा महत्त्वपूर्ण आणि सुस्पष्ट निकाल अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने दिला. आयात शुल्क लागू करण्याचा निर्णय अमेरिकेचे कायदेमंडळ असलेल्या काँग्रेसच्या मान्यतेशिवाय घेता येणार नाही, असे सांगत न्यायालयाने ट्रम्प यांचा मुखभंग केला खरा; पण या निकालाची पर्वा न करता चोवीस तासांतच त्यांनी जगभरातील देशांवर आधी १० टक्के कराची घोषणा केली, पाठोपाठ ते १५ टक्के केल्याचे जाहीर केले. २४ फेब्रुवारीपासूनच निर्णयाची अंमलबजावणी होणार आहे. हे आयात शुल्क १५ दिवसांसाठी असल्याचे सांगितले जात असले, तरी निर्णय महत्त्वाचा ठरतो. सर्वोच्च न्यायालयाने सुनावल्यानंतरही ट्रम्प यांनी मनमानी करत नवा धक्का दिला.१९७४ च्या व्यापार कायद्यातील विशेषाधिकाराचा वापर करत त्यांनी हा कर लादला. त्याने जवळपास शंभरहून अधिक देशांवर त्यांनी एकतर्फी लादलेल्या आयात शुल्कावर नवे प्रश्नचिन्ह निर्माण झाले. अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतानाच 'अमेरिका फर्स्ट' अशी घोषणा देऊन ट्रम्प यांनी देशातील अर्थतज्ज्ञ, आंतरराष्ट्रीय व्यापारातील जाणकार, सत्ताधारी रिपब्लिकन पक्ष तसेच विरोधातील डेमॉक्रॅटिक पक्ष सदस्यांशी कोणताही विचारविनिमय न करता वेगवेगळ्या देशांना धमक्या देण्यास सुरुवात केली आणि त्यांच्यावर वाट्टेल तसे आयात शुल्क लादले. अध्यक्षांचे हे निर्णय न्यायालयात टिकणार नाहीत, अशी चर्चा गेले कित्येक दिवस होती; परंतु ट्रम्प बेलगामपणे वागत आहेत. सर्वोच्च न्यायालयाने ट्रम्प यांना अशाप्रकारचा निर्णय घेण्याचे अधिकारच नसल्याचे म्हटले. न्यायालयाने ६-३ अशा बहुमताने निकाल देताना ट्रम्प यांनी आयात शुल्क लागू करताना त्यांच्या अधिकाराच्या मर्यादा ओलांडल्या, असे प्रतिपादन केले.आंतरराष्ट्रीय आपत्कालीन आर्थिक अधिकार कायदा १९७७ अंतर्गत त्यांनी जवळपास प्रत्येक व्यापारी भागीदार देशावर कोणते ना कोणते आयात शुल्क लादले. अमेरिकेकडून सर्वच देशांवर सरसकट १० टक्के आयात शुल्क आकारले जाते. त्यावर वेगवेगळ्या प्रमाणात 'रेसिप्रोकल' किंवा प्रतिक्रियात्मक समान शुल्क लागू आहे. त्याच्याही वर काही देशांसाठी दंडात्मक शुल्क आकारले जाते; परंतु अशाप्रकारे शुल्क आकारण्याचा अधिकार ट्रम्प यांना स्वतंत्रपणे नाही. या अधिकाराचा इतिहास, कक्षा आणि एकूण संदर्भ ध्यानात घेता काँग्रेसच्या मान्यतेशिवाय त्याची अंमलबजावणी करता येणार नाही. म्हणजेच १९७७च्या कायद्यानुसार लागू केलेले आयात शुल्क बेकायदेशीर आहे, असे मत न्यायालयाने व्यक्त केले. अध्यक्षांनी घेतलेल्या निर्णयामुळे कायद्याचा मूळ हेतूच नष्ट झाला, असे न्यायालयाचे मत.आजवर ट्रम्प यांच्या अनेक वादग्रस्त निर्णयांना सर्वोच्च न्यायालयाने सशर्त किंवा तात्पुरती संमती दिली होती. यावेळी मात्र न्यायालयाने अध्यक्षांना फटकारले. विविध देशांकडून अमेरिकेत येणारा आयात माल ट्रम्प यांच्या धोरणामुळे महागला. म्हणूनच प्रत्येक अमेरिकी ग्राहकाचा हा विजय आहे; मात्र त्यामुळे ट्रम्प यांचा भडका उडाला आहे. न्यायालयाचा हा निर्णय निराशाजनक, लाजिरवाणा व चुकीचा आहे. या निकालामुळे कोणताही फरक पडणार नाही. कारण, आमच्याकडे अन्य शक्तिशाली पर्याय आहेत, असा दावा त्यांनी केला होता. 'रेसिप्रोकल टॅरिफ' बेकायदेशीर ठरवल्याने अमेरिकन कंपन्या यापूर्वी भरलेल्या आयात शुल्काच्या रिफंडची मागणी करू शकतील. प्राईस वॉटर हाऊसने केलेल्या अंदाजानुसार, ऑक्टोबर २०२५ अखेरपर्यंतच अमेरिकन सरकारने १०८ अब्ज डॉलर्स महसूल शुल्कांमधून जमा केला होता. त्यात चीनचा वाटा सर्वाधिक म्हणजे ३४ अब्ज डॉलर्स होता. भारतावर लादलेल्या शुल्कांमधून अमेरिकेने ४८ कोटी डॉलर्स वसूल केले. या निकालामुळे जागतिक व्यापाराची समीकरणे पुन्हा एकदा बदलणार आहेत. अमेरिकेने अलीकडील काळात युरोपियन युनियन, जपान, दक्षिण कोरिया, ब्रिटन आणि भारताबरोबर व्यापारी करार केले.भारताबरोबर कराराच्या वाटाघाटी पूर्ण झाल्या असून, त्यावर स्वाक्षऱ्या व्हायच्या आहेत; मात्र करारात कोणताही बदल होणार नाही. अमेरिका शुल्क भरत नसून, भारतालाच शुल्क द्यावे लागत आहे, असे उद्गार ट्रम्प यांनी या पार्श्वभूमीवर काढले आहेत; परंतु भारतावर आकारलेल्या व पुढे १८ टक्क्यांपर्यंत कमी केलेल्या टॅरिफचे काय होणार, याबद्दलची अनिश्चितता कायम आहे. भारतावर प्रथम २६ टक्के, मग २५ टक्के, नंतर दंडात्मक शुल्कासह ५० टक्के आणि आता १८ टक्के इतके आयात शुल्क सध्या आकारले जाते. काही अमेरिकी वस्तूंवर भारताकडून शून्य शुल्क आकारले जाईल, असे ट्रम्प यांनी मध्यंतरी घोषित केले होते. ट्रम्प तपशिलाकडे कधीही लक्ष देत नाहीत आणि ते शब्दही फिरवत असतात. त्यांनी 'इंटरनॅशनल इमर्जन्सी इकॉनॉमिक पॉवर्स ॲक्ट' या कायद्याचा केलेला वापर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा केंद्रबिंदू आहे. या कायद्यानुसार, राष्ट्राध्यक्षांना आणीबाणीच्या परिस्थितीत व्यापार नियंत्रित करण्याचा अधिकार दिला जातो.चीन, मेक्सिको आणि कॅनडा येथून येणाऱ्या वस्तूंवर शुल्क लादताना ड्रग्जची तस्करी ही एक आणीबाणी असल्याचा युक्तिवाद ट्रम्प यांनी केला होता. पुढच्या टप्प्यात जगातील जवळजवळ प्रत्येक देशातून येणाऱ्या वस्तूंवर १० ते ५० टक्के शुल्क आकारण्याचे आदेश त्यांनी दिले होते. त्यासाठी अमेरिकेची व्यापारतूट ही एक असामान्य आणि कमालीची धोक्याची परिस्थिती असल्याचे तर्कट त्यांनी लढवले. भारताने रशियाकडून तेल घेतल्याची शिक्षा म्हणून जादा कर लादला, असे ते सांगत राहिले. आणीबाणीची परिस्थिती म्हणून ज्या युक्तिवादाचा आधार त्यांनी घेतला तो आता टिकणार की कसे, हे पाहावे लागेल. त्यातून राष्ट्राध्यक्ष, त्यांचा सत्ताधारी पक्ष आणि न्यायालयात नवा वाद निर्माण झाला आहे. ट्रम्प यांच्या घोषणांची नोंद घेतल्याचे आणि या घडामोडींचे भारताच्या व्यापारावर कोणते परिणाम होणार, याचे विश्लेषण करत असल्याचे भारतीय वाणिज्य मंत्रालयाने म्हटले असले, तरी ट्रम्प यांच्या धरसोड धोरणांचा सामना करण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना कराव्या लागणार आहेत. व्यापार करारापूर्वीच होत असलेली ही कोंडी गंभीर सदरात मोडणारी आणि देशाच्या व्यापारासोबत अर्थकारणालाही धक्के देणारी आहे.

# जागतिक बाजाराची विस्कटलेली घडी पुन्हा बसेल?

**ज्या देशांनी अमेरिकेशी १५ टक्क्यांपेक्षा जास्त शुल्कावर करार केले ते देश अमेरिकेकडे फेरविचार करण्याची मागणी करण्याची शक्यता आहे. कारण ट्रम्प यांनी या देशांना आयात शुल्काचा धाक दाखवत मनमानी पद्धतीने करार करवून घेतले ते शुल्कच त्यांच्याच न्यायालयाने रद्द केले आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर बाजाराची विस्कटलेली धड़ी काही प्रमाणात नीट बसण्यास मदत होईल, असे दिसते. भारतालाही नव्याने वाटाघाटी करण्याची संधी आहे.**



अमेरिकेत जे जागतिक बाजारात बाजाराची विस्कटलेली पट्टी पुन्हा बसण्याची काहीशी शक्यता निर्माण झालीं आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या दंडेलशाहीला काही प्रमाणात चाप बसतांना दिसत आहे. ज्या मर्याद आयात शुल्काचे हत्यार ट्रम्प यांनी वापरले तेच न्यायालयाने काढुन घेतले. त्यामुळे भारतालाही व्यापार कराराचे नव्याने फेरमूल्यांकन करण्याची आणि शेतीमालाला यातून वगळण्याची संधी निर्माण झाली आहे.

भारताने १८ टक्के निर्यात शुल्क देऊन व्यापार करार करावा, की १० टक्के शुल्क भरून निर्यात करावी आणि करार थंड बस्त्यात टाकावा, ही चर्चा सुरू असतानाच शनिवारी रात्री डोनाल्ड ट्रम्प यांनी आयात शुल्कात पुन्हा वाढ करून ते १५ टक्के केले. ट्रम्प यांनी १९७७ च्या इंटरनॅशनल इमर्जन्सी इकॉनॉमिक पॉवर्स ॲक्टचा वापर करून भारतासह इतर देशांवर जशास तसे (रेसिप्रोकल) आयात शुल्क लागू केले होते. या आयात शुल्काचा हत्यारासारखा वापर करत सर्वच देशांना ट्रम्प यांनी वाटाघाटीच्या टेबलावर बसवले आहे. वास्तविकत शुल्काचा फटका केवळ निर्यातदार देशांनाच नाही, तर अमेरिकेतील ग्राहकांनाही बसत आहे. तसेच इतर देशांच्या धोरणामुळे अमेरिकेचे शेतकरीही अडचणीत आले आहेत. यामुळेच अमेरिकेच्या सर्वोच्छ न्यायालयाने ट्रम्प यांनी या कायद्यांतर्गत लागू केलेले आयात शुल्क असंविधानिक ठरवत रद्द केले.

**ट्रम्प यांचा आक्रमक पवित्रा**

ट्रम्प यांनी कोर्टाच्या निर्णयाला देशविरोधी संबोधले शुक्रवारी (ता.२०) कोर्टाने हा दणका दिल्या नंतर ट्रम्प यांनी लगेच १० टक्के शुल्क लागु केले. अमेरिकेच्या १९७४ च्या ट्रेड ॲक्ट मधील कलम १२२ नुसार १५० दिवसांसाठी १५ टक्क्यांपर्यंत आयात शुल्क लागू करता येते. अमेरिकेची चालू तूट भरून काढण्यासाठी राष्ट्राध्यक्ष असा निर्णय घेऊ शकतात. पण मुदत संपल्यानंतर त्याला अमेरिकेच्या संसदेची म्हणजेच कॉग्रेसची पुन्हा परवांगी द्यावी लागते. ट्रम्प यांनी याच कायद्याचा वापर करत शुक्रवारी १० टक्के शुल्क २४ फेब्रुवारी पासून लागु करण्याच्या आदेशावर सही केली. अमेरिकेतील या घडामोडीचा जागतिक पातळीवर लगेच परिणाम होतांना दिसला. या बदललेल्या आयात शुल्काचा काय परिणाम होणार आणि याला कसे सामोरे जायचे याची चाचपणी इतर देश करत असतांनाच ट्रम्प यांनी आयात शुल्क वाढवले. शुक्रवारी लावलेले १० टक्के शुल्क १५ टक्के केले. ट्रम्प यावरच थांबतील असे वाटत नाही. तसेच ट्रम्प यांनी सध्या लावलेल्या आयात शुल्काचे भविष्य काय, याबाबतही स्पष्टता नाही. त्यामुळे जोपर्यंत अमेरिकेच्या आयात शुल्क अधिकाराचा तिढा सुटत नाही तोपर्यंत पुढे काय होणार, हे सांगणे कठीण आहे. पण ट्रम्प यांनी काहीही बदलणार नाही, अशी स्पष्टोक्ती दिलेली आहे.

**व्यापार कराराचे भवितव्य काय?**

अमेरिके सोबत भारताने व्यापार करार करावा की नाही, याबाबतही सध्या चर्चा सुरु आहे. ट्रम्प यांना आपल्याच न्यायालयाकडून दणका मिळाला आहे. तसेच सध्या लागु असलेल्या आयात शुल्काचे काय होणार, हा देखील प्रश्न कायम आहे. कारण सध्या लावलेले शुष्क चालु टूट भरून काढण्यासाठीचा अधिकार वापरून लावले असल्याचे वरकरणी दिसते. पण अमेरिकेच्या या कायद्याचे सखोल विश्लेषण केल्यानंतर सध्याचे आधार शुल्क कायम राहील का, हे सांगता येईल त्यातच भारत अमेरिका व्यापार करार अंतिम करण्याच्या हालचाली सुरू असल्याचे वाणिज्यमंत्र्यांनी दिलेल्या माहितीवरून स्पष्ट होते. सध्या सुरु असलेल्या अनिश्चित परिस्थितीतुन मार्ग काढण्यासाठी व्यापार करार फायद्याचा आहे, असे सरकार भासविण्याचा प्रयत्न करत असले तरी अनेक प्रश्न कायम राहतात.

यात सर्वात महत्वाच्या प्रश्न म्हणजे ट्रम्प यांच्या धोरणातील अनिश्चितता. अमेरिकेसोबत व्यापार करार झाला तरी ट्रम्प याचे पालन करतील का, असा प्रश्न अनेक निर्यादार आणि उत्पादक उपस्थित करित आहेत. तसेच सध्या इतर देशांच्या तुलनेत भारतासाठी १८ टक्के शुल्काचा करार फायद्याचा आहे, हे सरकार सांगत असले तरी, ही स्थिती भविष्यातही असेल का? ट्रम्प भारताच्या इतर स्पर्धक देशांना यापेक्षा चांगल्या सवलती देणार नाहीत, याची शाश्वतो आहे का, असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहे. भारताने एकदा व्यापार करार केला आणि इतर देशांना आपण निर्यात करित असलेल्या वस्तु आणि मालासाठी जास्त सवलती दिल्या तर यावेळी भारताकडे काय पर्याय असतील हा खरा प्रश्न आहे. अमेरिका आणि बांगलादेश यांच्यात करारातून याची प्रचिती आली आहे. बांगलादेशने अमेरिकेचा कापूस आयात केला आणि त्यापासून कापड तयार करुन नियात केले. तर अमेरिका आयात शुल्क लावणार नाही. त्यामुळे बांगलादेश अमेरिकेतुन आयात वाढवू शकते. तसेही बांगलादेशात कापसाचे उत्पादन नगण्य होते, दरवर्षी कापूस आयात करावीच लागते. त्यामुळे ही सवलत बांगलादेशसाठी फायद्याची आहे. आपले वाणिज्यमंत्री ही सवलत भारतालाही मिळाल्याचे सांगतात. पण हे सांगताना ते केवळ कापड उद्योगाच्या निर्यातीच्या पातळीवर बोलत आहे. याचा भारतातील कापूस उत्पादक शेतकरी, उद्योग आणि कापसाच्या मुल्यसाखळीत काम करणा-या कामगारांवर दुर्गामी परिणाम होईल हे वाणिज्यमंत्र्यांनाही ठाऊक आहे. पण ते त्याकडे डोळेझाक करत आहेत, बांगलादेशने अमेरिकेचा कापूस घेतला तर आपली सूत आणि कापूस निर्यात कमी होईल. तसेच या सवलतीचा फायदा घेण्यासाठी देशातील उद्योगांना अमेरिकेतून शुल्कमुक्त आयातीला परवानगी दिली तर देशातील कापूस उत्पादक देशोधडीला लागतील काहीही झाले तरी शेकटों शेतक-यांवर येणार आहे. भारत-अमेरिका कराराची २ फेब्रुवारीला घोषणा झाल्यानंतर कापूस आणि कापड उद्योगाला कसा फायदा होईल, याचे विशलेषण सुरु झाले होते. पण ९ फेब्रुवारीला अमेरिका आणि बांगलादेश यांच्यात व्यापार करार झाला आणि पुन्हा भारताची कापड निर्यात, सुत निर्यात आणि कापूस निर्यातिवर संकट निर्माण झाल्याचे दिसते.

सांगण्याचे तात्पर्य म्हणजे व्यापार करारा झाल्यानंतरही सध्या साकार जो काही फायदा सांगत आहे तो कायम राहील, याची शाश्वती नाही. त्यामुळे भारत सरकारने स्पष्टता येत नाही तोपर्यंत व्यापार करार करून नये किंवा वाटाघाटीचे फेरमूल्यांकन करावे, अशी मागणी केली जात आहे. आपण ५० टक्के आणि १८ टक्के अशिी तुलना करित असलो तरी ट्रम्प यांच्या एकुण धोरणांचे अमेरिकेच्या कायद्या नुसार भविष्य काय हेच स्पष्ट नाही. शेतीचा विचार करता आतापर्यत जी माहिति दोन्ही सरकारांच्या वतिने पुढे आली त्यातुन भारताच्या शेतक-यांना फटका बसेल असे दिसते. याचा उहापोह 'ॲग्रोवन' मधून सातत्याने केला जात आहे. ट्रम्प यांच्या आयत शुल्क धोरणाला त्यांच्याच सर्वोच्छ न्यायालयाने आरसा दाखवला असतांना आपण व्यापार करार पुर्ण करण्यासाठी पुढाकार का घेत आहोत असही प्रश्न या क्षेत्रातील जाणकारांनी विविध माध्यमातून उपस्थित केला आहे.

सध्या ज्या कायद्याच्या आधारे ट्रम्प यांनी आयात शुल्क लागु केले त्याला १५ टक्क्यांची मर्यादा आहे. पुढे त्याला मुदतवाढही मिळु शकते. त्यामुळे ट्रम्प यांच्या अमर्याद आयात शुल्क लावण्याला चाप बसण्याचीही शक्यता आहे. याचा फायदा भारत चिनसह ज्या देशांवर १५ टक्के आयात शुल्क लागु आहे आणि व्यापार कराराच्या वाटाघाटी सुरु आहेत त्या देशांना होऊ शकतो. नव्या निर्णया नुसार भारतावरही सध्या १५ टक्के आयात शुल्क लागु होणार आहे. त्या त्यामुळे १८ टक्के शुल्कावर करार करावा का यावरही सरकार विचार करत असल्याचे सरकारच्या गोटातुन सांगण्यात आले. बांगलादेशनेही १९ टक्के निर्यात शुल्क मान्य करुन व्यापार करार केला. पण बांगलादेशमधील उद्योग निर्यातदार आणि अर्थतज्ञ सरकारने अमेरिकेशी पुन्हा वाटाघाटी करण्याची मागणी आपल्या सरकारकडे करत आहे. सध्यातरी ज्या देशांनी १५ टक्यांनपेक्षा जास्त शुल्कावर करार केले ते देश अमेरिकेकडे फेरविचार करण्याची मागणी करण्याची शक्यता आहे. कारण ट्रम्प यांनी या देशांना आयात शुल्काचा धाक दाखवत मनमानी पध्दतीने करार करवुन घेतले. ते शुल्कच त्यांच्या न्यायालयाने रदद केले आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर बाजाराची विस्कटलेली धड़ी काही प्रमाणात नीट बसण्यास मदत होईल, असे दिसते.

**नव्याने वाटाघाटींची संधी**

भारतालाही नव्याने वाटाघाटी करण्याची संधी आहे. भारत सरकारने डीडीडीएस, सोयातेल, लालज्वारी, ताजी आणि प्रक्रियायुक्त फळे, आक्रोट, बदाम, पेकान, हेजलनट, पिस्ता, काजू यांच्यावरील आयात शुल्क शून्य करण्याचे मान्य केले आहे. हा निर्णय शेतक-यांच्या हिताचा नाही. त्यातही दोडीडीएस आणि लाल ज्वारीला परवानगी देण्याचा निर्णय देशातील पशु खाद्य उद्योगाची दिशा बदलणारा आहे. मका आणि सोयाबीन उत्पादकांच्या अडचणी सरकार वाढवत आहे. आधी सरकारने कोणत्या आधारावर ही आयात मान्य केली हे तर स्पष्ट नाही, पण ५० टक्के शुल्काच्या धमकीला घाबरण्याचे कारण नाही. अमेरिकेच्या न्यायालयाच्या आदेशाने आयात शुल्काच्या बाबतीत भारतालाही इतर देशांच्या पंगतीत बसवले आहे. या संधीचा फायदा घेत भारत शेती मालासंदर्भात धोके लक्षात घेऊन फेर मुल्यांकन करु शकतो. त्यासाठी आपल्या सरकारच्या धोरणात्मक सक्रियतेची गरज आहे. (साभार सकाळ ॲग्रोवन)

अनिल जाधव

# परीक्षांच्या गोपनीयतेवर प्रश्नचिन्ह!

पेपर फुटीच्या प्रकरणांवर नियंत्रण आणले असल्याचा दावा शिक्षण मंडळाकडून करण्यात येत असला तरी १८ तारखेला फुटलेल्या रसायनशास्त्राच्या पेपर फुटीच्या प्रकरणामुळे मंडळाचा दावा खोटा ठरला.१८ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेला रसायनशास्त्राचा पेपर परीक्षेपूर्वीच WhatsApp वर फिरत असल्याचा संशय आहे. नागपूरमधील एका केंद्रावर एका विद्यार्थिनीच्या वारंवार वॉशरूमला जाण्यावरून संशय आल्यावर तिचा मोबाईल जप्त करण्यात आला, ज्यामध्ये प्रश्नपत्रिकेचे फोटो आढळले. परीक्षा सेंटरवर मोबाईल आणण्यास सक्त मनाई असताना विद्यार्थ्यांकडे मोबाईल येतो कसा? परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांची झाडाझडती घेतली जात नसल्याने हा प्रकार घडला का? की परीक्षा सेंटरवर आधीपासूनच मोबाईलची व्यवस्था करण्यात आली होती,असे कितीतरी प्रश्न या अनुषंगाने निर्माण होतात.संबंधित पेपर फुटी मुळे विभागीय शिक्षण मंडळाच्या कारभारावरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.व्हॉट्सॲपवर आलेल्या उत्तरांचा विद्यार्थांना प्रत्यक्ष फायदा झाला का? कॉपीसाठी प्रोत्साहन देणारा ॲडमिन कोण?पेपर फोडण्यात खाजगी ट्युशन क्लासेसचा संबंध आहे का? असे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत.

पेपर व्हाट्सॲपवरून बाहेर गेलास कसा हा तपासाचा मुद्दा आहे.पेपर फुटीच्या या घटनेने मंडळाच्या कर्मचाऱ्यांचा सहभाग होता का? याची चौकशी देखील होणे आवश्यक आहे. या घटनेमुळे बोर्ड परीक्षांच्या गोपनीयतेवर आणि सुरक्षिततेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.दरम्यान कोचिंग सेंटरचे कनेक्शन प्राथमिक तपासात एका खाजगी शिकवणी वर्गातील व्यक्तीचा सहभाग असल्याचे समोर आले असून, पैशांच्या बदल्यात पेपर पुरवल्याचा संशय आहे.प्रश्न पत्रिका फुटीचे मोठे रॅकेट असून त्याचा कसून शोध घेण्याची गरज आहे.तपासादरम्यान १६ फेब्रुवारीचा भौतिकशास्त्राचा पेपरही अशाच प्रकारे प्रसारित झाल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.प्रत्येक वर्षी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून पेपरफुटी रोखण्यासाठी अत्यंत कडक पावले उचलली जातात.पेपर फुटीच्या घटनेवर बोर्डाचे स्पष्टीकरण समोर आले आहे.महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने हा 'सरसकट पेपर फूट' नसल्याचे सांगत सध्या तरी पुनर्परीक्षा घेणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. नागपूर बोर्डाच्या अध्यक्षांनी यावर बचावात्मक पवित्र घेतला आहे. या प्रकरणाची पडताळणी सुरू असून अज्ञात व्हॉट्सॲप ग्रुप ॲडमिन आणि दोन जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा सायबर तपास आणि डिजिटल फॉरेन्सिक विश्लेषणही सुरू करण्यात आले आहे.

पुण्यातील धायरी परिसरातील एका केंद्रावर चक्क शिक्षकानीच कॉपी पुरविल्याचे उघड झाले आहे. शाळेचा निकाल शंभर टक्के लागावा म्हणून असे प्रकार सुरू असल्याचे बोलले जात आहे. बुधवारी बारावीचा रसायनशास्त्राचा पेपर होता. येथे नियुक्त शिक्षकाला या शिक्षकाने चिरीमिरी देऊन चहापानासाठी बाहेर पाठवले आणि वर्गाचा ताबा घेत विद्यार्थ्यांना केमिस्ट्रीच्या पेपरला लागणारे लॉंगबुक वाटून कॉपी करण्यास प्रवृत्त केले. आता हा सगळा प्रकार विद्यार्थ्यांनेच पालकाला सांगितले. घडलेल्या प्रकरणानंतर आता बोर्डाने या शिक्षकावर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

**प्रा.डॉ. सुधीर अग्रवाल,**
वर्धा
मो.९५६१५९४३०६

# संवाद

## माथेरानमध्ये प्रदूषण

माथेरान हे थंड हवेचे ठिकाण आहे.तेथे पर्यटक फिरावयास व निसर्ग सौंदर्य पाहण्यास जातात.माथेरानमध्ये सुमारे ४६० घोडे असून ते माथेरान मधील तांबड्या मातीवरून फिरत असतात.शिवाय त्यांच्या पासून दररोज तीन टन लीद रस्त्यावरच फेकली जाते.यामुळे साहजिकच प्रदूषण निर्माण होत आहे.याचा परिणाम तेथील लोकांच्या आरोग्यावर होत आहे.माथेरानमध्ये मोटार वाहनावर बंदी आहे.सर्व व्यवहार घोड्यावरूनच केले जातात.माथेरान हे शहर इकोसेन्सेटिव्ह झोन मध्ये असल्याने तेथे वाहनावर बंदी आहे.त्यामुळे स्थानिकांना घोड्यावर बसून करावा लागतो.याशिवाय मालाची वाहतूक सुद्धा घोड्यावरूनच केली जाते हरित ट्रिब्युनलने दिलेल्या समितीच्या निकालानुसार माथेरान मधील रहिवाशांवर आरोग्यावर होणारा वाईट परिणाम लक्षात घेऊन तेथील घोड्याचे सर्व तबेले माथेरान परिषदेच्या हद्दीबाहेर हलविण्याचा सल्ला देण्यात आला आहे.ही बातमी नुकतीच वाचली .समितीने माथेरान मधील प्रदूषण पातळीचा अभ्यास तीन टप्प्यात केला होता.त्यात पावसाळ्या अगोदर , पावसाळ्यात व पावसाळ्याच्या नंतर अशा तीन परिस्थितीचा अभ्यास केला होता.या अभ्यासातून असा निष्कर्ष निघाला की,प्रदूषणाला घोडेच जबाबदार आहेत.एकूणच प्रदूषणाला केवळ हवा व पाणी किंवा वाहने हेच जबाबदार नसून प्राणीसुद्धा जबाबदार आहेत हे माथेरान मधील घोड्यांच्या प्रदूषावरून लक्षात येते.

**शांताराम वाघ**

## गर्जना हिंदुत्वाची!

महाराष्ट्र हे छत्रपती शिवाजी महाराजांचे राज्य. छत्रपतींनी अनेक मोठ्या आक्रमणांमधून महाराष्ट्राचे रक्षण केले आणि हिंदवी स्वराज्य स्थापन केले. हे स्वराज्य टिकून ठेवणे आपले प्रत्येकाचे प्रथम कर्तव्य आहे.याच कर्तव्याची जाणीव करून देणारी हिंदू जनजागृती समितीच्या वतीने 'हिंदू राष्ट्र जागृती सभा' घेण्यात आली. राष्ट्र आणि धर्म यांच्या रक्षणासाठी हिंदूंनी संघटित व्हावे हाच मुख्य उद्देश.जाती-पातींच्या पलीकडे जाऊन विविध स्तरांतील हिंदूनी एकत्र येणे काळाची गरज आहे याचे महत्व मनावर अंकित करणारे मार्गदर्शन लाभले.लव्ह जिहाद, हलाल सक्ती आणि धर्मांतर यांसारख्या विषयांचे गांभीर्य सभेतून लक्षात आले. धर्मावर होणाऱ्या आघातांविरुद्ध सज्ज राहण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.'आपल्या अस्तित्वासाठी आणि येणाऱ्या पिढ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी संघटित हिंदू समाज हीच खरी ताकद आहे,' याची जाणीव सभेच्या निमित्याने झाली.

**वर्षा आवदे**

## बांगलादेशातील सत्तांतर

भारताचा शेजारी असलेल्या बांग्लादेशात जुलै २०२४ मध्ये झालेल्या उठावानंतर पहिल्यांदाच निवडणुका झाल्या. अवामी लीग शर्यतीत नसल्याने तारिक रहमान यांच्या बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी ( बीएनपी ) पक्षाने ३०० पैकी तब्बल २१२ जागा जिंकल्या. त्यांचे प्रतिस्पर्धी असलेले जमाते इस्लामी आणि नॅशनल सिटीझन्स पार्टीला नगण्य जागा मिळाल्या. तारिक रहमान हे बांगलादेशच्या माजी पंतप्रधान बेगम खालिदा जिया यांचे सुपुत्र आहेत. गेल्या सतरा वर्षापासून त्यांचे वास्तव्य अमेरिकेत होते. त्यांच्या मातोश्री बेगम खालिदा झिया या तुरुंगात होत्या. शेख हसिना यांचे सरकार पाडल्यावर मोहम्मद युनूस यांना त्यांना तुरुंगातून बाहेर काढले. याच दरम्यान तारिक रहमान अमेरिकेतून बांग्लादेशात आले. आता ते पंतप्रधान बनले आहेत. त्यांच्या कारकिर्दीत भारत आणि बांगलादेश यांच्यातील बिघडलेले संबंध पूर्ववत होतील अशी अपेक्षा आहे.त्यांचा पक्ष हा पूर्वीपासून पाकिस्तान आणि चीन धार्जिणा आहे त्यामुळेच तारिक रहमान देखील मोहम्मद युनूस यांच्याप्रमाणेच पाकिस्तान आणि चीनच्या हातचे बाहुले बनतील असे वाटते. अर्थात बांगलादेशशी भारताचे संबंध मैत्रीपूर्णच असावेत असाच प्रयत्न भारताचा राहील. अर्थात या प्रयत्नांना तारिक रहमान कसा प्रतिसाद देतात यावरच सारे अवलंबून आहे.

**श्याम ठाणेदार**

E-mail :-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

# यवतमाळ जिल्ह्यात अवकाळीचा तडाखा, शेतकरी चिंतेत

## उमरखेड, राळेगाव, पुसद तालुक्यांत पावसाचा कहर, पैनगंगा परिसरातील पिकांचे मोठे नुकसान



**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - जिल्ह्यातील उमरखेड, राळेगाव व पुसद तालुक्यांत फेब्रुवारी महिन्यातच झालेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांना मोठा फटका दिला आहे. गेल्या रात्री व आज सकाळी झालेल्या जोरदार पावसासह वादळी वाऱ्यामुळे शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेतकरी वर्ग चिंतेत सापडला आहे.

विशेषत, पैनगंगा परिसरात रविवारी (दि. २२) रात्री अचानक झालेल्या मुसळधार पावसाने आणि वादळी वाऱ्याने थैमान घातले. घमापुर, कुरळी, नारळी, अमडापूर, टाकळी (बंदी), चिखली (वन), भवानी, वालतूर, कोरटा, दराटी (बंदी) आदी गावांमध्ये उभी पिके आडवी पडली असून काढणीस तयार असलेला गहू व हरभरा जमिनीवर कोसळला आहे.अचानक झालेल्या पावसामुळे शेतात पाणी साचले असून गहू, हरभरा, ज्वारी, मका तसेच फळबागा व भाजीपाला पिकांची गुणवत्ता घसरली आहे. हातातोंडाशी आलेले पीक नष्ट झाल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र चिंता व्यक्त होत आहे. शेती हाच मुख्य उत्पन्नाचा स्रोत असल्याने या नुकसानीचा थेट परिणाम कुटुंबांच्या उदरनिर्वाहावर होणार आहे.दरम्यान, हवामान विभागाने पुढील काही तासांत जिल्ह्यात पुन्हा अवकाळी पावसाची शक्यता वर्तविल्याने शेतकऱ्यांची धास्ती वाढली आहे.

या पार्श्वभूमीवर शासनाने तातडीने पंचनामे करून वस्तुनिष्ठ सर्वेक्षण करावे व बाधित शेतकऱ्यांना त्वरित नुकसानभरपाई जाहीर करावी, अशी मागणी स्थानिक शेतकरी व नागरिकांकडून होत आहे. तसेच कृषी व महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

### राळेगाव तालुक्यात वीज कोसळून पाच जखमी

राळेगाव तालुक्यातील झरगड येथे सोमवारी दुपारी दोन ते तीन वाजण्याच्या सुमारास शेतात काम सुरू असताना वीज कोसळून पाच जण जखमी झाले. झरगड येथील शेतकरी चंद्रभान पचारे यांच्या शेतात मजूर व कुटुंबीय शेतीकाम करत असताना अचानक विजांचा कडकडाट व पाऊस सुरू झाला. सर्वांनी झाडाचा आश्रय घेतला असता त्या झाडाजवळच वीज कोसळली. यात दोन पुरुष व तीन महिला गंभीर जखमी झाले. गावकऱ्यांनी तत्काळ धाव घेत जखमींना सुमारे एक किलोमीटर अंतर उचलून आणले व वाहनाने ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. प्राथमिक उपचारानंतर काहींची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी श्री वसंतराव नाईक मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल येथे हलविण्यात आले. जखमींमध्ये शेतकरी चंद्रभान पचारे, त्यांचे साडू गणेश नान्हे (रा. कात्री), तसेच शेतात कापूस वेचणीसाठी आलेल्या महिला विमल पदिले, वंदना पदिले व सुनिता राऊत यांचा समावेश आहे. यापैकी दोघांची प्रकृती गंभीर असल्याचे समजते. घटनेची माहिती मिळताच तहसीलदार भोईटे यांनी रुग्णालयात भेट देऊन जखमींची विचारपूस केली. या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त होत असून परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# साखरा येथे सुसाट वेगाने धावणारा ट्रॅक्टर ट्रालीसह पुलाखाली पलटी ?

## ट्रॅक्टरखाली दबल्याने एका मजुराचा जागीच मृत्यू तर तीन जखमी?



**जनमाध्यम प्रतिनिधी**

घाटंजी - तालुक्यातील साखरा(खु.) येथे आज सकाळी ८.०० वाजता एका भरधाव वेगाने चालणाऱ्या ट्रॅक्टरच्या चालक बसस्टॅन्ड येथे गाडी थांबवून नास्ता करण्यासाठी गेला असता एका मजुराने गाडीला सेल्फ मारून गाडी चालू केली असता त्याचा नियंत्रण सुटल्याने ट्रॅक्टर, ट्रालीसह साखरा गावाजवळील एका छोट्यासा रप्ट्यावरून ट्रॅक्टर पलटी खाल्याने एका मजुराचा जागीच मृत्यू झाला असून तीन जण जखमी आहे. जखमीना उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय घाटंजी येथे पाठविण्यात आले.

गाडी नंबर MH-29BC-6686 वर नेहमीसाठी वाहन चालक म्हणून वाहन चालवायचे पण काल सकाळी सर्व मजूर ट्रॅक्टर मालकाच्या शेतात तुरीचा कुटार आणण्यासाठी जात असताना बस स्टॅन्ड साखरा येथे गाडी उभी करून नेहमी चालवीणारा ट्रॅक्टर चालक नास्ता करण्यासाठी गेला असता गाडीला चावी लावलेली पाहून गाडीवरील एका मजुराने ट्रॅक्टर चालू करून भरधाव वेगाने जात असतांना गावाजवळच एका छोटया रपट्यावर नियंत्रण सुटल्याने ट्रॅक्टर पलटी होऊन किसन सीताराम मेश्राम वय अंदाजे 50 वर्ष यांचा जागीच मृत्यू झाला तर तीन जण जखमी झाले, जखमी झालेल्यापैकी निलेश ढोले, बंडू जाधव व पिंटू मेश्राम असे तीन मजूर होते त्यांना प्राथमिक उपचारासाठी घाटंजी रुग्णालय येथे पाठविण्यात आले आणि नंतर त्यांना यवतमाळ येथे उपचारासाठी पाठविण्यात आले.

वरील झालेल्या घटनेची माहिती पोलीस स्टेशन घाटंजी यांना दिली असता पोलीस घटनास्थळी येऊन प्राथमिक पंचनामा करून मृत व्यक्तीची शव शवविच्छेदणासाठी ग्रामीण रुग्णालय घाटंजी येथे पाठविण्यात आले.

सदर घटनेची चौकशी पोलीस निरीक्षक श्री किशोर ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुशील शर्मा करीत आहे.

### साखरा चौफुलीवरील होणारे अपघात सा. बा. विभाग गतिरोधक देऊन थांबवतील का?

मागील कित्तेक वर्षांपासून साखरा चौफुलीवर गतिरोधक नसून ते बसविण्याकरिता ग्रामपंचायतच्या ठरावासह अनेक निवेदणाद्वारे ग्रामस्थांनी मागणी केली असून सा. बा. विभाग त्याकडे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. ही घटना पहिली नसून याआधी दोन ते तीन प्रवाशांचे अपघात होऊन जागीच मृतू झाला आहे पुन्हा किती जीव घेतल्यानंतर संबंधित विभागाला जाग येईल असा संतप्त सवाल गावाकऱ्यांनी उपस्थित केला आहे.

संबंधित विभागाला विचारणा केली असता घाटंजी पांढरकवडा रोडचा काम इंगल कंपनी करत असून, कंपनीला वारंवार पत्र व्यवहार करून आणि मौखिक सूचना देऊनही सदर कंपनी अपूर्ण राहिलेले कामे पूर्ण करत नाही त्यामुळे आम्ही गतिरोधक बसविले नसल्याचे सांगितले आहे.



## सहा वर्षाच्या अजफरीन फातेमा हिने केले पहिला रोजा पुर्ण

उमरखेड़ - पवित्र रमजान महिन्याची सुरुवात मोठ्या भक्तीभावाने झाली असुन उमरखेड़ येथील शिक्षक मोहम्मद अरिफोद्दीन यांच्या अजफरीन फातेमा या सहा वर्षीय चिमुकलीने आपला पहिला रोजा पुर्ण केला आहे. रमजान महिना मुस्लिम समाजासाठी अत्यंत पवित्र असुन या महिन्यात पहाटेपासून सूर्यास्तापर्यंत उपवास ठेवला जातो. नमाज पठण, कुराण वाचन, दानधर्म आणि गरजुची मदत याला विशेष महत्व असते. अजफरीन फातेमा हिने श्रद्धेने व उत्साहाने पहिला रोजा ठेवत कुटुंबीयासोबत नमाज अदा केली. तिच्या या धार्मिक भावना व चिकाटीचे परिसरात कौतुक होत आहे.

# वेचक

## आठ वर्षीय राहत अज़ीम खान पठाण हिचा पहिला रोजा उत्साहात, कुटुंबात आनंदाचे वातावरण



दिग्रस - मोतीनगर परिसरातील आठ वर्षीय राहत अज़ीम खान पठाण हिने यंदा आपल्या आयुष्यातील पहिला रोजा अत्यंत श्रद्धा, उत्साह आणि शिस्तीने पूर्ण केला. एवढ्या लहान वयात रोजा ठेवून नमाज अदा करणे, धार्मिक नियमांचे पालन करणे आणि संयम राखणे या सर्व गोष्टी तिने प्रामाणिकपणे पार पाडल्या. तिच्या या कृत्यामुळे कुटुंबीयांमध्ये अभिमानाची भावना निर्माण झाली आहे. रमजान हा इस्लाम धर्मातील पवित्र महिना मानला जातो. या महिन्यात रोजा ठेवणे म्हणजे संयम, त्याग, आत्मशुद्धी आणि ईश्वरभक्तीचे प्रतीक मानले जाते. राहतने दिवसभर उपवास करून अल्लाहची इबादत केली आणि सायंकाळी नियमानुसार इफ्तार करून आपला पहिला रोजा पूर्ण केला. तिच्या या जिद्दीचे आणि श्रद्धेचे सर्वत्र कौतुक होत आहे. पहिल्या रोजाच्या निमित्ताने तिच्या घरी आनंदाचे वातावरण होते. कुटुंबीयांनी तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करत तिचे कौतुक केले. या विशेष प्रसंगी छोटेखानी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. नातेवाईक, मित्रपरिवार आणि शेजाऱ्यांनी उपस्थित राहून राहतला शुभाशीर्वाद दिले आणि तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रार्थना केली. स्थानिक नागरिकांनी सांगितले की, आजच्या काळात लहान मुलांमध्ये धार्मिक संस्कार आणि शिस्तीचे महत्त्व वाढविणे गरजेचे आहे. राहतने एवढ्या कमी वयात दाखवलेली श्रद्धा आणि चिकाटी इतर मुलांसाठी प्रेरणादायी ठरणारी आहे. मोतीनगर परिसरात तिच्या पहिल्या रोजानिमित्त आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. सर्वांनी राहतच्या उत्तम आरोग्यासाठी, प्रगतीसाठी आणि यशस्वी भविष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. राहत अज़ीम खान पठाण हिला तिच्या आयुष्यातील पहिल्या रोजाबद्दल हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

## हिवरा ग्रा.प. कार्यालयात राष्ट्रसंत गाडगेबाबा जयंती साजरी



महागाव - आज दि.23/02/2026 रोजी ग्रामपंचायत कार्यालय हिवरा (सं) येथे राष्ट्रसंत गाडगेबाबा यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी संत गाडगेबाबा यांच्या जयंती निमित्त स्वच्छता दूत म्हणून काम करणारे हिवरा येथील प्रतिष्ठित नागरिक श्री विष्णू दिगंबर कर्मोडकर यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला यावेळी ग्रामपंचायत उपसरपंच शरद पाटील, ग्रामपंचयात सदस्य राजुभाऊ धोतरकर व गावातील जेष्ठ नागरिक अजीस शेख महसूल सेवक जीवन जाधव ग्रामपंचायत कर्मचारी सुधीर कदम, अशोक भुसारे, राहुल आंडगे, समाधान मोरे उपस्थित होते.

## जिल्हाधिकारी कार्यालयात संत गाडगेबाबा जयंती साजरी

यवतमाळ - जिल्हाधिकारी कार्यालयात आज संत गाडगेबाबा यांची जयंती साजरी करण्यात आली. नायब तहसीलदार विजय गावंडे यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी उपस्थित अधिकारी कर्मचाऱ्यांनी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

## शासकीय तंत्रनिकेतन यवतमाळ येथे वसतिगृह सुरक्षा समितीची बैठक संपन्न

यवतमाळ - शासकीय तंत्रनिकेतन यवतमाळ येथे वसतिगृह सुरक्षा समितीची बैठक शनिवारी पार पडली. या बैठकीचे अध्यक्षस्थान शहर पोलीस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक जी. ई. काळूसे यांनी भूषविले. बैठकीच्या प्रारंभी संस्थेचे प्राचार्य ए. पी. मटाले यांनी अध्यक्षांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. तसेच उज्वला शिरभाते यांनी समिती स्थापन करण्यामागील उद्देश व गरज याबाबत सविस्तर माहिती दिली. या सभेस विद्यार्थी वसतिगृह कुलमंत्री पी. पी. पवार, विद्यार्थिनी वसतिगृह कुलमंत्री एस. एस. कांबळे, समिती सदस्य सी. के. काळे, ज्येष्ठ नागरिक जी. के. पत्रकार, पालक प्रतिनिधी एस. आर. खंगार व एस. एस. गोरे उपस्थित होते.

# दोन वर्षांपासूनचा नालीचा प्रश्न मार्गी; स्वीकृत नगरसेवक संजय सल्लेवाड यांचा पुढाकार

**जनमाध्यम प्रतिनिधी**

ढाणकी - गेल्या दोन वर्षांपासून वादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या टेम्बेश्वर नगर येथील प्रभाग ८मधील नालीचा प्रश्न अखेर निकाली निघाला आहे. स्वीकृत नगरसेवक संजय सल्लेवाड यांनी स्वतः पुढाकार घेत या नालीला वाट करून दिल्याने परिसरातील नागरिकांनी सुटकेचा निश्वास टाकला आहे.

गेल्या दोन वर्षांपासून या नालीच्या प्रवाहावरून स्थानिक पातळीवर वाद सुरू होता. नाली तुंबल्याने आणि पाण्याचा निचरा होण्यास जागा नसल्याने परिसरात दुर्गंधी पसरली होती, तसेच आरोग्याचा प्रश्नही गंभीर बनला होता. अनेक प्रयत्न करूनही हा वाद सुटत नव्हता. नागरिकांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन स्वीकृत नगरसेवक संजय सल्लेवाड यांनी या विषयात मध्यस्थी केली. त्यांनी केवळ चर्चा न करता प्रत्यक्ष घटनास्थळी उपस्थित राहून कामाला सुरुवात केली . तांत्रिक अडचणी दूर करून आणि वादावर तोडगा काढून नालीचा मार्ग मोकळा



करण्यात आला.

यावेळी प्रभाग 7 चे नगरसेवक रवी ढोबळे व प्रभाग 8 चे नगरसेवक प्रतिनिधी इम्रान शेख उपस्थित होते. या कामामुळे परिसरातील साचलेल्या पाण्याचा निचरा झाला असून, पावसाळ्यात निर्माण होणारी भीती आता दूर झाली आहे. लोकप्रतिनिधीने दाखवलेल्या या कार्यतत्परतेबद्दल टेम्बेश्वर नगर येथील नागरिकांनी त्यांचे आभार मानले आहेत.

# पांढरकवडा नगर परिषदेत 'जनजागृती'च्या नावाखाली लाखो रुपयांचा डल्ला

## २०२०-२५ दरम्यानच्या आय इ सी निधीत मोठ्या गैरव्यवहाराचा आरोप

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा - येथील नगर परिषदेत 'स्वच्छ भारत अभियान' आणि 'माझी वसुंधरा' यांसारख्या महत्त्वाकांक्षी योजनांच्या नावाखाली मोठा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे समोर येत आहे. शहरात स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यासाठी आलेल्या आय इ सी निधीचा विनियोग न करता, केवळ कागदोपत्री बोगस कामे दाखवून लाखो रुपये हडप करण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी येथील सामाजिक कार्यकर्ते योगेश बाबाराव पडोळे यांनी नगर परिषद प्रशासनाकडे तक्रार दाखल केली असून उच्चस्तरीय चौकशीची मागणी केली आहे.

शासनाकडून स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यासाठी, भिंतीवर चित्रकला (वॉल पेंटिंग), होर्डिंग्ज लावणे, पथनाट्ये सादर करणे आणि विविध उपक्रम राबवण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी दिला जातो. तक्रारदार योगेश पडोळे यांच्या दाव्यानुसार, २०२० ते २०२५ या पाच वर्षांच्या कालावधीत शहरात काही मुख्य चौकांत जुजबी भिंतीचित्रे काढून 'काम केले' असा देखावा निर्माण केला जातो. मात्र, या मोजक्या कामांच्या आडोशाने लाखांची बिले लाटली जात मात्र, कागदोपत्री सर्व कामे पूर्ण झाल्याचे दाखवून कंत्राटदारांची देयके काढण्यात आली आहेत. शहरात कुठेही नवीन वॉल पेंटिंग किंवा स्वच्छतेचे संदेश देणारे फलक प्रत्यक्षात दिसत नसताना, केवळ कागदोपत्री भिंती रंगवल्याचे दाखवण्यात आले आहे. कोणत्याही प्रकारची ठोस कामे न करता केवळ बोगस देयके सादर करून शासकीय तिजोरीवर दरोडा टाकण्यात आल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात आला आहे. या संपूर्ण प्रकरणात निविदा प्रक्रियेत पारदर्शकता धाब्यावर बसवण्यात आली असून, ठराविक एजन्सीला फायदा पोहोचवण्यासाठी अधिकार आणि कंत्राटदार यांच्यात संगनमत होऊन 'टेंडर मॅनेज' करण्यात आले विशेष म्हणजे, स्वच्छतेचा संदेश देण्यासाठी आयोजित केल्या जाणाऱ्या पथनाट्यांचा आणि उपक्रमांचा पत्ताच नाही, ज्यामुळे शासनाचा मूळ उद्देश तर बाजूलाच राहिला, पण जनतेच्या कराचा पैसा मात्र लाटण्यात आला आहे. या प्रकरणात सहभागी असलेले अधिकारी आणि कंत्राटदार यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी आग्रही मागणी योगेश पडोळे यांनी केली आहे. या संदर्भात त्यांनी माहिती अधिकारांतर्गत पुरावे गोळा करण्यास सुरुवात केली असून, दोषींकडून अपहाराची रक्कम वसूल करण्याची मागणीही लावून धरली आहे. आता या तक्रारीनंतर प्रशासन काय भूमिका घेते आणि या 'कागदोपत्री जनजागृती'मागचे खरे चेहरे समोर येतात का, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

> शहराच्या विकासासाठी आणि स्वच्छतेसाठी येणारा निधी काही भ्रष्ट अधिकारी आणि कंत्राटदारांच्या खिशात जात असेल, तर ते दुर्दैवी आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी. **– योगेश पडोळे, तक्रारदार, पांढरकवडा**

# निविदा प्रक्रियेत होणाऱ्या भ्रष्टाचारविरुद्ध पुसद काँग्रेस आक्रमक

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - सार्वजनिक बांधकाम विभाग पुसद अंतर्गत विकासकामा साठी निविदा प्रकाशित केल्या जात आहे स्थानिक आमदार तथा मंत्र्यांच्या आशीर्वादाने निविदा प्रक्रियेत आनागोंदी सुरु असून मर्जीतील कंत्रात दाराला काम देता येईल या साठी चार- चार,पाच- पाच महिने निविदा न उघळणे, कंत्रात दाराला निविदा सादर करण्यापासुन रोखणे, कंत्रातदाराणा धमक्यादेणे, निविदा सादर करणाऱ्या कंत्रात दारा कडून वारवार कागद पत्राची मागणी करणे आणि दुसरी कागद सादर करू नका अशा प्रकारचा दबाव आणणे हे सर्व प्रकार सार्वजनिक बांधकाम विभागात चालू आहे. यामुळे मोठ्या प्रमानात भ्रष्टाचार वाढलेला आहे त्यामुळे कामाचा दर्जा राहिलेला नाही मागील वर्षभरात कंत्रात दाराकडून कामे झालेली आहेत हेअतिशय निकृष्ठ दर्जाची आहे हे उघड डोळ्याने दिसत आहे.

शसकीय विश्राम गृह पुसदच्या नवीन बांधकाम करिता सुमारे 6 महिन्या पूर्वी निविदा प्रकाशित झाली होती मात्र ती आज रोजी उघळण्यात आली नाही सदर निविदा उघळण्याबाबत 27 जानेवारी 2026 रोजी निवेदन देण्यात आले होते परंतु निविदा



उघळणेबाबत 20 फेब्रुवारी 2026 पर्यन्त कार्यवाही झाली नाही. म्हणून पुसद तालुका व शहर काँग्रेस कमेटीतर्फे 23 फेब्रुवारी पासून साखळी उपोषण करणे बाबदतचा निर्णय घेतला. उपोषण सुरु झाल्यामुळे निविदा उघलण्याची कामाला धावपळ करीत सुरु झालेली आहे. मात्र निविदा उघळणे हा प्रश्न आज राहिला नाही तर निविदा उघळण्या करिता कुठलेही तांत्रिक कारण नसतांना चार पाच महिन्याचा कालावधी लावल्यागेला या दिरंगाईसाठी जबाबदार असलेले कर्मचारी व अधिकाऱ्या वर त्वरित कार्यवाही व्हावी या साठी साखळी उपोषणाची सुरवात केली आहे संबंधितांनी या बाबत आवश्यक ती कार्यवाव्ही त्वरित करावी, अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल आणि होणाऱ्या परिणामास सबंधित अधिकारी जवाबदार राहील असा इशारा काँग्रेस पक्षातर्फे देण्यात आला आहे.

# अमरावती विभागीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत यवतमाळ जिल्हा अव्वल

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - यंदाच्या तीन दिवसीय अमरावती विभागीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा जिल्हा क्रीडा संकुल यवतमाळ येथे उत्साहात पार पडल्या. या दोन्ही स्पर्धेत विभागातील पाचही जिल्ह्यांमधून यवतमाळ जिल्ह्याने अव्वल स्थान गाठत पहिल्या क्रमांकाचे बक्षिस पटकावले. तर सर्वसाधारण क्रीडा स्पर्धेत अमरावती जिल्ह्याने व सांस्कृतिक स्पर्धेत अमरावती विभागीय आयुक्त कार्यालयाने द्वितीय क्रमांकाचे बक्षिस मिळवले. या बक्षिसांचे वितरण विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांच्या हस्ते करण्यात आले.

या बक्षिस वितरण सोहळ्याला जिल्हाधिकारी विकास मीना, विभागीय अपर आयुक्त संजय जाधव, विरेंद्र हजारे, अपर जिल्हाधिकारी अनिल खंडागळे, निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी, महसूल कर्माचारी संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष दिलीप कोलेवाड आदी मान्यवर उपस्थित होते. "अमरावती विभागीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा उत्साहात व आनंदी वातावरणात झाल्याचा आनंद आहे. या स्पर्धांमध्ये



अधिकारी- कर्मचारी ज्या उत्साह व आनंदाने सहभागी झाले, तोच उत्साह व आनंदी वातावरण नेहमी कायम ठेवावे आणि खिलाडूवृत्तीने नियमित कामकाज करावे. तसेच या स्पर्धेत जे सहभागी झाले नाही त्यांनाही प्रोत्साहित करावे. जीवनात नेहमी आनंदी राहून उत्साहाने आपले कामकाज करावे", असे आवाहन विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांनी यावेळी केले. "ही स्पर्धा कौटुंबिक वातावरणात झाली. या स्पर्धेत खेळाडूंनी दाखवलेली शिस्त, वचनबद्धता, समर्पण भावना अविस्मरणीय असून त्यांचा उत्साह कौतुकास्पद आहे. हीच भावना आणि उत्साहाची प्रशासनाच्या नियमित कामकाजात अंमलबजावणी करावी. मैदानावर जिंकण्यासाठी शिस्त, टिम वर्क आणि नेतृत्व गुण महत्त्वाचे असतात ते नियमित प्रशासनात आण्यासाठी लक्ष्य केंद्रीत करावे. तसेच जनतेच्या कामांसाठी हे गुण आत्मसात करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विकास मीना यांनी केले. या स्पर्धेत विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ आणि वाशिम जिल्ह्यातील चमू सहभागी झाले होते. क्रीडा स्पर्धेत विभागीय आयुक्त कार्यालयास ५९, अकोला ८५, अमरावती २०१, यवतमाळ २८५, बुलढाणा ७८ आणि वाशिम १०९ अशी अंतिम गुणतालिका जाहीर करण्यात आली. तसेच सांस्कृतिक स्पर्धेत विभागीय आयुक्त कार्यालयास २४४.५ व यवतमाळ जिल्ह्यास २६४.५ गुण मिळाले. या बक्षिस वितरण सोहळ्यात विविध सांघिक व एकल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांमधील विजेता, उपविजेत्यांचा पारितोषिक देवून सन्मान करण्यात आला. यात कबड्डी, क्रिकेट, वॉलीबॉल, फुटबॉल, बॅडमिंटन, टेबल टेनिस, खो-खो आदी क्रीडा स्पर्धा व नृत्य, अभिनय, गीतगायन, नाटक आदी सांस्कृतिक स्पर्धेतील विजेत्यांचा समावेश होता. या सोहळ्याचे प्रास्ताविक निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी यांनी केले.

# आष्टेडू मर्दानी आखाडा विभागीय स्पर्धेत 'शौर्य आत्मरक्षा केंद्रा'च्या १३ विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - श्री छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त अष्टेडु आखाडा असोसिएशन यांच्या वतीने आयोजित शिवकालीन मर्दानी खेळाच्या विभागीय स्पर्धेमध्ये 'हिंदू गर्जना प्रतिष्ठान' द्वारा संचालित शौर्य आत्मरक्षा प्रशिक्षण केंद्राच्या विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्याची चुणूक दाखवत नेत्रदीपक कामगिरी केली आहे. या स्पर्धेत केंद्रातील एकूण १३ विद्यार्थ्यांनी पदके पटकावून संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.

शिवजयंतीच्या उत्सवाचे औचित्य साधून आयोजित केलेल्या या स्पर्धेत विविध स्तरांवरील खेळाडूंनी सहभाग घेतला होता. यामध्ये शौर्य आत्मरक्षा प्रशिक्षण केंद्राच्या विद्यार्थ्यांनी शिस्तबद्धता आणि उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. यशस्वी विद्यार्थ्यांची नामावली: मेडल प्राप्त करणाऱ्या यशस्वी



खेळाडूंमध्ये आराध्या इंगोले, नितेश नगरधने, शुभ्रा जोशी, अनन्या हराळ, ओवी चिरडे, स्वास्तिका मौर्य, तनिष्क जयस्वाल, रचित घड्याळे, शिवराज घुमनर, ऋतुंबरा कवाने, अनुष्का नगरधने, मृगनयनी शेंडे आणि स्वरांजली खोलगाडगे यांचा समावेश आहे. या सर्व विद्यार्थ्यांनी आपापल्या वयोगटात आणि प्रकारात उत्कृष्ट कामगिरी करत पदके मिळवली. मार्गदर्शकांचे प्रोत्साहन: विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांचे मार्गदर्शक हिंदूगर्जना प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष सागर सरनाईक आणि प्रशिक्षक गजानन घुमनर यांचे मोलाचे मार्गदर्शन व विशेष सहकार्य लाभले. प्रशिक्षण केंद्रात मिळणारे दर्जेदार प्रशिक्षण आणि विद्यार्थ्यांची जिद्द यामुळेच हे यश संपादन करता आले, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या. या यशाबद्दल हिंदू गर्जना प्रतिष्ठानचे पदाधिकारी, पालक आणि क्रीडाप्रेमींकडून विद्यार्थ्यांचे व प्रशिक्षकांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# भाजप शहर उपाध्यक्षांच्या पाठपुराव्याला यश, दिव्यांग लाभार्थ्यांना मिळाला प्रलंबित निधी

**जनमाध्यम प्रतिनिधी**

महागाव - नगरपंचायत हद्दीतील दिव्यांग लाभार्थ्यांचा प्रलंबित निधी अखेर वितरित करण्यात आला असून, भाजप शहर उपाध्यक्ष विवेक राजेंद्र नरवाडे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे. अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या या निधीमुळे दिव्यांग लाभार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

नगरपंचायत प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही काही पात्र लाभार्थ्यांना निधी मिळत नसल्याची बाब समोर आली होती. उपचार, शिक्षण, सहाय्यक साधने तसेच दैनंदिन उपजीविकेसाठी हा निधी अत्यंत आवश्यक असताना विलंब होत असल्याने लाभार्थ्यांमध्ये नाराजी निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर अवधूत नरवाडे व भाजप शहर उपाध्यक्ष विवेक राजेंद्र नरवाडे यांनी संबंधित प्रकरण गांभीर्याने घेत प्रशासनाशी सातत्याने पाठपुरावा केला. नरवाडे यांनी नगरपंचायत अधिकाऱ्यांशी चर्चा करून पात्र लाभार्थ्यांच्या कागदपत्रांची पडताळणी तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली होती. तसेच उर्वरित निधी तात्काळ वितरित करण्याची ठाम भूमिका मांडली होती. अखेर प्रशासनाने या प्रकरणाचा आढावा घेत प्रलंबित निधी वितरित करण्याचा निर्णय घेतला. याअंतर्गत दिव्यांग लाभार्थी मंदा अंबादास वटाणे, ऋतिक अवधूत नरवाडे, शरद सुभाष कदम, दिलीप मारुती गाडे तसेच चैतन्य अमोल सुरोशे यांना निधी मिळून दिला आहे. निधी प्राप्त झाल्याने संबंधित लाभार्थ्यांनी समाधान व्यक्त केले असून, वेळेवर मदत मिळाल्याने आमचा मोठा प्रश्न मार्गी लागला, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली. या संपूर्ण प्रक्रियेत शैलेश कोपरकर व सुरेश पाटील नरवाडे यांनीही महत्त्वपूर्ण सहकार्य केले. लाभार्थ्यांची कागदपत्रे पूर्ण करून देणे, प्रशासनाशी समन्वय साधणे आणि पाठपुराव्यात सक्रिय सहभाग घेणे यामुळे निधी वितरणाची प्रक्रिया गतीमान झाली, असे सांगण्यात आले. दिव्यांगांसाठी शासनाच्या विविध योजनांतर्गत दिला जाणारा निधी हा त्यांच्या जीवनमान उंचावण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा असतो. अशा निधीच्या वितरणात होणारा विलंब अनेक अडचणी निर्माण करतो. त्यामुळे प्रशासनाने भविष्यात अशा प्रकरणांत अधिक तत्परता दाखवावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

भाजप शहर उपाध्यक्ष विवेक राजेंद्र नरवाडे यांनी सांगितले की, "दिव्यांग बांधवांना त्यांचा हक्काचा निधी मिळवून देणे ही आपली जबाबदारी आहे. पुढेही अशा प्रश्नांवर ठामपणे आवाज उठवू. एकूणच, सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे दिव्यांग लाभार्थ्यांना प्रलंबित निधी मिळाल्याने दिलासा मिळाला असून, प्रशासनानेही सकारात्मक पाऊल उचलल्याचे दिसून येत आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# होळीनिमित्त मेळघाटातील आदिवासी मजुरांना दिलासा

## आ. केवलराम काळे यांच्या पाठपुराव्याला यश

**अचलपूर/ वार्ताहर**

मेळघाटातील आदिवासी बांधवांसाठी होळीपूर्वीच आनंदाची बातमी समोर आली आहे. राज्य शासनाने रोजगार हमी योजनेअंतर्गत प्रलंबित मजुरी अदा करण्यासाठी तब्बल ६७ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून पुढील दोन ते तीन दिवसांत ही रक्कम थेट मजुरांच्या बँक खात्यात जमा होणार आहे. रोजगार हमी योजना विभागाचे मंत्री भरतशेठ गोगावले यांनी ही माहिती दिली.

मेळघाटातील आदिवासीबहुल भागांमध्ये अकुशल मजुरांना रोजगार हमी योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणात काम देण्यात आले होते. मात्र वाढीव लेबर बजेट मान्यतेचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे विचाराधीन असल्यामुळे काही कालावधीपासून मजुरी अदा करण्यात विलंब झाला होता. परिणामी हजारो आदिवासी मजुरांवर आर्थिक संकट ओढवले होते. होळीच्या पार्श्वभूमीवर मजुरी रखडल्याने सण कसा साजरा करायचा, असा प्रश्न कुटुंबांसमोर निर्माण झाला होता.यासंदर्भात स्थानिक वृत्तपत्रांमध्येही मेळघाटातील मजुरांची व्यथा अधोरेखित करण्यात आली होती. हजारो मजूर दोन महिन्यांपासून मजुरीच्या प्रतीक्षेत असल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले होते. या पार्श्वभूमीवर मेळघाटातील प्रश्न गांभीर्याने घेत आमदार केवलराम काळे यांनी तातडीने पाठपुरावा सुरू केला

.आमदार केवलराम काळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, रोजगार हमी मंत्री भरतशेठ गोगावले तसेच रोजगार हमी आयुक्त यांच्याशी सातत्याने पत्रव्यवहार केला. मुंबई येथे प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांनी मेळघाटातील आदिवासी मजुरांची परिस्थिती मांडली व रखडलेली रक्कम तातडीने वितरित करण्याची मागणी केली.त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना अखेर यश आले असून ६७ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

संबंधित देयके कोषागाराकडे सादर करण्यात आली असून



सोमवारपासून मजुरी थेट मजुरांच्या खात्यात जमा होण्यास सुरुवात होणार आहे.या निर्णयामुळे मेळघाटातील सुमारे हजारो आदिवासी कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार असून होळीचा सण आनंदात साजरा करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मेळघाटातील आदिवासी बांधवांच्या प्रश्नांवर ठाम भूमिका घेत प्रभावी पाठपुरावा करणारे लोकप्रतिनिधी म्हणून आमदार केवलराम काळे यांची ओळख अधिक दृढ होत असल्याची प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

## राजू गंधे यांच्या जनमत स्वाक्षरी आंदोलनाला यश

**शिराळा**- शिराळा येथे अपघाताचे प्रमाण वाढत असतांना गतिरोधक बसवण्याकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाला वारंवार



विनंती करून सुद्धा गतिरोधक बसवण्यास विलंब होत होता. याची दखल घेत तिवसा मतदार संघांचे आमदार राजेश वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपाचे राजू गंधे यांच्या कल्पनेतून शिराळा गावात जन मत आंदोलन राबवण्यात आले असून त्वरित गतिरोधक बसवण्यात आले. यावेळी भाजपाच तालुकाध्यक्ष राजू गंधे, ग्रामपंचायत सदस्य जयंत आमले, भाजपा उपाध्यक्ष आशिष खैरकर, निलेश म्हस्के, बंडू ठाकरे, शिवाजी खाडे, अक्षय जवंजाळ,शुभम भागवत, सागर लव्हाळे,चंदन भंडारे, मनोज पोहने, शुभम माहुरे,सत्यजित देशमुख,अंकुश नावंदर,आदेश जवंजाळ,स्वराज भेंडे, अर्पित नवरंगे, मयूर खैरकर, जितेश भागवत,गजानन ठाकरे,संजय भस्मे, धिरज वाडेकर, दर्शन वानखडे व गावातील असंख्य.मंडळी उपस्थित होती.

# जूनपूर्वीच शेतकऱ्यांना मिळणार कर्जमाफी?

## थकबाकीदार शेतकऱ्यांची माहिती संकलित

**अमरावती / का.प्र.**

राज्यातील थकबाकीदार शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली जाणार आहे. तसेच या शेतकऱ्यांना पुन्हा कर्जमाफी मागायला लागू नये, यासाठी दीर्घकालीन उपाययोजनादेखील केल्या जाणार आहे. त्यासाठी ३० जून २०२५ व ३० सप्टेंबर २०२५ पर्यंतच्या थकबाकीदार शेतकऱ्यांची माहिती सहकार बँकांकडून मागवली आहे.

विभागाने जिल्हा बँकांनी त्यांच्या थकबाकीदार शेतकऱ्यांची माहिती सहकार खात्याच्या पोर्टलवर अपलोड केली आहे. तर दुसरीकडे सहकार विभागाच्या सूत्रांच्या माहितीनुसार पुढील महिन्यात एप्रिलमध्येच



सरकारकडून कर्जमाफी घोषणेची शक्यता आहे. त्यासाठी आगामी अर्थसंकल्पात तरतूद केली जाण्याची शक्यता आहे. माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी गेल्यावर्षी पुकारलेल्या कर्जमाफी आंदोलनानंतर राज्य सरकारच्या कर्जमाफीविषयक हालचालींना वेग आला. थकीत कर्जातून शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी ३० ऑक्टोबर २०२५ रोजी राज्याचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रवीणसिंह परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली. ही समिती एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात अहवाल सादर करणार असून, त्यावर आधारित कर्जमाफीचे निकष आणि अंमलबजावणी ठरवली जाणार आहे. सरकारकडून ३० जून २०२६ पूर्वी कर्जमाफी करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. दरम्यान, सहकार विभागाकडून थकबाकीदारांची माहिती संकलित केली जात आहे.

**साडेतीन लाख शेतकरी थकबाकीदार**

अमरावती विभागातील पाच जिल्ह्यांतील जिल्हा बँकांमध्ये एकूण ३ लाख ५५ हजार २५९ शेतकरी पीककर्ज थकबाकीदार असल्याची बाब समोर आली आहे. त्यांच्याकडे तब्बल ३ हजार ६९१ कोटी रुपयांचे कर्ज प्रलंबित आहे.

## ‘विदर्भाच्या प्रबोधन पंढरीचे वारकरी संत गाडगेबाबा’-प्रा. डॉ. महेंद्र गिरी



**अंजनगाव सुर्जी/ वार्ताहर**

महाराष्ट्रात किर्तनाच्या माध्यमातून समाजातील वाईट चालीरिती व अंधश्रद्धांना प्रखरपणे टिका करून निर्भीडपणे समाजसुधारना करणाऱ्या संत गाडगेबाबा यांच्या १५० व्या जयंतीचे औचित्यने स्थानिक श्रीमती राधाबाई सारडा कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी येथे महाविद्यालयातील सुदृढ कार्यप्रणाली समिती व राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्यावतीने प्रबोधनपर्व या कार्यक्रमाच्या माध्यमातून गाडगेबाबांच्या कार्याचा विचार महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षकांनी घेता यावा यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी महाराष्ट्राच्या प्रबोधनाच्या कार्यामध्ये अनेक संत महात्म्यांनी आपले प्रबोधन जनतेच्या हितासाठी केले, विचारांचा वारसा लाभलेल्या या महाराष्ट्र भूमीत विदर्भाच्या अनेक संतांपैकी एक संत गाडगेबाबा. त्यांचे कार्य व विचार आजही वर्तमानात प्रबोधनाची वाटचाल करत असलेली दिसतात. संत गाडगे बाबांचा डेबु ते गाडगे बाबा या जीवन प्रवास अत्यंत विलक्षणीय आहे. मानवी जीवनातील संस्कारशील मूल्य जोपासणारा आणि तळागाळातील मायबाप सर्वांचे विचार दृढ करणारा विदर्भाचा वारकरी म्हणजे कर्मयोगी संत गाडगेबाबा यांचे विचार खरोखरच गगनाला गवसणी घालणारे आहे, सामान्य बहुजनांच्या डोळ्यात अंजन घालणारे आहेत ते त्यांनी साध्या कीर्तनशैली मधून व्यक्त केले. ‘मायबापहो मी कुणाचा गुरु नाही, अन माह्या कोणी चला नाही’ या विचारांनी त्यांनी समाजातील भोंदूगिरीला चपराक लगावली.

अमरावती जिल्ह्यात जन्मलेले गाडगे महाराज फाटके कपडे आणि हातात गाडगे घेऊन गावोगावी फिरत अज्ञान, अंधश्रद्धा व अस्वच्छता दूर करण्यासाठी कीर्तनातून समाजप्रबोधन केले.‘तीर्थी धोंडापाणी, देव रोकडा सज्जनी’ असे सांगत त्यांनी दीन-दुबळ्यांची सेवा केली. त्यांचे विचार आजही मौलिक व मोठे विचारधन असलेले आहेत. त्यामुळेच विदर्भाच्या प्रबोधन पंढरीचे वारकरी संत गाडगेबाबा आहेत, असे प्रतिपादन या प्रबोधन पर्वाच्या प्रसंगी प्रा डॉ महेंद्र गिरी यांनी केले.

कार्यक्रमाच्या आयोजनात महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे आयोजनात डॉ कविता मालोकर, डॉ सत्येंद्र गडपायले, डॉ. ताई उके, प्रा.डॉ.नितीन सराफ, सुदृढ कार्यप्रणाली समिती समन्वयक डॉ.संगीता छाबा, रा.से.यो कार्यक्रम धिकारी डॉ नितीन घोडिले, डॉ अनिकेत भुयार, डॉ नविता मालानी, डॉ ममता येवतकर यांचे सहकार्य लाभले.

## रासेयो म्हणजे संस्कार परिवर्तनाची कार्यशाळा- प्राचार्य डॉ. केशवराव गावंडे

**अमरावती/ का.प्र.**

रासेयो शिबीर म्हणजे माणूस घडविण्याची प्रयोगशाळा होय, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. केशवरावजी गावंडे यांनी नमुद केले.श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती च्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिराचा उद्घाटन समारंभ साजरा करण्यात आला.याप्रसंगी बोलत होते.



समारंभाचे अध्यक्ष महाविद्यालयातील प्राचार्य तथा स्वीकृत सदस्य, श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती, डॉ. अंबादास एल. कुलट होते व उद्घाटक प्राचार्य डॉ. केशवराव गावंडे (कार्यकारिणी सदस्य, श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती), प्रमुख उपस्थितीत डॉ. उमेश कडू, परीक्षा व मूल्यमापन सदस्य,संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, डॉ. किशोर साबळे, डॉ. जयराम गायकवाड, सौ. बबितााताई हरडे (सरपंच), श्री वीरेंद्र भाऊ लंगडे ( माजी पंचायत समिती सदस्य) अजय ठाकरे (माजी उपसरपंच) यांच्या उपस्थितित व डॉ मनोज जोशी, डॉ अपर्णा सरोदे, प्रा. रूपेश फसाटे, प्रा. डॉ चित्रा जोशी, प्रा. शुभांगी फसाटे कार्यक्रम अधिकारी, महिला कार्यक्रम अधिकारी, सहायक कार्यक्रम अधिकारी व शिबीर सहाय्यक यांच्या नेतृत्वात संपन्न झाला.

अध्यक्षीय मनोगतामध्ये प्राचार्य डॉ. अंबादास कुलट यांनी विद्यार्थ्यांमध्ये शिबिराच्या माध्यमातून स्किल डेव्हलपमेंट होते. त्या स्किल विद्यार्थ्यांनी अवगत करून घ्याव्या या मार्गदर्शक सूचना विद्यार्थ्यांना दिल्या. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी हे श्रमसंस्कार शिबिर अत्यंत महत्त्वाचे आहे हे विद्यार्थ्यांना विविध उदाहरणाच्या द्वारे पटवून दिले. यावेळी डॉ. उमेश कडू, डॉ. किशोर साबळे, डॉ. जयराम गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना शिबिरासाठी शुभेच्छा दिल्या.बबिता हरडे यांनी संत गाडगेबाबा यांच्या कार्यावर प्रकाश टाकून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. या वेळी प्रास्ताविक प्रा. डॉ. मनोज जोशी, कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा. डॉ अपर्णा सरोदे व आभार प्रदर्शन प्रा. रुपेश फसाटे यांनी केले.याप्रसंगी सालोरा येथील ग्रामस्थ व रा.से.यो. विद्यार्थी उपस्थित होते.

## मागील बारा तासात आठ जणांची आत्महत्या

**अमरावती/ का.प्र.**

जिल्ह्यात बारा तासांत आठ जणांनी गळफास घेऊन आत्महत्या केली. ग्रामीण भागात सात, तर आयुक्तालयाच्या हद्दीत एक घटना घडली आहे. त्यात एकाने आजाराला कंटाळून तर दुसऱ्याने दारूच्या नशेत स्वतःला फासावर लटकवून घेतले.

जिल्ह्यातील कुन्हा ठाण्याच्या हदीतील वहा गावामध्ये देविदास चैतुजी वाघमारे (६७) रा. वहा हे तिवसा येथे कुटुंबासह राहत होते. त्यांच्या पोटात गोळे झाल्याने त्रास सुरू होता.

सतत वाढणारा त्रास असह्य झाल्यामुळे त्यांनी घराच्या आवारातील शौचालयात दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केली. मुलगा सुनील देविदास वाघमारे (४५) यांनी सदर घटनेची माहिती कुहा पोलिसांना दिली. त्यात आकस्मिक मृत्यू, अशी नोंद पोलिसांनी घेतली.

दर्यापूर परिसरात अशोकनगर भागात प्रदीप बाळू आठवले (२६) यांनी स्वतःच्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली.

कुलदीप सुनील बगाडे (२६) या युवकाने सदर घटनेची तक्रार दर्यापूर पोलिसांत नोंदविली. त्यात आकस्मिक मृत्यू, अशी नोंद घेण्यात आली.

आत्महत्येची तिसरी घटना बेनोडाठाण्याच्या हद्दीत खडका गावात घडली. सुभाष गोविंदा आहाके (३०) रा. खडका, ता. वरूड यांनी घरी कुणीही नसताना एका खोलीत गळफास घेऊन आत्महत्या केली. त्यांच्या आत्महत्येचे कारण समजू शकले नाही. बेनोडा ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद घेण्यात आली.

चिखलदरा तालुक्यातील पाटाखेडा जंगलातील प्लॉट क्र. (३१) कुलंगणा (खुर्द) जंगलात भिवराच्या झाडावर तुळसीराम खानू जामूनकर (४२) रा. कुलंगणा खुर्द यांनी स्वतःच्या पँटने गळफास घेऊन आत्महत्या केली. त्यांच्याही आत्महत्येचे कारण समजू शकले नाही. चिखलदरा ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद घेण्यात आली.

दर्यापूर तालुक्यातील येवदा ठाण्याच्या हद्दीत ढोमणपुरा भागात वृषभ जनार्दन जुमळे (२८) यांनी स्वतःच्या घरात लोखंडी अँगलला गळफास घेऊन आत्महत्या केली. येवदा पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली. वृषभच्या आत्महत्येचे कारण समजू शकले नाही.

खोलापूर हद्दीत चंडिकापूर गावातील रुपाली सुनील चोरपगार (४२) महिलेनेही घरात स्कार्फने गळफास घेऊन आत्महत्या केली. खोलापूर ठाण्यात आकस्मिक मृत्यू, अशी नोंद घेतली आहे.

**दाभा गावात घेतला गळफास**

पोलिस आयुक्तालयातील बडनेरा ठाण्याच्या हद्दीत दाभा गावातील स्मशानभूमीजवळ जाऊन रमेश काशिराम इंदूरकर (६२) दाभा, नांदगाव खंडेश्वर यांनी कचरापेटीच्या शेडला दुपट्ट्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. बडनेरा पोलिसांनी आकस्मिक मृत्यू अशी नोंद घेतली.

# अर्थसंकल्पीय अधिवेशनात अजितदादांना अपेक्षित असलेला अर्थसंकल्प मांडल्या जाईल-आ.खोडके

**अमरावती/ का.प्र.**

महाराष्ट्र राज्य विधीमंडळाच्या फेब्रुवारी-मार्च २०२६-२७ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनाला आमदार सुलभा खोडके व महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य आ.संजय खोडके हे अधिवेशनाच्या कामकाजात सहभागी झाले आहेत.

तत्पूर्वी विधानसभेचे कामकाज सुरु होण्याआधी राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांचे विधीमंडळाच्या प्रवेशद्वारावर आगमन होताच आ. सुलभा खोडके व आ. संजय खोडके यांनी त्यांचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या.



दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी अकरावेळा महाराष्ट्राचा अर्थसंकल्प मांडला.आता अजितदादा सभागृहात नसल्याचे दुःख असून अजितदादांना अपेक्षित असा सर्वसमावेशक अर्थसंकल्प या अर्थसंकल्पिय अधिवेशनात मांडला जाईल.

राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रावहीनी अजित पवार ह्या महाराष्ट्र शासनाच्या राज्य उत्पादन शुल्क विभाग , क्रीडा व युवक कल्याण तसेच अल्पसंख्यांक व औकाफ विभाग मंत्री असून गेल्या पंधरा दिवसापासून त्यांनी सरकारची व पक्षाची धुरा सांभाळत पुढेही योग्य जबाबदारी पार पडत दादांना अपेक्षित असलेले निर्णय घेतील, असा विश्वास आ.सुलभा खोडके यांनी व्यक्त केला

.आज अधिवेशनाच्या पहिल्या दिवसाच्या कामकाजामध्ये विधानसभेचे पीठासीन अध्यक्ष- अँड.राहुल नार्वेकर यांनी शोक प्रस्ताव पारित करताच मुख्यमंत्री देवेन्द्रजी फडणवीस यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री - अजितदादा पवार यांच्या शोक प्रस्तावाचे वाचन केले. यावेळी सभागृहात उपस्थित सदस्य शोकमग्न झाले होते.

# अंजनगाव तहसील विभागाने तक्रार निवारण उपक्रमात मारली बाजी

## महसूल विभागाने ७३ तक्रारी पैकी १० तक्रारी जागेवरच काढल्या निकाली

**अंजनगाव सुर्जी/ वार्ताहर**

अमरावती जिल्ह्यांचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आदेशानुसार जनसंवाद व तक्रार निवारण कार्यक्रम अंजनगाव सुर्जी येथे तहसील कार्यालयात आयोजित करण्यात आला होता. जनसंवाद व तक्रार निवारण कार्यक्रम हा प्रशासनाला थेट जनतेशी जोडून, वैयक्तिक व सार्वजनिक समस्यांचे निराकरण करणे तसेच रखडलेल्या विकासकामाचे तालुक्याच्या पातळीवरच तात्काळ निराकरण करण्यासाठी आयोजित केला होता.या उपक्रमात तालुक्यातील वेगवेगळ्या प्रशासकीय विभागातील १२३ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या त्यापैकी १० तक्रारी तहसील विभागाच्या संबंधित होत्या त्यामुळे त्या तक्रारी तहसील विभागाने जागेवरच निकाली काढण्यात आल्या तर इतर प्रलंबित तक्रारी ११३ राहिल्या असून संबंधित विभागाकडे २१ दिवसांच्या आत




तक्रारीचे निराकरण करण्याच्या सूचना तहसीलदारांनी दिल्या आहे.

अंजनगाव तालुक्यातील जनसंवाद व तक्रार निवारण कार्यक्रमात ग्रामविकास विभागाशी संबंधित १८ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या त्यापैकी १८ ही तक्रारी प्रलंबित आहेत, तर कृषी विभागाच्या ४ तक्रारी प्राप्त झाल्या असून ४ ही प्रलंबित आहेत.

भुमी अभिलेख विभागाच्या ४ तक्रारी प्राप्त झाल्या असून ४ ही प्रलंबित आहेत, सहा निबंधक संस्था विभागाची १ तक्रार प्राप्त असून तेही प्रलंबित आहे, नगरपरिषद विभागाच्या ३ तक्रारी प्राप्त झाल्या असून तीनही प्रलंबित आहे, वीज वितरण कंपनीच्या २ तक्रारी प्राप्त झाल्या असून दोन्ही तक्रारी प्रलंबित आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ५ तक्रारी प्राप्त झाल्या असून ५ ही प्रलंबित आहेत जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या ६ तक्रारी प्राप्त असून सहाही प्रलंबित आहेत. जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या २ तक्रारी प्राप्त असून दोन्ही प्रलंबित आहे. मृद व जलसंधारण विभागाची १ तर ग्रामीण रुग्णालयाची १ असून त्याही प्रलंबित आहेत.

नागरिकांच्या प्रलंबित असलेल्या ११३ तक्रारी २१ दिवसांच्या आत निराकरण करून तक्रारदारांना माहिती देण्यात यावी अशा प्रकारच्या सूचना तहसीलदारांनी संबंधित विभागांना देण्यात आल्या आहे.

महसूल विभागाच्या ७६ तक्रारी पैकी १० तक्रारी जागेवरच निवारण करुन निकाली काढल्या मुळे तालुक्यातील सर्वच प्रशासकीय विभागा पैकी महसूल विभागाने नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण करण्यात बाजी मारली आहे तर पंचायत समिती विभागाने नागरिकांच्या १८ पैकी एकाही तक्रारींचे निवारण न केल्यामुळे तक्रारदार नागरिकांकडून पंचायत समिती प्रशासना बाबत नाराजी व्यक्त केली आहे.

# कुणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे?

**केंद्रीय मंत्री त्यांचे विमान कंपनीशी असणारे व्यावसाईक लागेबांधे आणि राष्ट्रवादीच्याच काही नेत्यांचा यामधील संशयास्पद सहभाग या सा-या रहस्यमय बाबी आहेत. अजित पवार यांच्यासारखा बोल-भांड नेता कुणाला नकोसा का झाला? याचे उत्तर 'मारुती कांबळेचे काय झाले?' या 'सामना' चित्रपटातील मास्तरांच्या प्रश्नासारखा सत्ताधा-यांचा पिच्छा पुरवू शकतो हे मात्र खरे!**

### दबावतंत्राच्या राजकारणाच्या नव्या त-हा

'सामना' या चार दशकांपूर्वी डॉ श्रीराम लागू आणि निळू फुले यांच्या मध्यवर्ती भुमिका असलेल्या चित्रपटात मारुती कांबळे या सैनिकाच्या गुढमृत्यू (हत्या) प्रकरणाशी संबंधीत गाजलेले कथानक होते. वेडगळ दिसणारा ध्येय्यवेडा मास्तर सत्ताधा-यांना या गुढमृत्यू प्रकरणार सळो की पळो करुन सोडतो. राज्याच्या राजकारणातही सध्या अजित पवार यांच्या निधनाबाबत तशीच संशयाची स्थिती सुलझण्याऐवजी गुढ होताना दिसत आहे. रोहित पवार हे दादांचे पुतणे यासाठी घातपात कसा झाला? असा सवाल घेवून 'कुणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे' म्हणत उभे आहेत. तर दादांच्या पक्षाचे सत्तेसाठी जवळचे झालेले नेते, त्यांची दोन्ही मुले, पत्नी, घरचे नातेवाईक किंवा सासरच्या भाजपमधील नेत्यांकडून मात्र यावर सवाल केले जात नाहीत सारेच अनाकलनीय आहे.

राज्याचे राजकारण त्यामुळेच सध्या नव्याने अनिश्चितीकडे जात असल्याचे सांगण्यात येत आहे. २३फेब्रुवारी पासून महिनाभर राज्य विधीमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन होत आहे. या अधिवेशनात पहिल्याच दिवशी राज्यपालांचे अभिभाषण आणि दिवंगत नेते अजीत पवार यांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव असे कामकाज आहे. याच अधिवेशना दरम्यान राज्यसभेच्या सात रिक्त जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहिर करण्यात आला आहे. राज्याचा अर्थसंकल्प सहा मार्च रोजी सादर केला जाणार आहे. तर विधान परिषदेच्या रिक्त जागा विधानसभा सदस्यांमधून भरण्यासाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सध्या मोठ्या प्रमाणात विधान परिषदेत रिक्त जागा आहेत. त्यामुळे सत्ताधारी आणि विरोधी बाजुच्या सदस्यांच्या संख्याबळाची परिक्षा होणार आहे. वास्तविक पाहता विरोधकांचे संख्याबळ सत्ताधारी महायुतीच्या तुलनेत नगण्य असलेतरी दबावतंत्राच्या राजकारणाच्या नव्या त-हा आता पहायला मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### किमान १७-१९ जणांना भाजपचे वेध?

अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांच्या अनुपस्थितीमध्ये होणा-या या पहिल्याच अधिवेशनात त्यांच्या उत्तराधिकारी सुनेत्रा पवार यांचेही हे पहिलेच अधिवेशन असल्याने राष्ट्रवादी पक्षांच्या आमदारांसाठी ते विशेष महत्वाचे आहे. भारतीय जनता पक्षाकडे बहुमतासाठी संख्याबळ नसल्याने आता पवार यांच्या पक्षातील आमदारांना भाजपकडे विलीन करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे सांगण्यात येत आहे. यामध्ये राष्ट्रवादीतल्या बड्या नेत्यांसह सध्या मंत्री असलेल्या दहा पैकी किमान सात आठ जणांचा कल भाजपसोबत जाण्याचा असल्याचे सांगण्यात येत आहे. या शिवाय मंत्रीपदाने हुलकावणी दिलेल्या धनंजय मुंडे, माणिकराव कोकाटे यांच्या सारख्या पदासाठी 'आशाळभूत' असलेल्या किमान सात ते आठ जणांचा समावेश यामध्ये आहे. तर राजकीय कार्यकर्तृत्व सुमार असलेल्या आणि भाजपच्या मेहरबानीनेच आमदार आणि राजकीय जीवनात असलेल्या राजकुमार बडोलेंसारख्या किमान सात ते आठ जणांचा ओढा देखील भाजपसोबत जाण्याचा आहे. अश्या प्रकारे ४१ पैकी किमान १७-१९ जणांना भाजपचे वेध लागले आहेत. पक्षांतर बंदी कायद्याच्या निकषानुसार ही संख्या कमी आहे. सर्वोच्च न्यायालयात राष्ट्रवादीच्या पक्ष आणि चिन्हाच्या निवाड्याची जराही नकारात्मक शक्यता असल्याचे दिसले तर सध्याचे पद वाचविण्यासाठी या विद्यमान आमदारांना कुणातरी पक्षात विलीन व्हावे लागणार आहे. त्यात भाजप आणि मूळचा पक्ष असे दोनच पर्याय असू शकतात. त्यामुळेच या कुंपणावरील सदस्यांकडून राज्यसभा-विधानपरिषदेला मतदान भाजपच्या बाजूने होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यमुळे २०२२ मध्ये जसे राज्यसभा आणि विधानपरिषदेच्या निवडणूकीनंतर शिवसेनेत सूरत-गुवाहाटी करत 'ऑपरेशन कमळ' झाले तसेच नवे काही होण्याची शक्यता जाणकारांकडून व्यक्त केली जात आहे. त्यामुळे छत्रपती शिवरायांच्या जन्मातिथीच्या निमित्ताने सुनेत्रा पवार यांच्याकडून शिवनेरीवर शिव-शाहू-फुले-आंबेडकर विचारधारेशी निष्ठा बाळगण्याची घोषणा करण्यात आली त्याला असा राजकीय संदर्भ असल्याचे जाणकारांचे मत आहे.



### पुन्हा एकदा महाविकास आघाडीमध्ये बिघाडी?

राज्यसभा निवडणूकीच्या निमित्ताने पुन्हा एकदा महाविकास आघाडीमध्ये बिघाडी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. कारण ऊणे-पुरे संख्याबळ असल्याने आणि राज्यसभेला एक सदस्य निर्वाचीत करण्यासाठीच्या ३६ मतांचा कोटा शिवसेना ठाकरे आणि कॉंग्रेस पक्षाकडे असल्याने राष्ट्रवादीच्या पवारांसाठी ते त्याग करायला तयार होणार का? असा प्रश्न विचारला जात आहे. पण शरद पवार पुन्हा राज्यसभा निवडणूक लढणार का? आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचा त्यांच्या उमेदवारीला पाठिंबा असेल का? या मुद्यावर आघाडीमध्ये बरीच साशंकता आहे.

कारण अजित पवारांच्या मृत्यूनंतर केवळ काही तासांतच दोन्ही पक्ष एकत्र करण्याच्या चर्चा शरद पवारांच्या गटाकडून सुरू झाल्या होत्या, मात्र राज्यसभा निवडणूक जर आघाडीकडून केवळ एक उमेदवार निवडून देण्याइतकेच संख्याबळ असेल तर पवारांच्या बाबतीत काय निर्णय घ्यायचा यावर कॉंग्रेस आणि शिवसेना ठाकरे पक्षांत संभ्रम आहे. त्यामुळे शरद पवार नेमके निवडणूक लढवणार किंवा नाही? आणि नसले तर त्यांच्या जागी कोणत्या पक्षाच्या कोणत्या नेत्याला संधी मिळेल यावर आता महाविकास आघाडीत चर्चा सुरू झाली आहे. सहा तारखेपर्यंत त्यात सहमती होताना राज्यात नव्याने राजकीय गणिते जन्माला येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. कारण मतांच्या कोटयासाठी आवश्यक मतांशिवाय अतिरिक्त मते युती आणि आघाडीकडे शिल्लक राहणार आहेत, त्यामुळेच घोडेबाजाराला वाव राहण्याची शक्यता असून तोडजोडच्या फोडाफोडीच्या राजकारणाला पोषक स्थिती निर्माण होणार आहे. राज्यसभे पाठोपाठ संख्याबळाच्या आधारे विधानपरिषदेच्या सदस्यांच्या निवडीचा नवा प्रश्न या आघाडीला सोडवणे क्रमप्राप्त आहे.

### पुन्हा ऑपरेशन लोटसच्या दिशेने?

दुसरीकडे अजीत पवार यांच्या अकाली निधनामुळे निर्माण झालेल्या राजकीय पोरकेपणाला किंवा पोकळीला राजकीय स्वार्थ आणि संधीसाधू राजकीय लागेबांधे यांच्या सोयीच्या राजकारणाची किनार असल्याने दादांच्या मृत्यूच्या चौकशीचा मुद्दा करण्यात येत असल्याचे सांगण्यात येत आहे. या चौकशीला राष्ट्रवादी शरद पवार यांच्या पक्षाकडून फारसे कुणी नेते आग्रही नसताना किंवा पवार कुटूंबियाकडूनही त्याबाबत फारशी वाच्यता केली जात नसताना रोहित पवार ज्या प्ध्दतीने इरेला पडून आणि सातत्याने मांडणी करताना 'खतरो के खिलाडी' असल्याचे स्वत:च सांगत आहेत. त्यामागेही चौकशीच्या पेक्षा राजकीय स्पेस घेण्याच्या राजकारणाचा भाग असल्याचे सांगण्यात येत आहे.अजीत पवार यांच्या विमानाला अपघात झाला असे वक्तव्य स्वत: शरद पवार यांच्याकडून त्याच दिवशी आले असताना आता रोहित पवार अगदी केंद्रीय नागरी विमान सेवा मंत्र्यापर्यंत आरोपांची राळ का उडवून देत आहेत? त्यावर थोरले पवार साहेब काहीच व्यक्त का होताना दिसत नाहीत असा प्रश्न या निमित्ताने विचारला जात आहे. शिवाय अजित पवार यांच्या पत्नी, त्यांच्या पक्षाचे बडे नेते त्यांची मुले यावर गप्प का आहेत/ असाही प्रश्न निर्माण झाला आहे. सर्वात महत्वाचे अजित पवारांच्या पक्षाचे पदाधिकारी आमदार कार्यकर्ते यांच्या मनात या अपघातानंतर जो आघात झाला आहे, त्याला भाजपच्या विरोधात वाट मोकळी करुन दिली तरच राष्ट्रवादीचे भाजपच्या दिशेने विलीनीकरण थांबेल याची कल्पना शरद पवार यांच्यापक्षाला असावी. रूपाली ठोंबरे,अमोल मिटकरी अश्या नेत्यांकडून याविषयावर जे मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला त्याला राजकीय फोडणी देत गंभीरपणे राजकीय आशय देण्याचा प्रयत्न रोहित पवार करताना दिसत आहेत. कारण भाजपच्या दिशेने राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते आणि सदस्य आमदार झुकले तर शरद पवार गटाच्या राजकीय अस्तित्वासाठी देखील ते संकट ठरणार आहे. त्यात भरडले जाणार आहेत ते रोहित पवार कारण सगळेजण जरी भाजपकडे गेले तरी पवारांचा वारसदार म्हणून त्यांना आजोबांच्या आणि आत्याचा पक्ष सोडणे सध्याच्या परिस्थितीत शक्य होणार नाही. आणि भाजपही त्याना सहजासहजी आपल्या पक्षात प्रवेश देण्यास तयार होणार नाही याची त्यांना कल्पना आहे.असे याबाबत राजकीय निरिक्षक सांगतात.

### तर मागे राहतील रोहित पवार, अदित्य ठाकरे?

राज्यात २०२९ला शतप्रतिशत भाजपचे राज्य आणायचे असेल तर आता शेवटचा घाव घालत पवारांच्या पक्षासोबत ठाकरे आणि कॉंग्रेसच्या चार पाच आमदारांना गळाला लावले तर राज्यात विरोधकांची संख्या 'नही के बराबर' होणार आहे हे भाजपला माहिती आहे. त्यासाठी या निवडणूकीत संख्याबळाची चाचपणी करताना गळाला कायमचे काही लागते का? हे पाहिले जात आहे अशी सूत्रांची माहिती आहे. वेळप्रसंगी सरकारमध्ये लाभाची पदे देवून विरोधातील जयंत पाटील, विजय वडेट्टीवार, नाना पटोले, भास्कर जाधव अश्या सात आठ नेत्यांना सोबत घेतले तर मागे राहतील रोहित पवार, अदित्य ठाकरे आणि त्यांचे संपलेले राजकीय आव्हान अशी मांडणी सध्या संघ- भाजपच्या समर्थकांकडून केली जात आहे. मात्र अजीत पवारांचा घातपात झाला की नाही? या प्रश्नाचे उत्तर नेमकेपणाने देण्याचे टाळण्यासाठी या नरेटीवचा आधार घेतला जात आहे असे अन्य काही जाणकारांचे मत आहे. कारण रोहित पवारांचे प्रश्न केंद्र सरकारला हादरवणारे आहेत असे या एकूणच मांडणीचे स्वरुप आहे. केंद्रीय मंत्री त्यांचे विमान कंपनीशी असणारे व्यावसाईक लागेबांधे आणि राष्ट्रवादीच्याच काही नेत्यांचा यामधील संशयास्पद सहभाग या सा-या रहस्यमय बाबी आहेत. अजित पवार यांच्यासारखा बोल-भांड नेता कुणाला नकोसा का झाला? याचे उत्तर 'मारुती कांबळेचे काय झाले?' या सामना चित्रपटातील मास्तरांच्या प्रश्नासारखा सत्ताधा-यांचा पिच्छा पुरवू शकतो हे मात्र खरे!

राष्ट्रवादीमध्ये विलीनीकरणाच्या प्रक्रियेला भाजपची मान्यता हा प्रकार त्याच धाटणीचा होता, मात्र आधीच भाजपसोबत गेलेल्या काही नेत्यांना आता पवार आणि त्यांच्या कुटूंबिय आणि निष्ठावंतांचा राजकीय जाच किंवा वरचष्मा नको असल्याने त्याला विरोध केला जात आहे. मात्र मोठ्या मनाच्या भाजपकडून कॉंग्रेसच्या काही नेत्याना येत्या काळात कच्छपी लावले जाण्याची शक्यता आहे. त्यात सांगली लातूर कोल्हापूर नागपूरच्या दिग्गज नेत्याचा किंवा त्यांच्याशी संबंधितांचा समावेश असू शकतो अशी राजकीय वर्तुळात चर्चा केली जात आहे.

सध्याचे राजकारण अनिश्चितीचे राजकारण आहे, सत्तेवरील नेत्यांना विरोध करण्याची क्षमता आणि किंमत फार मोठी आहे. त्यासाठी अजून तीन वर्ष वाट पाहण्याची राजकीय तयारी विरोधातील नेत्यांमध्ये आहे का? हा खरा प्रश्न आहे. त्यामुळे राजकीय सिकंदरपाणाच्या राजकारणात सध्या राज्यात २०२९च्या भाजपच्या संपूर्ण बहुमताच्या राजकारणासाठी विरोधकांचे अस्तित्व संपविण्यास प्राधान्य दिले जाण्याची शक्यता आहे. त्याची सुरूवात या अधिवेशनातून होण्याचे संकेत मिळत आहेत. महाराष्ट्रातील सामान्य जनतेच्या प्रश्नांपेक्षा सध्या याच राजकारणाला आणि सत्ताकारणाला महत्व आले आहे. भांडवलदारांच्या आणि राजकीय सत्तेसाठीच्या महत्वाकांक्षा हाच सध्या जगण्याचा मूलमंत्र झाला आहे. राज्यात शेतकरी, महिला बेरोजगार, युवक विद्यार्थी आणि सामान्यांचे प्रश्न सोडविण्यास राज्यकर्त्यांना वेळ आणि स्वारस्य त्यामुळेच राहिले नाही. जनतेच्या मतदानाला देखील आता किंमत उरली नसल्याने लोकलज्जा किंवा धाक सत्ताधा-यांना राहिला नाही. देशात आणि राज्यात बिकट काळ येण्याची ही सुरूवात आहे! विरोधीपक्षांनी मुख्यमंत्र्याच्या चहापानावर बहिष्कार घातला त्यावेळी शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते गैरहजर होते, त्यांच्या पक्षातील नेत्यांनाही 'कोणता झेंडा घेवू हाती?' असा प्रश्न पडल्याचे सांगण्यात येत आहे!

**किशोर आपटे**

# अमरावतीमध्ये अभिनयाचा महाकुंभ

## बालनाट्य स्पर्धेची अंतिम फेरी २६ फेब्रुवारीपासून

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र शासनाच्या वतीने सांस्कृतिककार्य संचालनालयाच्या माध्यमातून विविध नाट्य स्पर्धा आयोजित केल्या जातात. ज्यामध्ये संस्कृत नाट्यस्पर्धा, हिंदी नाट्यस्पर्धा, मराठी हौशी नाट्यस्पर्धा, मराठी व्यावसायिक नाट्यस्पर्धा, मराठी बाल नाट्यस्पर्धा इत्यादींचा समावेश असतो. यामधील काही स्पर्धा प्राथमिक व अंतिम फेरी अशा स्वरुपात होतात तर काही स्पर्धा फक्त एकाच फेरीत होतात. जवळपास ६० वर्षांपेक्षाही अधिक कालावधीपासून या स्पर्धा संपन्न होत आहेत. यावर्षी पहिल्यांदाच नाट्य स्पर्धेची अंतिम फेरी अमरावती मध्ये आयोजित होत आहे.

सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली बाल नाट्य स्पर्धेची अंतिम फेरी पार पडणार असल्याचो सांस्कृतिक कार्य संचालक विभीषण चवरे यांनी नमूद केलेले आहे.खासदार डॉ. अनिल बोंडे, माजी खासदार नवनीतजी राणा, आमदार रवी राणा, आमदार प्रविण तायडे, आमदार राजेश वानखडे, आमदार प्रतापदादा अडसड आदी मान्यवरांच्या विशेष प्रयत्नामधून ही स्पर्धा अमरावती येथे आयोजित होत आहे.मागील वर्षी अमरावती केंद्रावर सादर झालेल्या ६० एकांकिकाचा विक्रम या वर्षी अमरावती केंद्रानेच मोडला असून ८९ बाल नाट्यांच्या सहभागाचा नवीन विक्रम स्थापित झालेला आहे.

स्पर्धा समन्वयक विशाल फाटे, अमरावती नाट्य परिषदेचे अध्यक्ष ॲड. चंद्रशेखर डोरले, नाट्य परिषद मध्यवर्ती मुंबई चे नियामक मंडळ सदस्य प्रशांत देशपांडे, नाट्य परिषदेचे त्यांचे सहकारी या सर्वांच्या एकत्रीत प्रयत्नांतून या स्पर्धा एका उच्च स्तरावर पोहोचलेल्या आहेत.या वर्षी बाल नाट्य स्पर्धेची अंतिम फेरी छत्रपती श्री. शिवाजी महाराज सभागृह,डॉ. पं.दे. मेडिकल कॉलेज परिसर येथे . २६फेब्रुवारीपासून सुरु होत असलेल्या या स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्रातून निवड झालेले उत्कृष्ट ४३ बालनाट्य सादर होणार असून १२०४ बाल कलावंत आणि तंत्रज्ञान अमरावती मध्ये आपली कला व कौशल्य सादर करणार आहेत.या स्पर्धेमधून उत्कृष्ट ठरलेल्या बाल नाट्यांना, कलावंतांना तसेच दिग्दर्शक इत्यादी तंत्रज्ञांना रोख पारितोषिक तसेच पदक आणि प्रशस्तीपत्र दिल्या जाणार आहेत.

अमरावतीकर कला रसिकांनी या स्पर्धेचा आनंद घ्यावा आणि बाल कलावंतांना प्रोत्साहित करण्याकरिता संपूर्ण स्पर्धे दरम्यान उपस्थित राहावे असे आवाहन नाट्य परिषदेचे स्पर्धा समन्वयक विशाल फाटे, अमरावती नाट्य परिषदेचो अध्यक्ष ॲड. चंद्रशेखर डोरले, नाट्य परिषद मध्यवर्ती मुंबई चे नियामक मंडळ सदस्य प्रशांतजी देशपांडे, माजी महापौर तथा नाट्य परिषद उपाध्यक्ष विलास इंगोले, कार्यवाह मिलिंद जोशी व सहकार्यवाह मिलिंद कहाळे यांनी केले आहे.

# मराठी माध्यमाच्या शाळांच्या पुनरुज्जीवनासाठी एकत्र येणे अपरिहार्य-मयुर चौधरी

**अमरावती/का.प्र.**

मराठी भाषा आणि मराठी माध्यमाच्या शाळा सध्या संक्रमणाच्या टप्प्यातून जात असून त्यांच्या अस्तित्वासाठी सर्व घटकांनी एकत्रितपणे पुढाकार घेणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन मयुर चौधरी यांनी केले. कस्तुरबा सर्वोदय मंडळ, माधन येथे कस्तुरबा गांधी व ताराबेन मश्रुवाला यांच्या स्मृती महोत्सवानिमित्त आयोजित 'मराठी शाळांचे पुनरुज्जीवन : शासन, शिक्षक, पालक आणि समाजाची भूमिका' या विषयावरील परिसंवादात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.



परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी एकनाथ बावनकर होते. यावेळी राकेश राजपूत तसेच संस्थेचे अध्यक्ष प्रदीप चौधरी यांची प्रमुख उपस्थिती होती.मराठी माध्यमाच्या शाळांनी राज्याला सक्षम, सुसंस्कृत आणि मूल्याधिष्ठित पिढी घडविली; मात्र आज या शाळांना अस्तित्वासाठी झगडावे लागत आहे, ही खेदजनक बाब असल्याचे चौधरी यांनी नमूद केले. मराठी माध्यमाच्या शाळा टिकविण्याची ही निर्णायक लढाई असल्याचो सांगताना त्यांनी वाबळेवाडी व जालिंदरनगर येथील शाळांचा उल्लेख केला. वारे गुरुजी यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थ, शिक्षक आणि पालक यांनी दाखविलेल्या एकजुटीमुळे त्या शाळांनी राज्यासह व्यापक पातळीवर आपली वेगळी ओळख निर्माण केली. 'अशा आदर्श उपक्रमांची पुनरावृत्ती इतर ठिकाणी झाली, तर मराठी माध्यमाच्या शाळा पुन्हा वैभवाच्या शिखरावर पोहोचू शकतात,' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दुसरे वक्ते राकेश राजपूत यांनी शाळेमध्ये सकारात्मक आणि मूल्याधिष्ठित संस्कृती निर्माण करण्यावर भर दिला. शिक्षकांनी स्वतःपासून बदलाची सुरुवात केल्यास त्याचे प्रतिबिंब विद्यार्थ्यांमध्ये उमटते. शाळेत सुदृढ संस्कृती रुजली की गुणवत्तावाढीस चालना मिळते आणि गुणवत्तेच्या बळावर पालकांचा विश्वास संपादन करता येतो. पालकांचा विश्वास जिंकला की ते शाळा विकास प्रक्रियेत सक्रियपणे सहभागी होतात, असे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय मनोगतात बावनकर यांनी जालिंदरनगर व वाबळेवाडीप्रमाणे आदर्श मराठी माध्यमाच्या शाळा आपल्या परिसरात उभारण्यासाठी स्थानिक समाजाने सामूहिक जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन केले. प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष प्रदीप चौधरी संचालन व आभार प्रदर्शन मुळे यांनी केले. परिसंवादास संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक, पालक, माजी विद्यार्थी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विकास विद्यालयील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**अमरावती/का.प्र.**

स्थानिक विलास नगर येथील विकास विद्यालय विलास नगर येथील ९ वी व१० वी च्या विद्यार्थ्यांना दिला जाणारा निरोप समारंभ अत्यंत उत्साहपूर्ण व भावनिक वातावरणात संपन्न झाला.कार्यक्रमाला विद्यार्थ्यांसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका निशा मेश्राम होत्या.विशेष अतिथी म्हणून विद्यालयाचे माजी विद्यार्थी कमलेश धाकडे तसेच प्रमुख अतिथी म्हणून विद्यालक्ष्मी प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली सोळंके,वर्ग १० वी चे वर्गशिक्षक डॉ. संदीप जुनघरे,प्रवीण भागवत,सेवानिवृत्त लिपिक सतीश मेटांगे,किशोर शिरभाते,वर्गशिक्षक देविदास चव्हाण मंचावर उपस्थित होते.विद्यार्थ्यांनी दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप गीत, परिधि सोळंके हिने, मनोगत अशा विविध कार्यक्रमांचे सादरीकरण केले.





इ. १० वी च्या नैतिक शिंदे, दुर्गा गुडघे,अनन्या चामलाटे, हर्ष वर्धे, या विद्यार्थ्यांनी शाळेविषयीच्या आठवणी सांगितल्या. माजी सैनिक कमलेश धाकडे यांनी विद्यार्थ्यांना भावी आयुष्याच्या व परीक्षेच्या शुभेच्छा दिल्या.विद्यार्थ्यांनी समाजासाठी चांगले नागरिक बनावे, असेही आवाहन वैशाली सोळंके यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले.यावेळी विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व मित्रपरिवाराबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. संचालनी विद्यार्थिनी अर्पिता मेश्राम व अस्मित वासनिक यांनी आभार प्रदर्शन नव्या खंडारे हिने केले.यावेळी विद्यालयातील शिक्षक, श्री. मनीष सोनवाल,अनिल बडगे, दिनेश निगोट, विजय काळे, अजय बिजवे,निकिता शिरभाते ,अर्चना भुसाटे,जोशी, प्रगती कौतिककर, शिक्षकेतर कर्मचारी शुभम गवळी ,प्रसोनजीत सदनशिवे,सरला आकोडे,मीना सरकटे.

# 'चेक अनादर (बाऊंस)' झाल्यास दाखल होणार गुन्हा

## महावितरणची दिशाभूल करणाऱ्यां विरूध्द कारवाईच्या हालचालींना वेग

**अमरावती/का.प्र.**

थकीत वीज बिलाची कारवाई टाळण्यासाठी न वटणारे धनादेश देत महावितरणची दिशाभूल करत

वेळ मारून नेणाऱ्या वीज ग्राहकांवर गुन्हा दाखल करण्याच्या हालचालींना अमरावती परिमंडळात वेग देण्यात आला आहे. अशी माहिती मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी दिली आहे.

महावितरणच्या लघुदाब वर्गवारीतील वीज ग्राहकांनी विजबिल भरण्यासाठी दिलेल्या धनादेशांपैकी अमरावती परिमंडळात दरमहा सुमारे सरासरी १५० धनादेश अनादरीत (चेक बाऊंस) होत असल्याचे दिसून येत आहे. परंतू महावितरणच्या असे लक्षात आले की, काही वीज ग्राहकांनी दिलेल्या धनादेशावर चुकीची तारीख, खाडाखोड, चुकीची स्वाक्षरी, चुकीचे नाव, खात्यात पुरेशी रक्कम नसणे आदी कारणांवरून धनादेश अनादरित होत असल्याचे आढळून येत आहे.

परिणामी वीज बिलाची वसूली न होता थकबाकीत वाढ झाली आहे. त्यामुळे महावितरणने मोहिम घेत धनादेश अनादर झालेल्या वीज ग्राहकांवर कारवाई करण्याच्या दृष्टिने हालचालींना गती दिली आहे.यासोबतच चेक बाऊंस झाल्यास वीज ग्राहकांना प्रत्येक वीज बिलासाठी विलंब आकार अधिक जीएसटी करासह ८८५/- रुपयांचा दंड संबंधित ग्राहकाच्या पुढील महिन्याच्या वीज बिलामध्ये इतर आकार म्हणून समाविष्ट करण्यात येते. तसेच अनादरित झालेल्या एकाच धनादेशाद्वारे अनेक वीजबिलांचा भरणा केलेला असल्यास प्रत्येक वीजबिलासाठी स्वतंत्र दंडात्मक रक्कम लावण्यात येते. यासोबतच धनादेशाद्वारे वीजबिल भरण्याची सोय सहा महिन्यांसाठी निलंबित करण्याची कारवाई करण्यात येते. फेब्रुवारी महिन्याच्या २२ दिवसात परिमंडळात २७ लाख रुपयांचे १२० धनादेश बाऊंस झाले असून यात अमरावती जिल्ह्यातील ८५ आणि यवतमाळ जिल्ह्यातील ३५ धनादेशाचा समावेश आहे.

# संरक्षण भिंतीचे निकृष्ट बांधकाम लपविण्याचा प्रकार

## - घाईगडबडीत एकाच दिवशी कॉलम पायाभरणी
## - गावकऱ्यांचा संताप, चौकशीची मागणी

■ *प्रतिनिधी | खेट्री* ■

*पातूर तालुक्यातील अतिदुर्गम सावरगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या संरक्षण भिंतीच्या बांधकामात निकृष्ट दर्जाचा वापर होत असल्याचा प्रकार उघडकीस आल्यानंतर संबंधित ठेकेदार व अभियंता यांची धांदल उडाल्याचे चित्र आहे. या संदर्भातील वृत्त दैनिक 'जनमाध्यम'ने २३ फेब्रुवारीच्या अंकात प्रसिद्ध करताच, कामातील त्रुटी लपविण्यासाठी घाईघाईने एकाच दिवशी अनेक कॉलमची पायाभरणी करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.*



सदर संरक्षण भिंतीच्या बांधकामात सुरुवातीपासूनच निकृष्ट साहित्याचा वापर होत असल्याची तक्रार ग्रामस्थांकडून करण्यात येत होती. भिंतीची उंची, मजबुती आणि सिमेंट-काँक्रीटचे प्रमाण याबाबत गंभीर शंका व्यक्त केल्या जात होत्या. यामुळे ही संरक्षण भिंत भविष्यात कोसळण्याची शक्यता नाकारता येत नसल्याची भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

दरम्यान, या कामाकडे संबंधित विभागीय अभियंता फिरकत नसून, केवळ सुपरवायझरच्या देखरेखीखाली थातूरमातूर काम सुरू असल्याचा आरोप होत आहे. देयक काढण्यासाठी घाईघाईने काम पूर्ण दाखविण्याचा प्रयत्न केला जात असल्याची चर्चा परिसरात रंगली आहे. वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर दोष झाकण्यासाठी एकाच दिवशी अनेक कॉलमची पायाभरणी केल्याने संशय अधिकच बळावला आहे.

या प्रकरणात ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांची मिलीभगत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला असून, शासनाच्या निधीचा दुरुपयोग होत असल्याची खंत व्यक्त करण्यात येत आहे. चौकशी पूर्ण होईपर्यंत काम स्थगित करून तांत्रिक तपासणी करण्यात यावी, अशी मागणीही पुढे येत आहे.

**वरिष्ठांकडे तक्रारीची तयारी**

संरक्षण भिंतीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे होत असल्याने शासनाचे लाखो रुपये वाया जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे. संबंधित कंत्राटदार व अभियंता यांच्या संगनमताची चौकशी व्हावी, यासाठी गावकरी लवकरच वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल करणार असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली आहे.



# महापौर शारदा खेडकर यांनी घेतला अतिक्रमण विभागाचा झोननिहाय आढावा

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहर अतिक्रमणमुक्त करण्याच्या उद्देशाने महापौर शारदा रणजीत खेडकर यांनी सोमवारी (दि. २३) मनपा दालनात अतिक्रमण विभागाचा झोननिहाय आढावा घेतला. या बैठकीस मनपा आयुक्त डॉ. सुनिल लहाने, माजी महापौर विजय अग्रवाल, उपमहापौर अमोल गोगे, सभागृह नेता पवन महल्ले यांची प्रमुख उपस्थिती होती.

'अतिक्रमण मुक्त शहर' या संकल्पनेअंतर्गत शहरातील प्रमुख चौक व मुख्य रस्ते अतिक्रमणमुक्त करण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याचे निर्देश महापौरांनी दिले. अतिक्रमण काढल्यानंतर त्याच ठिकाणी पुन्हा अतिक्रमण होणार नाही, यासाठी विशेष दक्षता घेण्याचे आदेश देण्यात आले.

मनपाने मुख्य मार्गांवरील अतिक्रमणे हटविण्यासाठी ओपन थिएटर परिसर तसेच उमरी येथील जुनी मनपा शाळा क्र. २ येथे हॉकर्स झोन तयार केले आहेत. संबंधित सर्व अतिक्रमणे तातडीने हॉकर्स झोनमध्ये स्थलांतरित करण्याचे निर्देश देण्यात आले. झोननिहाय अतिक्रमण व अनधिकृत बांधकामांबाबत प्राप्त तक्रारींना प्राधान्याने मार्गी लावण्यावर भर देण्यात आला.

वळण रस्त्यांवर अतिक्रमण होऊ न देणे, रस्त्यावर बांधकाम साहित्य आढळल्यास तत्काळ कारवाई करून मार्ग मोकळे ठेवणे, तसेच कनिष्ठ अभियंत्यांनी दररोज स्थळ निरीक्षण करून अनधिकृत बांधकामांवर नियमानुसार कारवाई करावी, अशा सूचना देण्यात आल्या. झोननिहाय तयार करण्यात आलेल्या पथकांना आवश्यक मनुष्यबळ व साहित्य उपलब्ध करून देण्याचाही निर्णय बैठकीत घेण्यात आला.

**मुख्य मार्ग अतिक्रमणमुक्त करण्यासाठी हॉकर्स झोनमध्ये तातडीने स्थलांतराचे निर्देश**



यावेळी सहायक आयुक्त विठ्ठल देवकते, देविदास निकाळजे, राजेश सरप, गजानन घोंगे, सहायक अतिक्रमण निर्मूलन अधिकारी चंद्रशेखर इंगळे, प्रवीण मिश्रा, विधी अधिकारी शाम ठाकुर, कनिष्ठ अभियंते अक्षय बोर्डे, राहुल राऊत, प्रतीक कट्यारमल, रितेश टेकाडे, नरेश कोपेकर आदी उपस्थित होते.

# शिर्ला ग्रामपंचायत सचिवांचा मनमानी कारभार

## कारवाईसाठी गटविकास अधिकाऱ्यांकडे तक्रार



■ प्रतिनिधी | खेट्री ■

शिर्ला येथील ग्रामपंचायतीमध्ये कार्यरत असलेले सचिव दिलीप शामराव वाहोकार यांच्या मनमानी कारभाराविरोधात ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. या प्रकरणी पंचायत समिती पातूर येथील गटविकास अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार अर्ज सादर करण्यात आला आहे.

अर्जदार सागर संजय इंगळे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, संबंधित सचिव नागरिकांना जाणीवपूर्वक त्रास देतात, कार्यालयीन वेळेत वारंवार अनुपस्थित राहतात तसेच संपर्क साधल्यास टाळाटाळीची उत्तरे देतात. त्यामुळे ग्रामस्थांना विविध शासकीय कामांसाठी वारंवार फेऱ्या माराव्या लागत असल्याची तक्रार आहे.

तक्रारीत पुढे नमूद करण्यात आले आहे की, टॅक्स पावती, नमुना ८-अ यांसारखी आवश्यक कागदपत्रे देण्यासाठी नागरिकांना त्यांच्या खाजगी मेडिकल दुकानावर बोलावून पैशांची मागणी केली जाते. या प्रकारामुळे ग्रामस्थांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली असून, अशा स्वरूपाच्या अनेक तक्रारी असल्याचे अर्जात नमूद करण्यात आले आहे.

या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर तात्काळ योग्य ती कारवाई करावी, अन्यथा ग्रामस्थांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा तक्रारदारांनी दिला आहे.


**सचिवाचा हेकेखोरपणा; ग्रामस्थ वैतागले!**

शिर्ला ग्रामपंचायत सचिव दिलीप शामराव वाहोकार यांच्या कथित हेकेखोर वागणुकीमुळे ग्रामस्थ त्रस्त झाले आहेत. ग्रामपंचायत निधीतील लाखो रुपयांच्या अपहारासह विविध कामांसाठी पैशांची मागणी केल्याच्या तक्रारी संबंधित अधिकाऱ्यांकडे करण्यात आल्या आहेत. मात्र, अद्याप ठोस कारवाई न झाल्याने संबंधितांना पाठीशी घातले जात असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे.

# आ. रणधीर सावरकर यांची 'एसआयआर' सपोर्ट टीममध्ये निवड

■ प्रतिनिधी | अकोला ■

भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सरचिटणीस तथा आमदार रणधीर सावरकर यांच्या कर्तृत्वाची आणि अभ्यासू नेतृत्वाची केंद्रीय पातळीवर दखल घेण्यात आली आहे. पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांनी देशातील नऊ राज्यांत सुरू होणाऱ्या 'एसआर' कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्रासाठी स्थापन करण्यात आलेल्या सपोर्ट टीममध्ये सावरकर यांचा समावेश केला आहे. त्यांच्या या निवडीमुळे अकोला जिल्ह्यातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.



सामान्य माणसाच्या भावना जाणून घेणारे, अभ्यासू व विकासाभिमुख नेतृत्व म्हणून सावरकर यांची ओळख आहे. यापूर्वी त्यांच्याकडे पक्षाने महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सोपवल्या आहेत. विधिमंडळ प्रतोद म्हणून काम करताना त्यांनी पक्षनिष्ठा व संघटन कौशल्य सिद्ध केले. तसेच नानाजी देशमुख संजीवनी प्रकल्पाच्या सहकूट अध्यक्षपदाची धुरा सांभाळताना ग्रामीण भागातील विकासाला चालना देण्याचे काम त्यांनी केले.

शेतकरी व ग्रामीण जनतेच्या प्रश्नांवर भक्कम भूमिका घेत पानंद रस्ते समितीसह विविध विकास समित्यांमध्येही त्यांचा सहभाग राहिला आहे. माजी खासदार किरीट सोमय्या यांच्या अध्यक्षतेखालील समितीतही त्यांचा समावेश करण्यात आला असून सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्याच्या दृष्टीने ते सक्रिय राहिले आहेत.

दरम्यान, केंद्रीय नेतृत्वाने त्यांच्या कार्याची घेतलेली दखल ही अकोला जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब असल्याची भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे. पक्षाच्या माध्यमातून राज्य व देशाच्या विकासात अधिक प्रभावी योगदान देण्याची संधी मिळाल्याने सावरकर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# माजी केंद्रीय मंत्री संजय धोत्रे यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपा साजरा करणार सेवा समर्पण दिन

■ प्रतिनिधी | अकोला ■

केंद्रीय राज्यमंत्री तथा माजी खासदार आणि भाजप शेतकरी नेते संजय भाऊ धोत्रे यांचा २६ फेब्रुवारी (गुरुवार) रोजी ६७ वा वाढदिवस 'सेवा समर्पण दिन' म्हणून जिल्हाभर साजरा करण्यात येणार असल्याची माहिती भाजप जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर व जयंत मसने यांनी दिली.

या निमित्ताने जिल्ह्यात विविध समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. रक्तदान शिबिर, जलाभिषेक, स्वच्छता अभियान, अन्नदान तसेच इतर सेवाभावी उपक्रमांच्या माध्यमातून वाढदिवस साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. जिल्ह्यातील २३ मंडळांमध्ये विविध कार्यक्रम राबविण्यात येणार असून, समाजाभिमुख उपक्रमांद्वारे 'सेवा समर्पण दिवस' साजरा केला जाणार आहे. या कार्यक्रमांना आमदार रणधीर सावरकर, पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर, खासदार अनुप धोत्रे, आमदार प्रकाश भारसाकळे, आमदार हरीश पिंपळे, आमदार वसंत खंडेलवाल, विजय अग्रवाल, तेजराव थोरात, किशोर पाटील, जयश्री फुंडकर, योगेश गोतमारे, कृष्णा चव्हाण, पुरुषोत्तम पानझाडे, वैशाली शेळके, महापौर शारदाताई खेडकर, उपमहापौर अमोल गोगे, नगराध्यक्ष सुलभाताई दुतोंडे, मायाताई घुले, वैशालीताई पालीवाल, हर्षद साबळे, अंबादास उमाळे, राजेश नागमते, ॲड. रूपाली काकडे, माधव मानकर, ॲड. देवाशिष काकड, आम्रपाली उपरवट, चंदाताई शर्मा, वैशालीताई निकम, संजय गोटफोडे यांच्यासह मंडल अध्यक्ष, सरचिटणीस, मंडल पदाधिकारी, जिल्हा पदाधिकारी व विविध आघाड्यांचे प्रमुख उपस्थित राहणार आहेत. जिल्हा व महानगरात मोठ्या प्रमाणावर सेवा उपक्रम राबवून वाढदिवस अर्थपूर्ण पद्धतीने साजरा करण्याचा भाजपचा संकल्प असल्याचे पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

**रक्तदान, स्वच्छता अभियान, अन्नदानासह विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन**


## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, आमचे पक्षकार शैलेश सुधाकर टोपरे वय- ४४ रा. गौरक्षण रोड, अकोला यांच्याशी त्यांच्या ताब्यातील व मालकीची व आज रोजी ७/१२ कोष्टकात त्यांच्या नावाने नोंद असलेली खालील वर्णनाची शेती विकत घेण्याचा सौदा कायम केला आहे.

**स्थावर शेतीचे वर्णन :-** मौजे वरोडी, ता. जि. अकोला येथील शेत जमीन

भु.क्र./गट नं. ४४, वर्ग१, हे. आर.४.७३, आ.रू.३४.३४, हिस्सा यातील १ हे १४ आर येणेप्रमाणे एकुण १ हे. १४ आर शेत जमीन त्यातील झाडाझुडपासह मातीसह,

इतंभुवस्तुसह शेती चर्तु:सिमा

**पुर्वेस -** गणेश गाडे यांचे शेत

**पश्चिमेस -** रस्ता

**उत्तरेस -** शाम भड यांचे शेत

**दक्षिणेस -** इंगोले यांचे शेत

त्याआर्थी वरील वर्णीत शेती बाबत कोणाचाही गहाण, बोजा, तारण, सावकारी व्यवहार, वारस हक्क व इतर अधिकार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या आत कागदोपत्री पुराव्यासह कळविण्याचे करावे. अन्यथा कुणालाही कुठल्याही प्रकारची हरकत/ तक्रार नाही असे समजून आमचे पक्षकार खरेदीखत करून घेतील व त्यानंतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा कसलाही उजर, अधिकार, हक्क इत्यादी चालणार नाही याची नोंद घ्यावी. करीता जाहीर नोटीस.

दिनांक :- २३.०२.२०२६
अकोला.

शिक्का

ADVOCATE & NOTARY
Mayur Y. Agrawal
Opp. Home Gard Off. Vasant Talkies Road Akola
Cell No. 9822682227, 9226211830


# निश्चित वेळापत्रकाने रोजगार मेळाव्यांना वाढता प्रतिसाद

**अकोला :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राने प्लेसमेंट ड्राईव्हचे निश्चित वेळापत्रक, त्याची व्यापक प्रसिद्धी व विविध उद्योगांशी सतत संपर्क, सुटसुटीत प्रक्रिया केल्याने जिल्ह्यात रोजगार मेळाव्यांना प्रतिसाद वाढत आहे. अकोला येथील केंद्रातर्फे दर महिन्याच्या तिस-या बुधवारी रोजगार मेळाव्याचे वेळापत्रक निश्चित केले आहे.

त्यामुळे विद्यार्थ्यांना निश्चित दिवसाची कल्पना मिळाल्याने त्यांच्याकडून जागांबाबत चौकशी केली जाते.

# जीडीसी अँड ए. व सी.एच.एम. परिक्षा २०२६ ऑनलाईन अर्ज १० मार्चपर्यंत करता येईल

**अकोला :** सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागामार्फत डिप्लोमा इन को-ऑपरेशन अँड अकाऊंटन्सी (जीडीसी ॲन्ड ए.) व सहकारी गृहनिर्माण व्यवस्थापन प्रमाणपत्र (सीएचएम) परीक्षा मे- २०२६' बाबत अधिसुचना प्रसिध्द करण्यात आली आहे. परीक्षेतून उत्तीर्णांना नागरी सहकारी बँका, नागरी सहकारी पतसंस्था, कृषि उत्पन बाजार समिती अशा सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांमध्ये पदभरतीसाठी प्राधान्य देण्यात येते. तसेच सहकारी संस्थांच्या कर्मचाऱ्यांना सेवानियमातील तरतुदीनुसार सदर परीक्षा उत्तीर्ण झाल्यास वेतनवाढ देण्यात येते. लेखापरीक्षणाकरिता शासनाकडून प्रसिद्ध होणाऱ्या लेखापरीक्षकांचे नामतालिकेवर लेखापरीक्षकांचे नाव समाविष्ट करण्यासाठी सदर परीक्षा उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे.


## Change In Name

I Have Change My Name in My HUSBAND Passport No is (J6016735) From
**SAMTABEN PARESHKUMAR SHAH**
-- TO --
**SAMTA PARESH SHAH**
My Residential Address is -- Nisarg Vatika Deorao Baba Chal Rajputpura Akola Maharashtra 444001.



## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार नामे शुभम मदनलाल अग्रवाल यांचे वतीने सदर जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाने,

**मिळकतीचे वर्णन :** मौजे - बार्शिटाकळी, नझुल शिट क्रं. ४, नझुल प्लॉट क्रं. ८५७, वार्ड क्रं. ४, मालमत्ता क्रं. ३५०, ता. बार्शिटाकळी आणि जिल्हा. अकोला.

सदर मिळकत माझे पक्षकार नामे शुभम मदनलाल अग्रवाल यांना सदर मालमत्ता हि रामलालजी मनुलालजी अग्रवाल यांच्या मृत्यूपश्च्यात वारसाने व मृत्यूपत्र ०५/०८/२०१४ रोजीचे दस्त क्रं. १८३५/२०१४ नुसार शुभम मदनलाल अग्रवाल यांच्या नावे झाली. तद्नंतर शुभम मदनलाल अग्रवाल यांनी Piramal Finance ltd. येथे गृह कर्जासाठी अर्ज केलेला आहे, तसेच सदर मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी किवा वारस हक्क असल्यास, इतर कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्रं. वर हि जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या ७ दिवसाच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तदनंतर कोणतीही हरकत ग्राहय धरल्या जाणार नाही आणि सदर खरेदी खत ठरल्याप्रमाणे नोंदणीकृत करून Piramal Finance ltd. येथे सदर मालमत्ता गहान करण्यात येईल करिता हि जाहीर नोटीस देत आहे.

शिक्का

आपला
**ॲड. रवींद्र रु. वाटाणे**
स्नेहगंधा कॉलनी, अमरावती
मो. नं. ९८२३६९८७४५



## जाहीर नोटीस

### वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. २४४/२०२६ — प्रोसेस नं.२४२८/२०२६
चौ.ता. १८/०३/२०२६ — दिनांक : २०/०२/२०२६

**अर्जदार :** १. सौ. कांता रघुनाथ जाधव २. श्रीमती पंचशिला प्रमोद जाधव ३. कु. भुमिका प्रमोद जाधव ५. हर्षदीप प्रमोद जाधव सर्व रा. शंकर नगर, आपातापा रोड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : प्रमोद रघुनाथ जाधव
**पत्ता :-** रा. शंकर नगर, आपातापा रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत प्रमोद रघुनाथ जाधव यांचे दि. ०९/०५/२०२५ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

आज दि.२८.०२.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२५०/२०२६
**कविता तिवारी अधिक एक -वि- सौ.बानुबाई**
पुढील ता.१७.०३.२०२६

**अर्जदार :**
1. Kavita Ramadhar Tiwari (Before Marriage Name) @ Kavita Chandrakant Shende (After Marriage Name) Aged about 42 Yrs. Occu.: Household R/o Chaitanya Colony, Rukhmini Nagar, Amravati.
2. Nita Ramadhar Tiwari,Aged about 37 Yrs. Occu.:HOusehold R/o Azad Hind Chowk, Jawahar Kirana Budhwara, Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Ramadhar Ramdular Tiwari हे दिनांक 11.01.2018 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. तसेच Shobha Ramadhar Tiwari हे दिनांक 28.06.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Ramadhar Ramdular Tiwari हे दिनांक 11.01.2018 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. Kavita Ramadhar Tiwari @ Kavita Chandrakant Shende + 1 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Kavita Ramadhar Tiwari @ Kavita Chandrakant Shende + 1 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१८.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१७७/२०२६
**श्रीमती अनिता अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.२०.०३.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1. Smt.Anita Subhash Chavhan, Age 58 Yrs. Occu.: Housewife
2. Neha Subhash Chavhan, Age 33 Yrs. Occu.: Housewife
3. Abhishek Subhash Chavhan, Age 24 Yrs. Occu.: Education
All Appli.R/o Near Biyani College, Chhangani Nagar, Ravi Nagar, Po.Sai Nagar, Amravati. Tq. Dist. Amravati

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **सुभाष दलपत चव्हाण** हे दिनांक 27.03.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **अनिता अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अनिता अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१२.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

**दिनांक १६.०२.२०२६**

आज दि.१६.०२.२०२६ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत घाटलाडकी यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव मोहम्मद इसराईल मोहम्मद युसूफ अर्जात नमूद जन्म दिनांक १६.०७.१९७५ च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे घाटलाडकी येथील स्थानिक रहिवासी आहेत.
२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.
३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण जन्म नोंदीबाबत अज्ञानता व माहिती नसणे हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).
४) आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशी करुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) **शिवानंद ए.मदने (सरपंच)** | १) **शिवानंद ए.मदने (सरपंच)** |
| २) **श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच)** | २) **श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच)** |
| ३) **श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.)** | ३) **श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.)** |
| ४) **श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.)** | ४) **श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.)** |
| ५) **अ.खालीक अ.मजीद (ग्रा.पं.सदस्य)** | ५) **अ.खालीक अ.मजीदे (ग्रा.पं.सदस्य)** |

शिक्का

निबंधक,
जन्म मृत्यू नोंदणी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत घाटलाडकी

---

प्रो.नं.५०२/२०२६
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर
दि.१६.०२.२०२६

वि.दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती यांचे न्यायालय
किरकोळ अर्ज क्र./७७/२०२६ — दिनांक १६.०३.२०२६

## जाहीर नोटीस

**अर्जदार -**
१. अपर्णा विठ्ठल पाटील, वय ५५ वर्षे, धंदा - घरकाम
रा.४८, गणेश पार्क भेस्तान,
भेस्तान रेल्वे पो.स्टे.जवळ, जीआव, सुरत गुजरात
२. दिवाकर रमेश गावंडे, वय ५१ वर्षे, धंदा - नोकरी
रा.ए-२/४०४, विहंग व्हॅली, फेज-१ जी.बी.रोड, बिग मॉल समोर, ओवळा, कासारवडवली, ठाणे वेस्ट
३. रविंद्र रमेश गावंडे, वय ४९ वर्षे, धंदा - व्यवसाय
रा.आयव्हीवाय ८४, कोर्ट यार्ड पोखरण रोड नं.१, ठाणे वेस्ट

**--- विरुध्द ---**

गैरअर्जदार- निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **रमेश हरिश्चंद्र गावंडे** हे दिनांक **०५.११.१९७९** रोजी व त्यांची पत्नी **गोकुला रमेश गावंडे** ही दिनांक **१०.०७.२०१४** रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.१६.०२.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र.सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.राजुरकर साहेब वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१३७/२०२६
**मुलाजी कडू अधिक दोन -वि- सौ.बानुबाई**
पुढील ता.०१.०४.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
१. मुलाजी मारोतीराव कडू, वय ७२ वर्षे, कामधंदा - मजुरी
रा.वार्ड नं.१४, श्रीराम धर्मकाटा जवळ, पंचायत समितीजवळ, मु.पो.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती
२. सोनीराम मारोतराव कडू, वय ७० वर्षे, कामधंदा - मजुरी
रा.न्यू कॉंग्रेस नगर, अंबा अर्पण कॉलनी, रुक्मिणी नगर, अमरावती
३. शरद मारोतराव कडू, वय ६६ वर्षे, कामधंदा - शेती
रा.वार्ड नं.१, मु.घोराड, पो.आमनेर, ता.वरुड, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **मारोतराव भगवानजी कडू** हे दिनांक 06.10.2008 रोजी **घोराड, ता.वरुड, जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **मुलाजी मारोतीराव कडू अधिक दोन** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **मुलाजी मारोतीराव कडू अधिक दोन** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२०.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१७८/२०२६
**सलुताई व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०४.०४.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1. Sulutai Pandurang Sakhe, Age 76 Yrs. Occu.: Housewife
2. Deepali Pawanrao Sakhe, Age 34 Yrs. Occu.: Housewife
3. Kunjan Pawan Sakhe, Age 14 Yrs. Occu.: Education
4. Dhanvi Pawan Sakhe, Age 10 Yrs. Occu.: Education
All Appli.R/o Near BSNL Office, Ashti, Po.Ashti, Tq.Bhatkuli, Dist.Amt.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **पवन पांडुरंगजी साखे** हे दिनांक 29.06.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **सुलुताई व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुलुताई व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०४.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १६७**
**आर.एन.आय.रजी.नं.** 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त

### गर्भवती मातांना मिळाला गर्भसंस्कार



**अमरावती-** अमरावती-बडनेरा मार्गावरील सातुर्णा परिसरात नव्याने स्थापीत झालेले आरोग्यम मल्टीस्पेशालीटी हॉस्पीटल आरोग्यसेवेचा वसा सातत्याने जोपासत आहे. विज्ञान आणि परंपरेचा सुंदर संगम म्हणून गर्भवती मातांकरीता रविवारी हॉस्पीटलमध्ये नि:शुल्क गर्भसंस्काराचे आयोजन करण्यात आले होते. आरोग्यमच्या स्त्रीरोग व प्रसुती तज्ञ डॉ. उर्वशी हातगावकर यांच्या अध्यक्षतेखाली गर्भसंस्कार तज्ञ डॉ. वैष्णवी मेहश्रे यांनी गर्भवती मातांना मार्गदर्शन केले. त्यांनी खेळीमेळीच्या वातावरणामध्ये गर्भवती माता व त्यांचे पती यांच्यासाठी स्पर्धा घेतल्या. सोबतच फिजीओथेरपीस्ट डॉ. शिखा चावला, पोषण आहार तज्ञ डॉ. ऋतुजा शिंगरूप यांनी सुद्धा व्यायाम व आहार बाबत मार्गदर्शन केले.कार्यक्रमाला स्त्रीरोग व प्रसुती तज्ञ डॉ. उर्वशी हातगावकर यांनी गर्भावस्थेमध्ये घ्यावयाची काळजी बाबत मार्गदर्शन केले. फिजीओथेरेपीस्ट डॉ. शिखा चावला यांनी व्यायाम तर डॉ. ऋतुजा शिंगरूप यांनी पोषण व सकस आहाराबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने गर्भवती महिला व परिवारातील सदस्य उपस्थित होते.

### आज जनसंवाद, समस्या निवारण व कर प्रकरणांची सुनावणी

**अमरावती-** नागरिकांच्या तक्रारी, समस्या व सूचनांचे तातडीने निराकरण करण्याबरोबरच प्रलंबित कर प्रकरणांवर सुनावणी घेण्यासाठी अमरावती महानगरपालिका तर्फे महानगरपालिका स्तरीय जनसंवाद, समस्या निवारण व कर प्रकरणांची सुनावणी कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.हा कार्यक्रम मंगळवार २४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे होणार आहे. या वेळी शहरातील विविध विभागांशी संबंधित नागरिकांच्या समस्या, तक्रारी व सूचनांवर चर्चा करून आवश्यक कार्यवाहीबाबत निर्णय घेतले जाणार असून प्रलंबित मालमत्ता कर प्रकरणांवरही सुनावणी घेण्यात येणार आहे.कार्यक्रमास महानगरपालिकेचे सर्व संबंधित अधिकारी उपस्थित राहणार आहेत. नागरिकांनी आपल्या समस्या, सूचना तसेच कर प्रकरणांशी संबंधित आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### संजय वाघुळे यांना समाजरत्न पुरस्कार



**अमरावती-** कला, साहित्य, सामाजिक तथा आकाशवाणी लेखन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल अखिल भारतीय रेडिओ श्रोता महासंघाचे सचिव संजय वाघुळे यांना पुणे येथील दैनिक चालू वार्ता व स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने समाजरत्न पुरस्कार- २०२५ प्रदान करून सन्मानित करण्यात आले. अध्यक्ष महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे सदस्य संजय विष्णुपंत भोसले उर्फ श्वेता दीपदास तर प्रमुख पाहुणे म्हणून दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट, पुणे अध्यक्ष सुनील रासने, संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थान अध्यक्ष डॉ. भावार्थ देखणे महाराज, जय मल्हार आर्थिक महामंडळ महा. राज्य उपाध्यक्ष दौलत नाना शितोळे, राष्ट्रवादी कॉंग्रेस सरचिटणीस प्रशांत गांधी, दैनिक चालू वार्ता मुख्य संपादक तथा स्वाभिमानी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष डी. एस. लोखंडे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत संजय वाघुळे यांना शाल, श्रीफळ स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र देऊन समाज रत्न या पुरस्काराने गौरीविण्यात आले.

### स्मशानभूमी परिसरात राबविण्यात आले स्वच्छता अभियान



**अचलपूर-** शहरातील श्री भैरवघाट स्मशानभूमी परिसरात अभियान राबविण्यात आले. विशेष म्हणजे सामाजिक कार्यकर्ते स्वप्नील मडघे ,गजानन निमकर यांनी १५ दिवसातून एक रविवार स्वच्छतेसाठी हे अभिनव संकल्पना राबविण्याचा निश्चय केला आहे. या अंतर्गत शहरातील श्री भैरवघाट स्मशानभूमी परिसरातील जंगली गवत काढून परिसर सुंदर व स्वच्छ करण्यात आले .यावेळी उपस्थितीत तरुणांमध्ये मोठा उत्साह दिसत होता .यावेळी स्वप्नील मडघे, विजय काशीकर, नीकेश शिंगणे ,विनोद बोबडे, गजानन निमकर , गोपाल भोपाळे ,श्याम रुद्रकार , बाबू बांबलकर, कपिल काशीकर , सागर पुरोहित , पार्थ चर्जन प्रामुख्याने उपस्थित होते.मार्च महिन्यात होणाऱ्या स्वच्छता मोहिमेत सामाजिक बांधिलकी म्हणून सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन सामाजिक कार्यकर्ते स्वप्नील मडघे यांनी केले आहे.

### अचलपूर तालुका कॉँग्रेस कमिटीच्या वतीने शिवजयंती



**अचलपूर-** तालुका कॉँग्रेस कमिटी ग्रामीण व शहर तसेच परतवाडा शहर कॉँग्रेस कमिटीच्या वतीने हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाला तालुका व शहर कॉँग्रेसमधील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांमध्ये माजी जिल्हा परिषद सदस्य वासंती मंगरोळे , नामदेव तनपूरे, श्रीकांत झोडपे, राहुल गवई, अमोल चिमोटे, अमोल बोरेकार, सचिदानंद बेलसरे, राहुल गाठे, श्रीधरराव काळे, राजेंद्र पवार, इस्माईल भाऊ(सदस्य), प्रमोद कांबळे, दीपाली विधळे, शारदा उईके, दीपा, तायडे, विजया फाटकर, देवेंद्र पेटकर, प्रशांत देशमुख, आदींचा समावेश होता. तसेच सागर व्यास, बाळा शहसुहे, अनिल जामनेकर, जय घोरे, दिनेश मनवरे, सुभाष छापाने, विशाल खानझोडे, हिम्मतराव अभ्यंकर, बबलू गावंडे, जितेंद्र मसने, गैरव जाधव, रोशन कविटकर, योगेश डांगे, अरविंद नेतनराव, सतिष हरणे, दिनेश कदम, योगेश वानखेडे, हेमंत तळस, सतीश मंगरोडे, धीरज वासनकर, ज्ञानेश्वर निकम, साहेबरावजी दामोधरे, अक्षय काळे, पवन देशमुख, गौरव खडसे, साहिल देवडेकर, आदित्य इंगळे, तुषार काजे, आदी कार्यकर्तेही उपस्थित होते.यानिमित्त बाईक रॅली, काढून जयस्तंभ चौक येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याला हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

---

**तिवसा मतदार संघाच्या सर्वांगीण विकासासाठी**

# अर्थसंकल्पीय अधिवेशनात व्यापक विमर्श घडवून आणण्याकरिता सज्ज- आ. राजेश वानखडे

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र राज्याचे वर्ष २०२६-२७ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन आजपासून मुंबई येथील विधानभवनात सुरू होत आहे. तब्बल एक महिना चालणाऱ्या या महत्त्वपूर्ण अधिवेशनात तिवसा विधानसभा मतदार संघातील प्रलंबित विकासकामांसाठी आ. राजेश वानखडे यांनी सशक्त पाठपुरावा करण्याची तयारी केली आहे. मतदार संघातील जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी तारांकित प्रश्न, लक्षवेधी सूचना व विविध संसदीय आयुध वापर करणार असल्याचे त्यांनी आज स्पष्ट केले.अधिवेशनात आ. राजेश वानखडे यांनी खालील प्रमुख मुद्दे उपस्थित करण्यात येणार आहेत:

शिक्षण क्षेत्र: तिवसा येथे नवीन शासकीय पॉलिटेक्निक व नर्सिंग कॉलेजची स्थापना. आरोग्य सुविधा.मतदार संघातील माहुली ज., वलगाव, नेर पिंगळाई, कुऱ्हा, खोलापूर येथील आरोग्य केंद्रांचे ग्रामीण रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करणे, औद्योगिक विकास: तिवसा एमआयडीसीचे विस्तारी करण करणे, पंचतारांकित एमआ यडीसी नांदगाव पेठ येथे उद्योग व रोजगार निर्मिती.मोझरी विकास आराखडा, वलगाव विकास आराखडा व कौंडण्यपूर विकास आराखड्यातील इमारतींचे हस्तांतरण न झाल्याने झालेल्या दुरवस्थेचे निराकरण व नवीन बांधकाम प्रस्तावांना मान्यता देऊन निधीची उपलब्धता करण्याबाबत पाठपुरावा.

प्रशासकीय सुविधा:नेर पिंगळाई येथे अप्पर तहसील कार्यालयाची निर्मिती करून मोर्शी तहसीलवरचे अवलंबित्वक कमी करून नागरिकांना सुलभ सुविधा उपलब्ध करून देणे तसेच अमरावती तहसीलचे विभाजन करून अतिरिक्त अमरावती ग्रामीण तहसील कार्यालयास स्थापनेस गती देण्यात येणार आहे.पाणीपुरवठा व जलजीवन मिशन: १०५ गावे वाढीव



प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या उर्वरित कामांना निधी उपलब्ध करणे व कामांना गती देणे या करिता शासन स्तरावर पाठपुरावा करण्यात येणार आहे.

रस्ते विकास: मतदार संघातील प्रमुख जिल्हा मार्गांची सुधारणा करण्याकरिता अर्थ संकल्प मध्ये जास्तीत जास्त तरतूद करून घेण्याचे उद्दिष्ट असल्याचे सुद्धा नमूद केले आहे. त्याचप्रमाणे अस्तित्वातील मंजूर ३०० किलोमीटर शेत पांदण रस्ते व वाढीव शेत पांदण रस्त्यांच्या मंजुरीसाठी सार्थक प्रयत्न करण्यात येणार असून जास्तीत जास्त शेत रस्त्याचे निर्मिती करून शेतकऱ्यांना शेती करणे सुलभ करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यात येणार आहे.तीर्थक्षेत्र विकास: सिद्धिविनायक गणपती वायगाव, गायत्री माता संस्थान सार्सी, महारुद्र हनुमान संस्थान जहागीरपुर व आसरा माता देवस्थान सावंगा आसरा या चार प्रमुख तीर्थक्षेत्रांना 'ब' वर्ग तीर्थक्षेत्रांतर्गत मंजूर निधी उपलब्ध करून विकासकामे करून तीर्थकरू व भाविकांना सुविधा उपलब्ध करून देवस्थानचा विकास करणे ही प्राथमिकता असल्याचे नमूद केले.मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व पालकमंत्री बावनकुळे यांच्या कुशल नेतृत्वाखाली हे सर्व विषय लवकरात लवकर मार्गी लावून मतदार संघाला जास्तीत जास्त निधी मिळवून देण्याचा विश्वास असल्याचे आ. राजेश वानखडे यांचा सातत्याने पाठपुरावा सुरू राहील, असेही त्यांनी अधोरेखित केले.

---

## जिल्ह्यातील २७,८८८ विद्यार्थ्यांनी दिली शिष्यवृत्ती परीक्षा

**अमरावती/का.प्र.**



जिल्ह्यात इयता पाचवी व आठवी करिता रवीवारी २२५ केंद्रांवर शिष्यवृत्तीची परीक्षा शांततेत झाली. दोन्ही वर्गातील २७,८८८ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. मात्र विविध कारणांमुळे १ हजार १११ विद्यार्थी परीक्षेला अनुपस्थित होते.

पूर्व उच्च प्राथमिक इयता पाचवी व पूर्व माध्यमिक इयता आठवी करिता शिष्यवृत्ती परीक्षा रविवार, २२ फेब्रुवारीला जिल्ह्यात झाली. इयत्ता पाचवीकरिता जिल्ह्यात एकूण १३४ परीक्षा केंद्र निश्चित केले होते. याकरिता १८,४४७ विद्यार्थी प्रविष्ट झाले असताना यापैकी १७,७७८ विद्यार्थी परीक्षेला उपस्थित होते. मात्र ६७० विद्यार्थ्यांनी अनुपस्थिती दर्शविली, इयत्ता आठवीकरिता ९१ परीक्षा केंद्रांवर १०,५५१ विद्यार्थी प्रविष्ट असताना प्रत्यक्षात १०,११० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली, तर ४४१ विद्यार्थी अनुपस्थित होते. जिल्ह्यात एकूण २२५ केंद्रांवर २७, ८८८ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली तर १ हजार १११ विद्यार्थ्यांनी मात्र परीक्षेला दांडी मारली. अमरावती शहरात सर्वाधिक पाचवीकरिता १७ व आठवीकरिता १२ अशी २९ केंद्रांवर परीक्षा झाली. अचलपूर, वरूड, धारणी, मोर्शी, अंजनगाव सुर्जी आदी तालुक्यांतही मोठ्या संख्येने विद्यार्थी परीक्षेला बसले होते. परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी शिक्षण विभागाकडून अधिकारी, कर्मचारी सज्ज करण्यात आले होते. यामध्ये २२५ केंद्र संचालक व १४३९ पर्यवेक्षक असे एकूण १६६४ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. याशिवाय परीक्षेवर जिल्हास्तरावर दोन व तालुक्यास स्वतंत्र असे एकूण १६ पथकाचा वॉच होता. जिल्ह्यातील सर्व परीक्षा केंद्रांवर परीक्षा सुरळीत आणि शांततेत पार पडली. प्रशासनाकडून आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. कोणताही अनुचित प्रकार घडला नसल्याची माहिती शिक्षण विभागाकडून देण्यात आली.

## अमरावतीवरून होळी स्पेशल गाड्या सुटण्याची प्रतीक्षा

**अमरावती/का.प्र.**

होळीनिमित्त गृहनगरात येणाऱ्या अंबानगरीतील प्रवाशांची संख्या हजारोच्या घरात असतील तरी अद्याप अमरावती मॉडेल रेल्वे स्टेशनवरून एकही थेट होळी स्पेशल रेल्वे मुंबई, पुणे, सुरत, जबलपूरसाठी मिळाली नाही. होळीला १० दिवस शिल्लक असताना तसेच मध्य रेल्वे शेकडो गाड्यांची दररोज घोषणा करीत असताना अमरावतीची पाटी कोरी असल्यामुळे रेल्वे प्रवाशांमध्ये आश्चर्य व्यक्त होत आहेत. अनेकांनी नाराजीही व्यक्त केली आहे.

अमरावती जिल्ह्यातील अनेक चाकरमाने, विद्यार्थी, व्यापारी, खासगी नोकदार हे मुंबई, पुणे या महानगरांमध्ये साध्य वास्तव्यास आहेत. परंतु, कोणत्याही मोठ्या सण-उत्सवाला साजरे करण्यासाठी ते गृहनगरात येत असतात. संर्वात उपयोगी व स्वस्त पर्याय हा रेल्वे असल्यामुळे अमरावतीला येण्यासह परत जाण्यासाठी रेल्वेचे आरक्षण आधीच करून ठेवले जाते. तरीही अनेक प्रवासी असे असतात ज्यांना आरक्षण मिळत नाही. त्यामुळे त्यांना इतर पर्यायी वाहनांचा वापर करण्याशिवाय पर्याय नसतो.

अनेकजण तर खासगी वाहनानेच मग गृहनगरात येतात. परंतु, रेल्वेच्या तुलनेत हा प्रवास महागडा ठरतो. मोठ्या संख्येत प्रवासी असतानाही मध्य रेल्वेने होळीसाठी अमरावतीहून कोणतीही होळी स्पेशल ट्रेन ना मुंबईसाठी, ना पुण्यासाठी, ना सुरतसाठी, ना जबलपूरसाठी दिली आहे.

त्यामुळे सध्या प्रवाशांमध्ये रोष निर्माण झाला आहे. मध्य रेल्वेने तत्काळ दखल घेत या दोन्ही महानगरांसाठी किमान एक ते दोन होळी विशेष ट्रेन द्याव्यात अशी मागणी जोर धरायला लागली आहे.

नागपूरहून बडनेरा मार्गे मुंबई, पुण्याला जाणाऱ्या विशेष गाड्या असल्या तरी यासाठी प्रवाशांना १२ कि.मी. अंतरावरील बडनेरापर्यंत जावे लागते. तसेच तेथून गृहनगरात यावे लागते. यात खर्च होतो. त्या तुलनेत जर थेट अमरावतीपर्यंत विशेष रेल्वे असली तर ती सुविधाजनक ठरते. कारण, अमरावतीहूनच त्याने आरक्षण मिळवून परत जाता येते, असे प्रवाशांना वाटते.अमरावतीहून मुंबई आणि पुण्यासाठी जर होळी विशेष गाडी देण्यात आली तर साहजिकच बडनेरा रेल्वे स्टेशनवरील प्रवाशांचा ताण कमी होईल, कारण, बहुतेक आरक्षण हे आरक्षण मिळणार नाही, ते बडनेरा रेल्वे अमरावतीहूनच होतील. ज्यांना अमरावतीहून स्टेशनवरून आरक्षण मिळवू शकतात. मात्र, थेट अमरावतीहून सुटणाऱ्या विशेष ट्रेनचा आरक्षण कोटा मोठा असल्यामुळे अनेकांना आरक्षण मिळण्याची शक्यता असते. नाही मिळाले तर बडनेराहून आरक्षण मिळवण्याचा अतिरिक्त पर्याय असतो.

मात्र, अद्याप अमरावतीला रेल्वे मिळाली नसल्यामुळे प्रवाशांमध्ये रोष दिसून येत आहे.

## महाआरोग्य व रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**अचलपूर/वार्ताहर**

श्री संत श्री राम बाबा सेवा संस्थान, जीवनपुरा अचलपूर येथे भारतीय जनता पार्टी अचलपूर शहर मंडळाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त निःशुल्क महाआरोग्य रोगनिदान व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते . या प्रसंगी आ. प्रविण तायडे यांची प्रमुख उपस्थितीती होती. शिबिरात १२७ नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

डॉ. राजेंद्र गोडे वैद्यकिय महाविद्यालयाचे वैद्यकिय सेवा दिली, अनेक तरूण युवकांनी रक्तदान सुध्दा केले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेत जनकल्याणाला दिलेल्या प्राधान्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवत समाजसेवेच्या



**आ. प्रविण तायडे यांनी केला रक्तदात्यांचा सत्कार**

भावनेतून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे भाजपा शहर अध्यक्ष कुंदन यादव, स्वप्नील मडघे, आनंद मेहरेअक्षय बुंदेले, शंकर भाषांनी, महेश देशमुख, डॉ. निलेश तारे, प्रविण मेहरे यांनी सांगितले. याप्रसंगी भाजपा पदाधिकारी राजन जयस्वाल, अनिरूध्द मिश्रा, रूपेश ढेपे, तालुकाध्यक्ष शंकर मालखेडे नगरसेविका पदमिनी नगरसेवक अक्षय पखाले, बेडे, सुरेंद्र तांबे, नितीन मेहरे, भूषण मेहरे, प्रभाकर धोत्रे, उमक काका, अशोकराव बेडे, श्रीकांत घन, गौरव रघुवंशी, विक्की सावरकर, निलेश नागपुरे, पंकज उमक, सनी गौर, शुभम सावरकर, मंगल पारधी, वंदना येळणे, राजुभाऊ रहमतकर, शिवा बुंदेले, स्वप्नील बोंडे, पटवारी आदि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली.

अनेक गरजू रुग्णांना आवश्यक सल्ला व उपचारांविषयी मार्गदर्शन देण्यात आले.रक्तदान शिबिरात युवक - युवतींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत 'रक्तदान हेच श्रेष्ठ दान' हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून दिला.

शिवरायांच्या जयंतीदिनी आरोग्यसेवेच्या नाळ माध्यमातून समाजाशी जोड ण्याचा हा उपक्रम प्रेरणादायी ठरला. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांची परंपरा पुढेही सुरू ठेवण्याचा संकल्प आयोजकांनी व्यक्त केला.

## सनराईज इंग्लिश स्कूल येथे विज्ञान प्रदर्शन

**तिवसा/वार्ताहर**



येथील सनराईज इंग्लिश स्कूल, तिवसा येथे विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे व त्यांच्या कलागुणांना वाव देणे हा या प्रदर्शनाचा मुख्य उद्देश होता.या प्रदर्शनात विद्याविहार स्कूल, शेंदुरजना बाजार, भाऊसाहेब ठाकूर स्कूल, तळेगाव ठाकूर, ज्ञानमाता इंग्रजी शाळा, देवराव दादा हायस्कूल , तिवसा वाडेकर नॅशनल स्कूल, मोझरी, कृष्णाबाई दंडाळे कन्या विद्यालय, तिवसा

सनराईज इंग्लिश स्कूल, तिवसा इत्यादी शाळांनी सहभाग घेतला होता.या कार्यक्रमाला गटविकास अधिकारी अभिषेक कासोदे, गटशिक्षणाधिकारी नितीन उंडे, आरती राजेश वानखडे, गवळी ,गंगाधर दंडाळे, विद्याधर दंडाळे, छाया दंडाळे ,शिल्पा दंडाळे, विलास इंगोले ,जयश्री सोनारे , सुनील बुरघाटे, विश्वजीत दंडाळे , कोमल दंडाळे, रजनी माहोरे आणि जयश्री नवलेइत्यादी मान्यवरांची उपस्थिती लाभली. संचालन हिरुळकर आणि नागपुरे यांनी यशस्वीरित्या केले. मान्य वरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पदके व सहभाग प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

## जन्म-मृत्यूची नोंदणी २१ दिवसांत करणे बंधनकारक

**अमरावती/का.प्र.**

जन्म किंवा मृत्यूची घटना घडल्यापासून २१ दिवसांच्या आत त्याची अधिकृत नोंदणी करणे कायद्याने बंधनकारक आहे. विहित मुदतीत नोंदणी न केल्यास भविष्यात अनेक कायदेशीर आणि प्रशासकीय अडचणींचा सामना करावा लागू शकतो, अशी माहिती आरोग्य विभागामार्फत देण्यात आली आहे.

या संदर्भात जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण पारिसे यांनी नागरिकांना ही प्रक्रिया गांभीर्याने घेण्याचे आवाहन केले आहे. शासन निर्णय आणि जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ नुसार, २१ दिवसांच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थेकडे नोंदणी केल्यास प्रमाणपत्र मोफत मिळते. यामुळे नागरिकांना विनाकारण विलंब शुल्क किंवा दंडाचा भुर्दंड सोसावा लागणार नाही.

जन्म नोंदणी ही शाळा व महाविद्यालयीन प्रवेशासाठी, आधार कार्ड, पासपोर्ट, मतदान ओळखपत्र काढण्यासाठी आणि शासकीय योजना, शिष्यवृत्ती व वयाचा अधिकृत पुरावा म्हणून आवश्यक आहे. त्याचप्रमाणे, मृत्यू नोंदणी ही वारसाहक्क निश्चित करणे, मालमत्तेचे हस्तांतरण, पेन्शन, विमा दावे आणि बँक खाती बंद किंवा हस्तांतरित करण्यासाठी तसेच शासकीय नोंदी अद्ययावत ठेवण्यासाठी आवश्यक असते.



अनेकदा नागरिकांच्या दुर्लक्षामुळे नोंदणी करण्यास उशीर होतो, अशा वेळी अतिरिक्त दंड भरण्यासोबतच पोलीस चौकशी आणि कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी वेळ व पैसा खर्च करावा लागतो. ही कटकट टाळण्यासाठी जन्म किंवा मृत्यूची घटना घडताच संबंधित नगरपरिषद, ग्रामपंचायत, शासकीय रुग्णालय किंवा अधिकृत नोंदणी केंद्रात तातडीने संपर्क साधावा. नागरिकांनी सामाजिक जबाबदारी ओळखून आणि स्वतःच्या सोयीसाठी जन्म-मृत्यूची नोंद वेळेतच करावी, जेणेकरून भविष्यातील तांत्रिक अडचणी टाळता येतील, असे आवाहन डॉ. पारिसे यांनी केले आहे.

**कुठे करावी लागते नोंद**

जन्म किंवा मृत्यूची नोंद संबंधित नगर परिषद, ग्रामपंचायत, शासकीय रुग्णालय अथवा अधिकृत नोंदणी केंद्रात करणे आवश्यक आहे. जन्म किंवा मृत्यूचे अधिकृत प्रमाणपत्र मिळवण्यासाठी नोंदणी अनिवार्य आहे. जन्म व मृत्यू नोंदणी ही प्रत्येक नागरिकाची कायदेशीर जबाबदारी आहे. २१ दिवसांच्या आत नोंदणी केल्यास कोणताही अडथळा न येता प्रमाणपत्र मिळते, यामुळे नागरिकांनी विलंब टाळून वेळेत नोंदणी करावी.

**आता वेळेत करा नोंद**

निर्धारित कालावधीत नोंदणी न केल्यास संबंधितांना नियमांनुसार विलंब शुल्क भरावे लागतात. तसेच दिलेल्या मुदतीत नोंदणी केल्यास प्रमाणपत्र मोफत मिळते, तर २१ दिवसांनंतर नोंदणीसाठी विलंब शुल्क व कागदपत्रांची पडताळणी आवश्यक ठरते. यासाठी शासनाने दिलेल्या मुदतीत नोंदणी करून विलंब शुल्क टाळावा.

**डॉ. प्रवीण पारिसे,** जिल्हा आरोग्य अधिकारी.

# युवाशक्ती हीच भारताच्या प्रगतीची खरी ओळख- जनरल मनोज पांडे

## -विद्यापीठाचा ४२ वा दीक्षांत समारंभ उत्साहात, -निकीता पुनसे या विद्यार्थीनीला ६ सुवर्ण व १ रोख पारितोषिक

**अमरावती/प्रतिनिधीः-** 'तरुण पिढी ही केवळ देशाचे नागरिक नसून ती भारताच्या परिवर्तनाचा आणि प्रगतीचा एक अविभाज्य भाग आहे. येणा-या काळात विविध क्षेत्रांतील नेतृत्वाची धुरा तुम्हा तरुणांच्या खांद्यावर असेल, युवा शक्ती हीच भारताच्या प्रगतीची खरी ओळख असल्याचे प्रेरणादायी उद्गार भारतीय लष्कराचे माजी प्रमुख जनरल मनोज पांडे यांनी काढले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या ४२ वा दीक्षांत समारंभामध्ये प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. व्यासपीठावर समारंभाच्या



अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे तसेच विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. आर.एम. कडू, हर्षवर्धन देशमुख, डॉ. प्रवीण









रघुवंशी, डॉ. आर.डी. सिकची, डॉ. व्ही.एच. नागरे, डॉ. व्ही.एम. मेटकर, डॉ. विद्या शर्मा, डॉ. ए.एम. बोर्डे, डॉ. मनिषा कोडापे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, वित्त व लेखा अधिकारी सीए पुष्कर देशपांडे, अधिष्ठाता डॉ. अरूण हरणे, डॉ. एच. आर. देशमुख, डॉ. मोना चिमोटे, डॉ. वैशाली गुडधे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, आयक्युएसी संचालक डॉ. संदीप वाघुळे, तंत्रशिक्षण सहसंचालक डॉ. व्ही.आर. मानकर, उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. अभय खांबोरकर प्रामुख्याने उपस्थित होते.

जनरल मनोज पांडे यांनी या प्रसंगी पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी 'तीन सी' चा मंत्र दिला. चरित्र, क्षमता आणि आचरण हे यशाचे तीन आधारस्तंभ आहेत. प्रामाणिकपणा, निष्ठा आणि नैतिक धैर्य हे उत्तम माणसाचे लक्षण आहे. विद्यार्थ्यांनो हेच गुण तुम्हाला☞(पान २ वर)

# वाहनाच्या धडकेत कोल्ह्याचा मृत्यू

### परतवाडा-धारणी मार्गावर हळहळ व्यक्त

**अचलपूर/प्रतिनिधीः-** परतवाडा-धारणी रोडवरील अंबिका लॉन परिसरात आज (दि.२३) सकाळी घडलेल्या दुर्दैवी घटनेत अज्ञात वाहनाच्या धडकेत एका नर कोल्ह्याचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सकाळच्या सुमारास रस्त्याच्या कडेला कोल्हा मृत अवस्थेत आढळून आला. ही बाब लक्षात येताच नागरिकांनी तात्काळ वन विभागाला माहिती दिली. माहिती



मिळताच महाराष्ट्र वन विभाग अंतर्गत परतवाडा वनपरिक्षेत्रातील अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला.

प्राथमिक तपासात भरधाव वेगाने जाणाऱ्या अज्ञात वाहनाने धडक दिल्याने कोल्ह्याचा मृत्यू झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकरणी वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी घटनेची अधिकृत नोंद करून अज्ञात वाहन चालकाविरुद्ध वन्यजीव संरक्षण कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. संबंधित वाहनाचा शोध घेण्यासाठी पुढील तपास सुरू असल्याची माहिती वन विभागाकडून देण्यात आली.

दरम्यान, परतवाडा-धारणी मार्गावर वनक्षेत्रालगतचा परिसर असल्याने येथे वन्यजीवांचा वावर मोठ्या प्रमाणावर☞(पान २ वर)

# राहुल नगरात अश्रूधूराचा धुराळा

### एसआरपी मैदानावर मुलांना सापडली होती डमी नळकांडी

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील राहुल नगर परिसर बुधवारी दुपारी अचानक धुराने वेढला गेला आणि काही मिनिटांतच भीतीचे वातावरण निर्माण झाले. घरांमधून डोळ्यांत पाणी येत असल्याच्या तक्रारी येऊ लागल्या, तर रस्त्यावरून जाणारे नागरिकही जळजळीने हैराण झाले. सुरुवातीला नेमके काय घडले, याचा अंदाज न आल्याने अफवांना ऊत आला.

प्राथमिक माहितीनुसार, परिसरातील एका अल्पवयीन मुलाला एसआरपी मैदानावर डमी स्वरूपातील अश्रूधूर नळकांडी आढळली. कुतूहलापोटी ती घरी आणून उघडण्याचा प्रयत्न करताच अचानक धूर पसरला. धुराचा परिणाम घरातील सदस्यांबरोबरच शेजाऱ्यांनाही जाणवला. काही क्षणांतच नागरिक घराबाहेर धावत आले. घटनेची माहिती मिळताच फ्रेजरपुरा पोलीस स्टेशन चे पथक तात्काळ दाखल झाले. पोलिसांनी परिसराची पाहणी करून परिस्थिती नियंत्रणात आणली. चौकशीअंती ही नळकांडी प्रशिक्षणासाठी वापरली जाणारी डमी असल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. या प्रकरणी दोन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेऊन त्यांची समुपदेशनासह चौकशी सुरू आहे. पोलिसांनी नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आणि ☞(पान २ वर)

# डॉ. शुभांगी जोशी यांना इंग्रजी विषयात पीएच.डी.पदवी प्राप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** इंग्रजी विषयातील सखोल अभ्यास, संशोधनाची आवड आणि सातत्यपूर्ण परिश्रम यांच्या जोरावर महिला महाविद्यालय येथील प्रा. डॉ. शुभांगी अरुण जोशी यांनी डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (पीएच.डी.) पदवी संपादन करून शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळविले आहे.



त्यांच्या संशोधनाचा विषय प्रख्यात लेखिका व समाजसेविका सुधा मूर्ती यांच्या कादंबऱ्यांतील स्त्री व्यक्तिरेखांच्या परिवर्तनाचा अभ्यास हा होता.

डॉ. शुभांगी जोशी यांनी आपल्या प्रबंधामध्ये सुधा मूर्ती यांच्या साहित्यामधील स्त्री पात्रांच्या प्रवासाचे सखोल विश्लेषण केले आहे. सामाजिक बंधने, परंपरा, संघर्ष, आत्मभान आणि सक्षमीकरण या विविध पैलूंमधून स्त्री व्यक्तिरेखा कशा घडत जातात, याचा अभ्यास त्यांनी संशोधनातून मांडला आहे. त्यांच्या या अभ्यासामुळे इंग्रजी साहित्यातील स्त्रीवादी दृष्टिकोनाला नव्या दृष्टीने अधोरेखित करण्यात मदत झाली आहे. या संशोधन कार्यासाठी त्यांना प्रा. डॉ. विष्णु शेकोकार (विद्याभारती महाविद्यालय, अमरावती) यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या☞(पान २ वर)

# राणीघाट अपघातातील जखमी महिलेचा मृत्यू

## जिल्हाधिकारी येरेकर यांनी जखमींची केली विचारपूस

### -योग्य उपचार करण्याची सूचना

**अमरावती/प्रतिनिधीः-** मेळघाटातील धारणी तालुक्यात राणीघाटामध्ये रविवारी रात्री झालेल्या अपघातातील जखमींना जिल्हा सामान्य रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. यातील रिता राठोड यांचा सोमवारी (दि.२३) सकाळी उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यामुळे या अपघातातील मृतकांची संख्या आता पाच झाली



आहे. दरम्यान जखमी आणि त्यांच्या नातेवाईकांची जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी सोमवारी (दि.२३) भेट घेऊन अपघात आणि प्रकृतीची माहिती घेतली. तसेच जखमींवर योग्य उपचार करण्याची सूचना केली. अपघाताला जबाबदार वाहनचालकांवर सक्त कारवाई करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी येरेकर यांनी जिल्हा पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांना दिल्या. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. विनोद पवार आदी उपस्थित होते.

अपघातामधील अर्चना दारासिंगे (रा. कंजोली), गेरुबाई देवळे (रा. मोठेखेडे), रिता राठोड (रा. सिनंबद), देवा धांडे (रा. कंजोली) मुना☞(पान २ वर)

# कामगारांचा आयुक्तालयावर धडकला मोर्चा

### -प्रलंबित मांगण्यासाठी निर्दशने

**अमरावती/प्रतिनिधीः-** आयटकच्या नेतृत्वात बांधकाम कामगारांनी आपल्या प्रलंबित मागण्यासाठी आज सोमवार २३ फेब्रुवारीला दुपारी कामगार आयुक्त कार्यालयावर विशाल मोर्चा काढला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौक परिसरातून मोर्चाची सुरुवात झाली. जिल्हाधिकारी कार्यालय मार्गे होत कामगार आयुक्त कार्यालयावर मोर्चा धडकला. जेथे कामगारांनी आपल्या प्रलंबित मागण्यासाठी निर्दशने केली. ४४ कामगारांनी संघर्षातून आणि चळवळीतून मिळवले ते रद्द करून नवीन कायदा करण्यात आला आहे ते रद्द करा. कामगारांना ईएसआय या आरोग्य योजना अंतर्गत समाविष्ट करण्यात यावे. पीएफ,



ग्रेच्युटी आणि सणासुदीच्या भत्त्यासाठी कायदेशीर तरदूत करण्यात यावी. ☞(पान २ वर)

# विलास नगरात घरफोडी, १२.४० लाखांचा ऐवज लंपास

**अमरावती/प्रतिनिधीः-** लग्नसमारंभासाठी बाहेर गेलेल्या कुटुंबाच्या बंद घरावर अज्ञात चोरट्यांनी डल्ला मारत १२ लाख ४० हजार रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने लंपास केल्याची घटना विलास नगर परिसरात उघडकीस आली आहे. २१ ते २२ फेब्रुवारीदरम्यान घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात असुरक्षिततेची भावना वाढली आहे. राजेंद्रकुमार शंकरलालजी शर्मा (रा. विलास नगर, गल्ली क्र. २, हनुमान मंदिराजवळ) यांनी दिलेल्या☞(पान २ वर)

# दर्यापूरातील अस्वच्छेतसह भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करा

### -भाजपा युवा मोर्चा शहराध्यक्ष भूषण विल्हेकर

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर शहरातीच्या मध्यभागी असलेले बनोसा येथील मुख्य बाजारपेठेतील प्रसिद्ध हरी टॉकीज चौक येथे शौचालय नसल्यामुळे लोक उघड्यावरच लघुशंका करतात. लागूनच मुख्य बाजारपेठ, खाजगी दवाखाना, आजूबाजूंनी रहिवासी व बँक असल्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्यांची वर्दळ जास्त प्रमाणात आहे. त्यामुळे येथे झालेल्या घाणीमुळे ये-जा करणाऱ्या नागरिकांना व महिला वर्गांना मान खाली करून



जावे लागत असल्याने त्रास होत आहे. नागरिकांनी नगरपरिषद ला कळवूनही नगरपरिषद याकडे दुर्लक्ष करीत☞(पान २ वर)

# मालमत्ता व पाणीपट्टी बिलावर रक्तदानाचा संदेश

### स्वीकृत नगरसेवक नील माहेश्वरी यांचा होता प्रस्ताव

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर नगर परिषदेच्या सर्वसाधारण सभेत विषयपत्रिकेवरील प्रस्ताव क्रमांक १० अंतर्गत पाणीपट्टी, मालमत्ता कर तसेच इतर नागरी सेवांच्या देयकांवर 'रक्तदान हेच जीवनदान' हा संदेश मुद्रित करण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. हा प्रस्ताव स्वीकृत नगरसेवक नील माहेश्वरी यांनी सभागृहात मांडला होता. रक्तदानाचे महत्त्व नागरिकांपर्यंत



पोहोचावे आणि समाजात जनजागृती व्हावी, या उद्देशाने हा ठराव सादर करण्यात आला होता.

सभागृहाने या प्रस्तावास मंजुरी दिली. गेल्या अनेक वर्षांपासून रक्तदान चळवळ व पर्यटन क्षेत्रात कार्यरत असलेल्या ☞(पान २ वर)

# वस्ती सुधार योजनेतील कामांना गती मिळणार

## ६७० विकासकामांवरील स्थगिती उठवली

**अमरावती/प्रतिनिधीः-** अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करण्यासाठी सन २०२५-२६ या वर्षाकरिता मंजूर करण्यात आलेल्या ६७० विकासकामांवरील स्थगिती उठवण्यात आली आहे. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सूचनेनुसार कामांमध्ये बदल करून विकासकामे करण्यात येणार आहे. यामुळे ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांना वेग मिळणार आहे.

जिल्हा परिषद समाज कल्याण विभागामार्फत राबवल्या जाणाऱ्या या योजनेंतर्गत सांडपाणी निचऱ्यासाठी नाली, पाणीपुरवठा, सिमेंट रस्ते, एलईडी लाईट आणि पेविंग ब्लॉक बसवणे यांसारख्या ६७० कामांची निवड करण्यात आली होती. मात्र, या कामांमध्ये रस्ते आणि पेविंग ब्लॉकच्या कामांचे प्रमाण जास्त असल्याने ही कामे बदलविण्याची सूचना पालकमंत्री बावनकुळे यांनी केली होती. तसेच सांडपाणी व्यवस्थापन, गटार व्यवस्था आणि पाणीपुरवठा यासारख्या मूलभूत सुविधांना प्राधान्य देण्याचे निर्देश दिले होते. या निर्देशानुसार, गट विकास अधिकाऱ्यांनी जुन्या यादीतील ११२ कामांमध्ये बदल करून नवीन कामांचे प्रस्ताव सादर केले आहेत. त्यामुळे आता ६७० विकासकामे सुरू होणार आहे.

या कामांमध्ये रस्ते आणि पेविंग ब्लॉकऐवजी आता आरोग्य आणि स्वच्छतेशी संबंधित कामांमध्ये गटारे, पाणीपुरवठा यावर भर दिला जाणार आहे. सर्व कामांचे जिओ टॅगिंग आणि छायाचित्र पालकमंत्र्यांसमोर सादर करण्यात☞(पान २ वर)

# मेळघाटातील मजुरांच्या प्रश्नावर युवक काँग्रेस आक्रमक

### नरेगा आयुक्तांना 'काळे फासण्याचा' इशारा! - होळीपूर्वी मजुरी द्या, अन्यथा तीव्र आंदोलन

**चिखलदरा/प्रतिनिधीः-** मेळघाटातील आदिवासी मजुरांच्या प्रलंबित मजुरीचा प्रश्न आणि प्रशासकीय जाचक अटींविरोधात अमरावती जिल्हा युवक काँग्रेसने आता आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. चिखलदरा व धारणी तालुक्यातील 'मनरेगा' (MREGS) मजुरांचे थकीत पेमेंट होळीच्या सणापूर्वी करण्यात यावे आणि नवीन कामांसाठी वर्क कोडची मर्यादा शिथिल करावी, अन्यथा नरेगा आयुक्त व संबंधित यंत्रणेला 'काळे फासण्यात' येईल, असा थेट इशारा युवक काँग्रेसने दिला आहे.




या संदर्भात युवक काँग्रेसच्या शिष्टमंडळाने आपल्या विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. यावेळी मेळघाटातील आदिवासींच्या ज्वलंत प्रश्नांवर प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले.

युवक काँग्रेस ने आपल्या निवेदनाद्वारे होळीपूर्वी मजुरी द्या अशी मागणी केली आहे कारण मेळघाटात होळीचा सण मोठ्या उत्साहात साजरा होतो. मात्र, अद्याप अनेक मजुरांचे पेमेंट थकीत आहे. मजुरांच्या घरात आनंदात सण साजरा व्हावा यासाठी हे पेमेंट तातडीने जमा करावे असे ☞(पान २ वर)

# वीजबिल थकवल्याने शेकडो ग्राहकांचा वीजपुरवठा खंडीत

## अचलपूर - परतवाडा शहरात स्मार्ट मीटरमुळे थेट मुंबईतून कारवाई

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर - परतवाडा जुळ्या शहरात वीजबिल न भरल्याने शेकडो ग्राहकांचा वीजपुरवठा थेट मुंबईतून खंडित करण्यात आला. स्मार्ट मीटरच्या नवीन तंत्रज्ञानामुळे आता स्थानिक हस्तक्षेपाशिवाय थकबाकीदारांची वीज कापली जाणार असून, बिल भरल्यानंतरच पुरवठा स्वयंचलितपणे पूर्ववत होईल, असा इशारा महावितरणने दिला आहे. जुळ्या शहरातील शेकडो वीज ग्राहकांचा वीजपुरवठा गेल्या



काही दिवसापासून अचानकच खंडीत झाला. बराच प्रयत्न करुनही हा वीजपुरवठा सुरळीत होत नाही म्हटल्यावर महावितरणने चौकशी केल्यानंतर वीजबिल न भरल्याने थेट मुंबईतूनच वीजपुरवठा खंडीत झाल्याचे समोर आले.नवीन स्मार्ट मीटरच्या माध्यमातून थकबाकीदारांचा वीजपुरवठा आता थेट मुंबईतूनच खंडीत होणार असल्याने वेळेत वीजबिल भरण्याशिवाय आता पर्यायच राहणार नाही. वीजबिल थकीत असल्यास या पुढील काळात वीजपुरवठा सुरळीत राहू शकणार नाही. राज्यातील अडीच लाखांहून अधिक वीजग्राहकांचा वीजपुरवठा थकबाकीमुळे खंडीत करण्यात आला होता.

गेल्या काही दिवसापासून अचलपूर - परतवाडा जुळ्या शहरातील शेकडो घरांचा वीजपुरवठा खंडीत झाल्यामुळे पळापळ सुरु झाली. अनेकांनी तातडीने वीजबिल भरले, नंतरच त्यांचा वीजपुरवठा सुरु झाला.जवळपास ७- ८ तास वीजपुरवठा खंडीत राहिल्याची माहिती ☞(पान २ वर)